म. ग्रं. सं. ठाणे.
विषय ........चरित्र........
सं. क्र. २८५

REFBK-0005593


ग्रंथ संग्रहालय
ता. २२।९।३८

नोंद नं.
ठाणे

# ड्रैगमन

REFBK-0005593

जी. एन. नातू.



—: प्रकाशक :—
आर. बी. समुद्र, बी.एससी.
१४७ नारायण पुणें २.

[ सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन ]

—: मुद्रक :—
गणेश गोविंद दिवाकर.
२७० सदाशिव इंदिरा प्रेस, पुणें २



जी. एन्. नातू

ग्रंथकार.

दा. क्र. ५५०३

**DEDICATED**

**To**

**MY MOTHER**

**G. N. NATU.**

# FOREWORD

" When a very small boy, Cricket was to me the most wonderful game in the world (and, of course, it still is)." " The man who writes this sentence in the introduction of the book, ' How to play cricket ' is not only Australia's Master Batsman, but World's. Everybody, interested in sports ought to know the name of this world's Master Batsman, I refer to Don Bradman !

Bradman was born at Coolamundra, and his earlier cricket exploits were in school cricket in Boural, situated 80 miles from Sydney, in New South Wales, Australia. He scored his first century, when he was only 12 years old against Mittagong, when 13 he went with his father to Sydney to see his first game of first class cricket. And after that he never saw Sydney cricket ground again until he stepped on to it as a player.

At the age of 17 he was the Star of the Boural village team, and scored 320, 300, and 230 in successive innings. In the 1926–27 season he turned out for the Southern district against the combined First grade at Sydney a fine century and thus signalised his entry into big cricket. On the strength of this he was given a job in an estate office at Sydney so that he could appear at the Sydney nursery.

He got a place in the St. George's team. and when he was selected to play for New South Wales against South Australia during 1927–28, he again hit a three figure score. He opened the following campaign with 131 and 133 for his state team against Queensland, and in the next match scored 120 not out, against the M. C.C.

Since that time the name of Don Bradman has been one to conjure with just as he might be said to have conjured with the bowling of the finest players that either England or Australia has been able to put into the field.

And this is only the dawn of Don's life, and we cannot imagine the wonders that Don will reveal in the cricket world. So we are observing Don's every cricket match with extreme interest and we will !!

My intimate friend Mr. G. N. Natu the writer of this book is a keen lover of sport. Himself a sportsman of repute, he is one of the members of P.Y.C. Gymkhana. One of his ambitions was to see Bradman's play before he described it and I strongly hope that he will do so before the next edition.

And of the other persons, whose help I must acknowledge the names Prof. D. B. Deodhar, M.A. the cricketier Mr. P. N. Natu Sergant Major,U.T,C., Dr. Balasaheb Tulpule, M.B. (Bom.)M.R.C.S. (Eng.) M.R.C. P. (Lond.) and Mr. B. J. Mohoni.

In the end Iwould be failing in my duties, if I do not add the name of Mr. G. G. Divakar, the manager, Indira Press for bringing out the book so promptly.

Miss Sarla Karkhanis, Miss Minaxi Dadarkar and Miss Shanta Mujumdar must also receive my sincere thanks.

The next publication in the series will be 'Naidu'

1st Nov. 1936
Poona 2

R. B. Samudra. B.Sc.



बाजू पडली असतांना काढून, ऑस्ट्रेलियांस अनेक वेळां जय मिळवून दिला. पूर्वींचे क्रिकेटधुरंधर ग्रेस हॉब्ज, हेंड्रेन, वगैरेंचे विक्रम ब्रॅडमननें अवघ्या चार वर्षांत मोडून नवीन प्रस्थापित केले आहेत व ते मोडण्यास त्याच्याशिवाय दुसरा खेळाडू समर्थ होईल किंवा नाहीं याची वानवाच आहे. योद्ध्यांत जसा नेपोलियन, मुत्सद्यांत बिस्मार्क, कवींत कालिदास तसाच क्रिकेटपटूंत ब्रॅडमन, आजपर्यंत तरी अद्वितीय गणला जाईल. त्याला कोणीहि शिकविलें नाहीं किंवा त्यानें कोणाचेहि अनुकरण केलें नाहीं. एका खेडेगांवांत गांवठी खेळ खेळूनच तो अचानक पुढें आला व या त्याच्या अलौकिक यशास त्यानें अभिजात ईश्वरदत्त गुणच कारणीभूत झाले असले पाहिजेत.

ब्रॅडमन क्रिकेटमधील विभूतिच असल्यामुळें त्याच्या खेळाचें वर्णन वाचून अगर त्याचें अनुकरण करून आपला खेळ सुधारेल अशी कोणाची आशा असेल तर ती व्यर्थ होय. उलट सामान्य खेळाडूंचे त्याच्या धाडशी टोलयांची नक्कल करण्याच्या प्रयत्नामुळें नुकसानच होण्याचा संभव आहे. एवढेंमात्र निश्चित कीं त्याच्या पराक्रमाचें व तडफदार खेळाचें वर्णन वाचून अगर खेळ प्रत्यक्ष पाहून प्रत्येक चांगल्या वाईट खेळाडूंत एक प्रकारचा उत्साह, जोम व आत्मविश्वास अवश्य निर्माण होईल व हे गुण क्रिकेट व इतर मर्दानी खेळांचा प्रत्यक्ष पायाच असल्यामुळें श्री. नातू यांचे ब्रॅडमनसंबंधीं हें पुस्तक वाचूनहि अनेक खेळाडूंस स्फूर्ति मिळेल यांत शंका नाहीं.

रा. नातू यांचें पुस्तक क्रिकेटप्रेमी लोकांस बोधप्रद तर आहेच. तथापि त्याचा विशेष गुण म्हणजे तें लेखकानें अत्यंत चटकदार व मनोरंजक केलें आहे. वाङ्मयदृष्ट्याही वर्णन कंटाळवाणें न व्हावें म्हणून ठिकठिकाणीं उपमा, दृष्टांत वगैरे योजले आहेत व भाषाहि काव्यमय परंतु सुबोध वापरली आहे. त्यामुळें कित्येक वर्णनांत आपण १९३० चा किंवा १९३४ चा टेस्ट सामना प्रत्यक्ष पाहत आहोंत असा भास होतो.

रा. नातू यांनीं परिश्रमपूर्वक माहिती जमवून येत्या आस्ट्रेलिया-मध्यें होणाऱ्या टेस्ट सामन्याच्या थोड्या अगोदर अगदीं वेळेवर हें पुस्तक प्रसिद्ध केले याबद्दल त्यांचें अभिनंदन करणें जरूर आहे. सध्यां खेळाडूंचें लक्ष टेस्ट सामन्याकडे व त्यांत विशेषतः ब्रॅडमनकडे लागून राहिले असल्यामुळें, हें पुस्तक अगदीं योग्य वेळीं मराठी वाचकांपुढें येत आहे व वाचकहि त्याचा योग्य फायदा घेतील अशी आशा आहे. १९३६ चे सामने पुरे झाल्या-वर त्यांचीहि माहिती यापुढें जोडण्याचा लेखकाचा मनोदय आहे.

रा. नातू पी. वाय्. सी. जिमखान्याचे सभासद असून त्यांना क्रिकेटसारख्या मैदानी खेळांची आवड असल्यामुळेंच त्यांच्या हातून या पुस्तकातील माहिती एकत्र करण्याचे परिश्रम झाले. मराठींत व्यायामासंबंधीं पुस्तकांची फारच जरूरी असल्यामुळें रा. नातु यांच्या प्रयत्नास क्लब व जिमखाने यांनीं शक्य तें उत्ते-जन दिलें पाहिजे.

पुणें
पी. वाय्. सी. कॉलनी
ता. ३१–१०–३६

प्रो. दि. ब. देवधर
एम्. ए.

# BIBLIOGRAPHY


Cricket ( Cardus )
( Chapman )
( Ducat )
( Fry )
( Lyon )
(Lytteltton )
( Warner )
Cricketers , my book of ( Hendren) an Authletic News.
As it should be played
Big ( Thorpe )
Big ( Birkett )
( Hendren )
Book of Cuts.
Book of (Warner.)
Boy's book of Henleys
Brighter side of ( Glasgow )
Chronicle Hamberden ( Cooper )
Clubs famous (Jone)
Cream of ( Pollock )
Eleven Ed. Lowe,
First principles of ( Sewell )
For Beginners ( Benson)
For Beginners ( Hobbs )
Hints ( Dipper )
Language of (Lewis)
Match ( Selincourt )
Personalities ( Gower )
Score Books. Deans County.
Strokes and Styles ( Quife )
Test South Africa and England
Australia Ed. Coleman
Up-to-date ( Sewell )
With the lid of ( Carr )
Cricketer ( Knight )
Cricketer Budding ( Russel )
Cricketer's who's who (Capman)
My cricketing Reminiscences (Tate )
Cricketers, Almanack (John wisdens )

# अभिप्राय—

ब्रॅडमनबद्दल वाटणारें कुतुहल आतां या पुस्तकानें जास्त वाढेल, खेळाचें वर्णन म्हणून नव्हे तर वाङ्मयदृष्ट्याहि हें पुस्तक अत्यंत वरच्या दर्जाचे आहे.

एम्. एम्. नायडू.

---

माझे मित्र श्री. जी. एन्. नातू यांनीं लिहिलेलें ब्रॅडमनचें चरित्र मी वाचलें. या खेळाबद्दल इतकें सुंदर व चित्तवेधक वर्णन मी अजूनपावेतों वाचलें नव्हतें. मराठी नियतकालिकांतून येणारे मोठ्या सामन्याचे रिपोर्टस् असे लिहिले जातील तर या खेळाबद्दलची लालसा आबालवृद्धांत उत्पन्न होईल असें मला वाटतें.

बी. जे. मोहनी

---

रा. रा. जी. एन्. नातू यांनीं लिहिलेलें 'ब्रॅडमन्' नांवाचें पुस्तक मी वाचलें. क्रिकेटमधील ब्रॅडमन् याचें वर्चस्व जगजाहीर आहे. त्याचें नांव प्रत्येक क्रिकेटप्रेमी मनुष्याच्या तोंडीं आहे. १९३४ सालीं आस्ट्रेलियन टीम इंग्लंडमध्यें आली असतांना मला ब्रॅडमन् यांचा खेळ पहावयास मिळाला. रा. रा. नातू यांची लेखनशैली फारच वेधक आहे व पुस्तक वाचतांना मला प्रत्यक्ष पाहिलेल्या खेळाची आठवण वारंवार होत होती.

मराठींतील क्रिकेटवरील या धर्तीचें हें पहिलें पुस्तक लोकप्रिय होईल याबद्दल मला खात्री वाटते.

श्री. नातू यांनीं अशा तऱ्हेची ' क्रिकेट–माला '–चालू करावी व हिंदी क्रिकेट–पटूंच्या खेळांचीं वर्णनें करावीत अशी माझी त्यांना विनंती आहे.

त्र्यं. ह. तुळपुळे.

---

माझ्यासारख्या वाङ्मयभक्तानें या पुस्तकावर अभिप्राय लिहावा हें वाङ्मयभक्तांना व क्रिकेटपटूंनाही आश्चर्याचें वाटेल. पण माझ्याहातीं लेखणी कशी व केव्हां आली हें मला चांगलें स्मरतें; पण ' बॅट् 'संबंधीं मला एवढेंच आठवतें कीं वयाच्या पंधराव्या वर्षींच मी मुंबई इलाख्यांतील प्रथम दर्जाच्या टीमशीं सामने खेळणाऱ्या टीममध्यें असून, माझ्या टीममध्यें ३, २ व १ असे असे नंबर मी लवकरच पटकावले होते, हें माझ्या लेखक स्नेह्यांना माहीत नाहीं. पण मी, या संधीचा फायदा घेऊन सांगूं शकतों कीं, माझ्या लेखणीवर व एकंदर जीवनावरही फक्त क्रिकेटचाच खरा परिणाम झाला आहे. इतर कोणत्याही बाह्य शक्तीचा झालेला नाहीं. क्रिकेटनें आपला भक्त मराठी वाङ्मयाला दिला. अशी माझ्यासारखीं अनेक उदाहरणें झालीं असतीं, तर मराठी साहित्यांतला मत्सराग्नि खात्रीनें चांगल्या मार्गी लागला असता.

माझे स्नेही श्री. गोपाळराव नातू या 'ब्रॅडमन् 'चे लेखक हे उत्कृष्ट क्रिकेटपटु नसले तरी त्या खेळाचे ते वडे रसिक आहेत. शिवाय ते उत्तम कविही आहेत. त्यांना क्रिकेटचें तंत्र तर आज तागाइत

माहीत आहेच, पण त्यांची वर्णनशैली व लेखनाचे गुण या पुस्तकांत इतके उत्कटत्वानें चमकतात कीं, सामान्य वाचकदेखील मंत्रबद्ध होऊन जाईल, तर बॅट् पाहतांच 'बुक व बायको' ही विसरणाऱ्या माझी गोष्ट कशाला? ब्रॅडमन्चा कोणता टोला अधिक चांगला हें जसें सांगणें कठीण, तसेंच या पुस्तकांत वर्णन अधिक सरस कोणतें हें शिफारसणें कठीण आहे. सगळीं ९८ चीं ९६ पृष्ठें रसरसलेलीं आहेत. युगमानाप्रमाणें क्रिकेटर्स-प्रमाणें लेखकही धाडसी, तडफदार व व्यापक निघावेत यांत आनंद आहे.

आणि तरीही या सुंदर पुस्तकांत कांहीं ठळक दोष खुपणारे आहेत. पहिला दोष इतरत्र दोषदेखील झाला नसता; पण या पुस्तकांत तें डोळ्यांतलें कुसळ आहे. पृष्ठसंख्येचें शतक तरी पूर्ण करावयाचें असतें. अगदीं ९६ वरच एकाएकीं सघली दांडी दिली!

दुसरा दोष केवळ साध्या अतिशयोक्तीचा नव्हे, तर तौलनिक अतिशयोक्तीचाही आहे. इंग्लंडच्या क्रिकेट ॲनल्समध्यें वैयक्तिक अशा पांच शतकांचे कांहीं पटू होऊन गेले; व त्यांच्यावेळीं आजच्यासारखी बोलिंग पॉवर कमी नव्हती! श्री. नातू, प्रो. देवधर, नायडू इ. चींही पुस्तकें लिहिणार आहेत असें कळतें. त्यावेळीं त्यांच्यासंबंधीं आजचीं विधानें नातूंना न अडवोत म्हणजे मिळविली. शिवाय कोणत्याही खेळांत grace हा केवळ एकमेवाद्वितीय असा गुण असतोच ना? जपानी टेनिस चॅम्पि-

यन्स अलौकिक तर खरेच. पण त्यांत कांहीं grace असतो का? धांवांच्या संख्येइतका कर grace करतां म्हणून कांहीं ब्रॅडमन प्रसिद्ध नाहीं.

नाथ निफाडकर.

---

महाराष्ट्राची मनोभूमिका स्वभावतःच क्रीडालालस नाहीं. मात्र महाराष्ट्राच्या सर्वांगीण जीवनांत क्रीडावृत्ति खेळूं लागेल तर आयुष्यक्रमांत केवढें चैतन्य उत्पन्न होईल हे सांगावयास नकोच. महाराष्ट्रांत मल्ल आणि आखाडे यांचें प्राचीन काळापासून अस्तित्व असलें तरी खेळाडू वृत्तीची जशी निपज व्हावयास पाहिजे होती तशी झालेली नाहीं. मराठींत मल्लविद्येसंबंधीं अनेक पुस्तकें आहेत. नाणावलेल्या कुस्तीगीरांचीं चरित्रें आहेत, पण ज्याला खेळाडू म्हणतां येईल अशा खेळाडूचें चरित्र नाहीं. ही उणीव प्रस्तुत...... पुस्तकानें......भरून निघत आहे ही समाधानाची गोष्ट म्हटली पाहिजे. या पुस्तकांत ब्रॅडमनचें चरित्र......तर त्याच्या यशोमंदिराची सोपानपरंपरा दर्शविणारे निरनिराळे प्रसंग दिले आहेत. पुस्तकाची भाषा उपमा-उत्प्रेक्षांनीं खचून भरलेली...... ....क्रीडांगणावर वीरश्री गाजविणाऱ्या ह्या अतुल क्रीडाधुरीणाच्या चरित्रवर्णनाला ती............आहे हा ............तथापि कांहीं उपमा अत्यंत रेखीव व सुंदर आहेत हें अवश्य सांगितलें पाहिजे. पुस्तक लिहितांना लेखकानें त्यांत आपला जिव्हाळा ओतला आहे, हें मात्र पुस्तक वाचतांना पदोपदीं दिसून येतें. हें पुस्तक कोणाला विभूतिपूजेसारखें वाटण्याचा संभव आहे. पण तें ज्याच्या त्याच्या खेळाडू मनोवृत्तीवर अवलंबून राहील. क्रिकेटशोकी विद्यार्थी-वर्गाप्रमाणें सामान्य वाचकांनाही तें आवडेल अशी आशा आहे.

रा. म कानिटकर.

नं. ५८०८
ठाणे

# ब्रॅडमन

चरित्र नं. ८१७
ता. 7-1-1938
ठाणे

१९३० नोव्हेंबर ता. १४ रोजीं सकाळीं लीड्स्च्या क्रीडांगणावर इंग्लंड-ऑस्ट्रेलियाचा चवथा सामना पहावयाला जे लाखों लोक आले होते ते कांहीं 'डॉन ब्रॅडमन' या तरुण नव्या अप्रसिद्ध खेळाडूचा खेळ पाहण्याकरितां नव्हते. ऑस्ट्रेलियन टीममध्यें नवीनच भरती केलेल्या या पोरापासून फारशा धावांची ते अपेक्षा करीत नव्हते. आणि कोणी केली असती ? अजून मिसरुडही फुटलें नाहीं, पिळले तर दूध ओघळेल असे नाजूक ओठ, आणि शरीरयष्टीही अशी बळकट नव्हे कीं वैशिष्ट्यानें डोळ्यांत भरावी, पण त्या दिवशीं सर्व प्रेक्षकांच्या डोळ्यांचें पारणें फिटलें.

रसिक प्रेक्षकांपैकीं ज्यांनीं जुन्या जमान्यांतला खेळ पाहिला होता, त्यांना रणजितसिंगाची, ग्रेसची आठवण होऊन त्यांचे डोळे आनंदाश्रूंनीं भरून आले. ता. १४ नोव्हेंबर १९३० रोजीं संध्याकाळीं

## डॉन ब्रॅडमन

' डॉन ब्रॅडमन ' हें नांव अबालवृद्धांच्या तोंडीं बसलें. क्रिकेटच्या खेळांतील तज्ज्ञ म्हणूं लागले कीं, 'हा खेळाडू म्हणजे केवळ अतुल ! याच्या तोडीचा खेळाडू मागें झाला नाहीं, आणि ' पुढें न होणार !' दुसरे दिवशीं सकाळीं त्याच्या खेळाविषयीं कौतुक प्रदर्शित करतांना शब्दसृष्टीच्या ईश्वरांनाही शब्दांचा तुटवडा पडला. लंडन टाइम्स म्हणतो, " He treated our star English bowlers as if they are junior school bowlers. " जो तो विस्मयचकित अंतःकरणानें या तरुण खेळाडूचें कौतुक करूं लागला. परराष्ट्रीयत्वाचे पाटबंधारे फोडून पुढें धांवणाऱ्या या गुणसंकीर्तनाच्या जंजालदरियाला सीमा-बंधनाचें अवगुण्ठन नव्हतें, आणि क्रिकेटच्या विश्वांतील 'अनभिषिक्त सम्राट' म्हणून त्याला दोन पायांवर उभे राहिलेले साडेतीन हाताचे अनेक देह संबोधूं लागले. वर्तमानपत्रें विकणारीं पोरें दुसरे दिवशीं त्याचें नांवावर आपली मिळकत वाढवूं लागलीं. उमर येवढी कीं, दुनियेच्या पालनहार परमेश्वराच्या जलाल डोळ्यांच्या २० सालाच्या उघडझांपीही याच्या पापणीआडच्या चमकदार हिरकणीनें टेहेळल्या असतील किंवा नसतील; हॉब्ससारखे भीष्माचार्यही या 'अभिमन्यूचा पराक्रम पाहून वेडे झाले; नेव्हिल कॉर्डस् (Nevile Cardus) सारखे चोखंदळ टीकाकारही भान हरपून गेलें आणि उद्गारलें, " डॉन ब्रॅड-मन हा एकमेवाद्वितीय असा खेळाडू आहे."

क्रिकेटच्या खेळांतील महत्त्वमापन ( Scale ) पॅव्हेलियनमधील स्कोअरबोर्डवरील आंकडयांवरून किंवा अबाधित चालणाऱ्या घटिका-यंत्रावरून जर कोणी करूं पाहील तर डोक्यांच्या कवटीवर स्टेथास्कोप ठेवणाऱ्या डॉक्टराप्रमाणें अनभिज्ञपणाचें ठरेल. तानेची पहिली लकेर

स्वतः प्रत
सं. चरित्र नं. ८१५
ता. १-११-१३८



ऐकूनही गवयाच्या पोटांत कोवळे कोकलताहेत कीं मैना ? ’ हें साध्याभोळ्याला नव्हे तरी स्वतः श्रोत्याला समजूं शकतें. खरा कुशल खेळाडू आपल्या स्वतःचे असे विशिष्ट दोन कौशल्यपूर्ण फटके मारून आपलें महत्व प्रस्थापित करूं शकतो. लीड्सच्या मैदानावर अवघ्या पळभरांत ब्रॅडमननें आपण ‘ कोणीतरी ’ आहोंत हें सर्वांच्या ध्यानांत आणिलें. खेळाला सुरुवात केल्यापासून एका तासांत लेग ग्लान्स खेरीज-करून सर्व तऱ्हेचे फटके अत्यंत सफाईदार रीतीनें मारून त्यानें बहात्तर धांवा काढिल्यां. पुढचें दीड शतक करावयास त्याला त्या मानानें बराच कालावधी लागला. परंतु पुनः शेवटीं त्याच्या खेळांवर समाप्तीचा पडदा पडतां पडतां शेवटच्या अर्ध्याएक तासांत हस्त-नक्षत्रांतील मुसळधारीसारखा त्यानें धावांचा पाऊस पाडला. कसलीही जबरदस्त चेंडूफेक असो, त्यानें ती टोलवलीच; स्लिपमधल्या आंतर-राष्ट्रीय कीर्ती मिळालेल्या क्षेत्ररक्षकांना त्यानें नुसतें हवालदिल करून सोडलें. विजेच्या चापल्यानें त्याची बॅट फिरत होती. गोलंदाज आपल्या गोलंदाजीची पराकाष्ठा करीत होते, आणि हा विजयी वीर उंदरांना मांजरानें खेळवावे तसा त्यांना खेळवीत होता. शेवटीं शेवटीं तर तो इतक्या बेफिकिरीनें खेळूं लागला कीं, जणुं काय तो आपल्या प्रतिस्पर्ध्यांची कींव करून त्यांना आपल्याला बाद करावयाला संधी देऊं पाहात आहे असेंच पाहणाऱ्याला वाटलें. कवचकुंडलें काढून टाकणाऱ्या अमर कर्णाची आणि त्याची मनोवृत्ति एकच. बॅट्समन स्वतः बाद व्हावयासाठीं हवा तसा खेळत होता, पण त्याची कौश-ल्यपूर्ण बॅट त्याला बाद होऊं देत नव्हती. एखाद्या वाकबगार पोहोणा-ऱ्यानें जीव देण्यासाठीं अवजड दगड उराशीं घेऊन नदीचा डोह

जवळ करावा आणि त्याच्या दमदार हातानें त्यासकट त्याला पैलतीरीं तारून न्यावें तशांतलीच गत ! कारण त्याचें जलक्रीडाकौशल्य परमावधीला पोंचलेलें आणि तें काय त्याला खुशाल बुडून देण्यासाठीं ? छे ! छे ! खेळतांना त्याच्या हालचाली केवळ चित्त्यासारख्या मोहक आणि चपळाईच्या होत्या. बिनचुक खेळावयाची संवय त्याच्याइतकी अंगवळणीं पडली होती कीं, आतां चुकी करणें त्याच्या स्वाधीन नव्हतें. संकट अकल्पितपणें उभें राहिल्यावर शूराचा हात कमरेच्या समशेरीकडे वळावा तशी चांगल्या लेंग्थचा (Length) चेंडू आपल्याकडे येत आहे असें पाहातांच त्याची बॅट विद्युद्गतीनें चक्राकार फिरे आणि चेंडू सीमापार गेलेला प्रेक्षकांना दिसे. ब्रॅडमनच्या या क्रीडाकौशल्याकडे पाहातांच सर्व प्रेक्षक तहानभूक विसरून जातात. यांत नवल तें काय ? बाद होण्याची एकही संधी न देतां तासाला सत्तर याप्रमाणें स्कोअर चढवणाऱ्या आणि फळ्यावर स्वतःच्या नांवापुढें दोनदोन तीनतीन शतकें झळकावयास लावणाऱ्या या वीराकडे पाहिलें म्हणजे पुराणकाळच्या अमर अश्वत्थाम्याची आठवण होई. प्रल्हादाच्या सजीवत्वाचें वरदान मिळालेल्या पित्याला मारावयाला परमेश्वराला जसें जगावेगळें स्वरूप धारण करावें लागलें, तसेच या नामांकित खेळाडूला बाद करावयाला लारवुडला जगाविरहित बॉलिंग टाकण्याची आवश्यकता भासूं लागली आहे. लीड्सच्या क्रीडांगणावर जेव्हां फळ्यावर त्याच्या नांवापुढें दुसरें शतक झळकलें तेव्हां क्रिकेटच्या खेळामधील नेहमींच्या अनुभवाप्रमाणें लोकांना वाटलें कीं, तो आतां एखादां तरी चुकीचा फटका मारील, कॅच देईल अगर घाई करून रनऔट होऊन आतांपर्यंत चाललेल्या आपल्या निर्दोष आणि

सौंदर्यपूर्ण खेळाला गालबोट लवील. पण छे! उलट जणूं काय नव्यानेंच खेळावयाला आलेल्या खेळाडूच्या उत्साहानें त्यानें आपले वैशिष्ठ्यपूर्ण व सफाईदार फटके मारण्याचा क्रम चालूं ठेविला.

इतर खेळाडूंत आणि डॉन ब्रॅडमनमध्यें कुठें तफावत असेल तर येथेंच! त्याचा खेळ संपूर्ण निर्दोष आणि सहजसौंदर्यानें नटलेला असतो. शक्तिसर्वस्व घालून डोळ्यांची पापणी लवतें न लवतें इतक्या जलदाईनें निष्णात तिरंदाजाच्या निशाणबाजीप्रमाणें सही सही इच्छित स्थळीं मारलेले त्याचे फटके अगदीं आकर्षक असतात. विविध प्रकारांनीं शोभायमान झालेल्या त्याच्या खेळाची सर्वसूत्रता त्याचें एकाकी असलेलें मन सुयंत्रित रीतीनें चालवूं शकतें. फेंकल्या गेलेल्या प्रत्येक चेंडूला सीमापार करावयाचा त्याचा शिरस्ता आहे. तरीपण त्याचे फटक्यांत उतावीळपणा नसतो. साहस, उतावीळपणा इत्यादि सर्वसाधारण खेळाडूंचे अवगुण ब्रॅडमनजवळ दिसणार नाहींत; तासाला पन्नासप्रमाणें स्कोअर करतांनासुद्धां तो पूर्णपणें विचार करूनच खेळत असतो. मुंबईच्या टाईम्सनें त्याच्या खेळाचें वर्णन करतांना 'रन्स-मशीन' म्हणून त्याचा उल्लेख केलेला पुष्कळांच्या स्मृतींत असेल. आपल्याकडील नायडूसारख्यांच्या खेळांत हा गुण क्वचित्च आढळतो. कारण हे केव्हां बाद होतील याचा नेम सांगतां येत नाहीं. आपल्याकडील काय पण परकीय निष्णात खेळाडूंनाही एखादा निष्णात बोलर युक्तीयुक्तीनें त्याला आवेश आणून अगर एतत्सम प्रकारांनीं बाद करूं शकेल. पण असलें समाधान कोणताही ब्रॅडमनशीं दोन हात करणारा गोलंदाज मिळवूं शकणार नाहीं. ब्रॅडमनला ही संवयच नाहीं. तासचे तास काय पण दिवसांचे दिवस ब्रॅडमनचा धीमेपणानें चेंडू

फटकावयाचा क्रम चालूंच असतो. त्याच्या खेळांतील हा गुण बोलर्सच्या तोंडचें पाणीच पळवतो. बोलिंग चांगले पडूं लागल्यावर ब्रॅडमन पहिले चार पांच चेंडू सन्मानपूर्वक अडवतो आणि नंतर त्याच्या चौफेर टोलेबाजीस सुरुवात होते. उत्कृष्ठ चेंडूफेंकीवर पट्टे ओढून विकेट देणाऱ्या आपल्याकडील टाळीसाठीं हपापलेल्या खेळाडूंप्रमाणें ब्रॅडमन कांहीं बालबुद्धीचा नाहीं. चेंडूची गती समजून घेण्यांत त्याचें डोळे केवळ घारीप्रमाणें आहेत. त्याला अविचार कसा तो ठाऊकच नाहीं. पूर्वकालांतील मेकपीस (Make Peace) सारख्या निष्णात खेळाडूप्रमाणें त्याचें संशयी आणि चिकित्सक डोळे स्टम्प्सकडे तुफान वेगानें घुसणाऱ्या चेंडूकडे सारखे वेधलेले असतात. त्याची उन्नत मान एकदम बॅटच्या अनुरोधानें सरळ रेषेंत अवनत होते. बॅटीचें पातें त्रिफळांचें संरक्षणासाठीं द्रुतगतीनें चिलखताप्रमाणें पुढें होतें आणि तें चिलखतही अवसानघातकी ठरलें तर वेळेवर उपयोगी पडावे, म्हणून त्याचे पाय बॅटमागें संरक्षणाची जास्त तरतूद म्हणून तयार असतात.

त्यानें ओव्हरमध्यें पहिले पांच चेंडू सीमापार करून शेवटचा चेंडू नुसता अडविला म्हणजे बोलर्स बेचैन होतात. आणि पुष्कळ वेळां बोजसारखा नामांकित बोलर चिडून उद्गारतो, 'सहावाही चेंडू मार बाबा आणि आम्हांला एकदा तरी तुला औट घेण्याची संधी दे!'

त्याचा एवढा गुणगौरव करावयाचें कारण त्याचें अंगीं मुरलेले बॅटस्मनचे एकत्रित गुण हेच होत. आतांपर्यंतचे खेळाडू एकेका वैशिष्ट्यामुळें प्रसिद्धीस आले होते. कोणाचे कट्स उत्तम, तर कोणी ग्लान्सिंग उत्कृष्ट करील, कोण हूक चांगलें करील तर कोणी बॉल उंच चढवील. परंतु आपल्या चरित्रनायकाची गोष्ट

निराळी आहे. तो हे सगळे स्ट्रोकस् त्यांच्यापैकीं कोणापेक्षांही जास्त कौशल्यानें मारतो. एखाद्या मूर्तिकारानें अनेक सुंदर स्त्रिया पाहून प्रत्येकीच्या चेहऱ्यांतील वैशिष्ट्य शोधून काढून एक निराळीच कल्पना-रम्य स्त्रीची मूर्ति तयार करावी, तशीच ब्रॅडमन ही परमेश्वराची कृती आहे. सर्वांच्या अंगीं आहे तें त्याच्या अंगीं आहे. परंतु त्याच्या अंगीं आहे तें सर्वांच्या अंगीं नाहीं. सर्वांच्या जवळ आहे परंतु त्याच्याजवळ नाहीं असा एकच गुण. आणि तो म्हणजे खेळाच्या आहारीं कधींही न जाणें !

## २

सर्वांची अशी समजूत आहे कीं, ब्रॅडमनचे स्वत:चे असे कांहीं स्वतंत्र स्ट्रोकस् आहेत. परंतु टीकाकारांच्यामध्यें या बाबतींत तीव्र मतभेद आहेत. सुप्रसिद्ध नेव्हिल कॉर्डस् याला हें मत मुळींच मान्य नाहीं. त्याच्या मतानें ब्रॅडमनचा खेळ हा पूर्णपणें शास्त्रोक्त Orthodox असा आहे. तो म्हणतो, 'लीड्सच्या क्रीडांगणावर मारलेले त्याचे सर्व फटके, सी. बी. फ्रायच्या क्रिकेटवरील पुस्तकांत सांगितल्याप्रमाणें मारलेले होते. परंतु एवढें मात्र खरें कीं, पूर्वीं जो खेळ निरनिराळ्या उत्तम बॅटसमनमध्यें विभागला गेलेला होता, तो सर्व याच्या एकट्याच्या अंगीं अगदीं एकजीवी होऊन राहिलेला आहे.' रणजींचे ऑफचे फटके ब्रॅडमन तितक्या सफाईनें किंबहुना त्याहूनही जलदाईनें मारतो. तो ऑफ साईडला खेळूं लागला म्हणजे पूर्वींच्या रणजींच्या प्रेक्षकांना स्मरण होऊन आपोआपच त्यांच्या डोळ्यांशीं त्यांचा हातरुमाल कौतुकाश्रू टिपावयास जातो. सर्व नामांकित खेळाडूंच्या खेळांचें अमृतमंथन करून त्यानें आपला खेळ सजविला आहे असें वाटतें. परंतु त्याच्या तरुण वयाकडे पाहून ती गोष्ट त्याला शक्य नव्हती असेंच म्हणावें लागतें. १९३० सालीं त्यानें नांव गाजविलें तेव्हां त्यानें वयाची विशीही ओलांडली नव्हती.

कवि अमर काव्य निर्माण करतो त्याचें बीज त्याला परमेश्वरानें दिलेल्या स्फूर्तींतच असतें. कवीप्रमाणेंच चित्रकार अगर इतर

कलाधीन कलावंत यांना ईश्वराचें अधिष्ठान लाभलेलें असतें. ब्रॅडमननें कोणाही सुप्रसिद्ध खेळाडूंचें निरीक्षण केलें नाहीं. अर्जुनावरही मात करणाऱ्या एकलव्यानें तरी कोठें कोणाचें अनुकरण केलें होतें? ब्रॅडमननें एकलव्याप्रमाणें एखाद्या गुरुची मानसपूजा करून अभ्यास केला असेल.

ब्रॅडमन जो एवढा स्कोअर करतो त्याचें कारणही त्याच्या खेळांतील गुणांचें एकीकरण हेंच होय. जुन्या उत्तम खेळाडूंची कल्पनाही धांवली नसेल इतक्या धांवा ब्रॅडमन काढतो. हॉब्ज आणि ट्रंपर हे आपल्या ऐन उमेदीच्या कालांत स्लिपमध्यें जे जोरदार फटके मारीत तसे ब्रॅडमन मारूं शकत नाहीं हें खरें, पण त्यांच्यापेक्षां ब्रॅडमनचें 'प्लेसिंग' फारच व्यवस्थित असतें. ब्रॅडमनच्या प्लेसिंग-बद्दलचा विषय निघाला आहे. तेव्हां आठवली म्हणून एक गोष्ट सांगतों. हकीगत कांहीं जुनी नाहीं.

अगदीं नवीनच म्हणजे १९३४ च्या टेस्ट मॅचेसमधील गोष्ट. लॉर्ड्‌सच्या मैदानावर दुसरी टेस्ट सुरू झाली होती. वुडफुल बाद झाल्यावर ब्रॅडमन खेळावयास आला. तो आल्याबरोबर बोलिंग चेंज करून फार्नेसला देण्यांत आलें. ब्रॅडमनला वेगवान् बोलिंग आवडत नाहीं, असा वृत्तपत्रांनीं गवगवा केला होता आणि त्यानेंही त्यांचे म्हणणें अगदीं 'अक्षरशः' खरें करून दाखविलें. आपल्याला न आवडणाऱ्या प्रत्येक चेंडूला त्यानें क्रीडांगणाबाहेर हांकून लावलें. बंदुकीच्या गोळीप्रमाणें सूं सूं करीत फार्नेसच्या हातून सुटणारा पहिलाच चेंडू त्यानें नेत्राचें पातें लवतें न लवतें तोंच 'हुक' करून सीमापार केला. दुसऱ्या चेंडूला त्यानें 'ड्राइव्ह' करून निशाणापार

# २

सर्वांची अशी समजूत आहे कीं, ब्रॅडमनचे स्वत:चे असे कांहीं स्वतंत्र स्ट्रोकस् आहेत. परंतु टीकाकारांच्यामध्यें या बाबतींत तीव्र मतभेद आहेत. सुप्रसिद्ध नेव्हिल कॉर्डस् याला हें मत मुळींच मान्य नाहीं. त्याच्या मतानें ब्रॅडमनचा खेळ हा पूर्णपणें शास्त्रोक्त Orthodox असा आहे. तो म्हणतो, ' लीड्सच्या क्रीडांगणावर मारलेले त्याचे सर्व फटके, सी. बी. फ्रायच्या क्रिकेटवरील पुस्तकांत सांगितल्याप्रमाणें मारलेले होते. परंतु एवढें मात्र खरें कीं, पूर्वी जो खेळ निरनिराळ्या उत्तम बॅटस्मनमध्यें विभागला गेलेला होता, तो सर्व याच्या एकट्याच्या अंगीं अगदीं एकजीवी होऊन राहिलेला आहे.' रणजींचे ऑफचे फटके ब्रॅडमन तितक्या सफाईनें किंबहुना त्याहूनही जलदाईनें मारतो. तो ऑफ साईडला खेळूं लागला म्हणजे पूर्वीच्या रणजींच्या प्रेक्षकांना स्मरण होऊन आपोआपच त्यांच्या डोळ्यांशीं त्यांचा हातरुमाल कौतुकाश्रू टिपावयास जातो. सर्व नामांकित खेळाडूंच्या खेळांचें अमृतमंथन करून त्यानें आपला खेळ सजविला आहे असें वाटतें. परंतु त्याच्या तरुण वयाकडे पाहून ती गोष्ट त्याला शक्य नव्हती असेंच म्हणावें लागतें. १९३० सालीं त्यानें नांव गाजविलें तेव्हां त्यानें वयाची विशीही ओलांडली नव्हती.

कवि अमर काव्य निर्माण करतो त्याचें बीज त्याला परमेश्वरानें दिलेल्या स्फूर्तींतच असतें. कवीप्रमाणेंच चित्रकार अगर इतर

कलाधीन कलावंत यांना ईश्वराचें अधिष्ठान लाभलेलें असतें. ब्रॅडमननें कोणाही सुप्रसिद्ध खेळाडूंचें निरीक्षण केलें नाहीं. अर्जुनावरही मात करणाऱ्या एकलव्यानें तरी कोठें कोणाचें अनुकरण केलें होतें? ब्रॅडमननें एकलव्याप्रमाणें एखाद्या गुरुची मानसपूजा करून अभ्यास केला असेल.

ब्रॅडमन जो एवढा स्कोअर करतो त्याचें कारणही त्याच्या खेळांतील गुणांचें एकीकरण हेंच होय. जुन्या उत्तम खेळाडूंची कल्पनाही धांवली नसेल इतक्या धांवा ब्रॅडमन काढतो. हॉब्ज आणि ट्रंपर हे आपल्या ऐन उमेदीच्या कालांत स्लिपमध्यें जे जोरदार फटके मारीत तसे ब्रॅडमन मारूं शकत नाहीं हें खरें, पण त्यांच्यापेक्षां ब्रॅडमनचें 'प्लेसिंग' फारच व्यवस्थित असतें. ब्रॅडमनच्या प्लेसिंगबद्दलचा विषय निघाला आहे. तेव्हां आठवली म्हणून एक गोष्ट सांगतों. हकीगत कांहीं जुनी नाहीं.

अगदीं नवीनच म्हणजे १९३४ च्या टेस्ट मॅचेसमधील गोष्ट. लॉर्ड्सच्या मैदानावर दुसरी टेस्ट सुरू झाली होती. वुडफुल बाद झाल्यावर ब्रॅडमन खेळावयास आला. तो आल्याबरोबर बोलिंग चेंज करून फार्नेसला देण्यांत आलें. ब्रॅडमनला वेगवान् बोलिंग आवडत नाहीं, असा वृत्तपत्रांनीं गवगवा केला होता आणि त्यानेंही त्यांचे म्हणणें अगदीं 'अक्षरशः' खरें करून दाखविलें. आपल्याला न आवडणाऱ्या प्रत्येक चेंडूला त्यानें क्रीडांगणाबाहेर हांकून लावलें. बंदुकीच्या गोळीप्रमाणें सूं सूं करीत फार्नेसच्या हातून सुटणारा पहिलाच चेंडू त्यानें नेत्राचें पातें लवतें न लवतें तोंच 'हुक' करून सीमापार केला. दुसऱ्या चेंडूला त्यानें 'ड्राइव्ह' करून निशाणापार

नेलें. तो फटका ज्ञानवंत प्रेक्षकांस आमरण न विसरावयास लावणारा होता. त्यांत चैतन्य होतें, वेग होता आणि आकर्षणही होतें. त्या ओव्हरमधील शेवटचा चेंडू त्यानें अत्यंत रेखीवपणें 'कव्हर'कडे सीमापार केला. तिसरा चेंडू ग्लान्सकडे टोलवून त्यानें दोन धांवा घेतल्या. आज ह्यात असलेल्या कोणच्याही आणि कुठल्याही खेळाडूला विकेटपासून चार पांच फूट दूर पडलेला चेंडू ग्लान्सकडे टोलवतां आला नसता. फार्नेसच्या पहिल्याच ओव्हरमध्यें ब्रॅडमनच्या १४ धांवा झाल्या. फार्नेसला काढून गेरीला बोलिंग देण्यांत आलें. ब्रॅडमननें त्याला ऑफ साईडला चारचा फटका लगावला. त्यावेळीं तो ऑफकडेच खेळत होता. म्हणून आधींच चार क्षेत्ररक्षक तिकडे आणून ठेविले होते. गेरीचा दुसरा चेंडू पुनः त्यानें ऑफलाच टोलवला. चार फिल्डर्स पुरेनात म्हणून आणखी एक खेळाडू तेथें आणावा लागला. आणि मग ब्रॅडमननें 'प्लेसिंग' म्हणजे काय आणि त्यांत आपण किती वाकबगार आहोंत हें जगाच्या निदर्शनास आणून दिलें. गेरीचा पुढचा चेंडू त्यानें मिडऑनला बरोबर जेथें तो पांचवा खेळाडू पूर्वी उभा होता तेथेंच टोलवला. ग्राउंडांतील सर्व खेळाडूंना आचंबा वाटून तोंडांतच बोटें घातलीं. इंग्लंडचा विकेट कीपर विनोदानें ब्रॅडमनला म्हणाला, 'ब्रॅडमन आमचेजवळ अकराच फील्डर्स आहेत हें लक्षांत आहे ना ?' या एका गोष्टीवरूनसुद्धां ब्रॅडमनचें प्लेसिंग किती बिनचूक असतें याची कल्पना येईल. स्वतःच्या नांवापुढें शंभर धांवा लागल्या म्हणजे इतर खेळाडूंना 'आपण मिळविली' असें वाटतें. पण ब्रॅडमनला शंभर धांवा म्हणजे पोरखेळ वाटतो.

एका दिवसांत निर्दोष बेचाळीस बौंडरीज मारतां येतात, हें त्यानें जगाला दाखवून दिलें. आजपर्यंत कोणाला शक्य वाटत नव्हतें, पण एका दिवसांत स्वतःचें असें तिसरें शतकही त्यानें काढून दाखविलें आहे. त्याची ती गाजलेली बॅट जगाला आणखी कोणतीं आश्चर्यें दाखविणार आहे हें त्याचें त्यालाच अगर त्याला निर्माण करणाऱ्या त्या एका विश्वसंचारी दयाघनाला ठाऊक !

## ३

ट्रंपरप्रमाणें ब्रॅडमन संधी साधून बॉलवर हल्ला करतो आणि रणजी-प्रमाणें हवा तो चेंडू हवा त्या ठिकाणीं तो टोलवतो. त्याच्या खेळांत सचेतना असते. तो स्तब्ध अगर हतबुद्ध कधींही होत नाहीं. त्याचा खेळ पाहतांना रसिक प्रेक्षक मान डोलवल्याशिवाय राहणार नाहीं. त्याचा प्रत्येक फटका म्हणजे एकेक मौल्यवान् रत्न आहे. त्याच्या खेळाकडे लक्षपूर्वक पाहणाऱ्या प्रेक्षकाला अद्‌भुतरम्य असें कांहींच वाटत नाहीं. सर्व कांहीं सुलभ आहे असेंच वाटून जणूं काय तो खेळास प्रारंभ करतो. त्याचा खेळ असा आहे कीं, त्याचा चेहरा झांकूनही हा ब्रॅडमनच खेळतो आहे हें त्याच्या फटक्यावरून जाणतां येतें. त्याला 'सेट' व्हायला एक मिनिटही लागत नाहीं. पहिली ओव्हर म्हणून तो 'स्टेडी' खेळेल अशी कल्पना कुणी करील तर ती धादांत खोटी ठरेल. तो खेळूं लागला म्हणजे 'भयंकर' वाटणारे चेंडू सोपे आणि अगदींच पुळचट वाटतात. नॉटिंगहॅमच्या मॅचमध्यें बोजच्या पहिल्याच ओव्हरींत फास्ट बोलिंगवर त्यानें अठरा धांवा ओढल्या; केवढा हा आत्मविश्वास! परवांच मुंबईच्या चौरंगी साम-न्यांत बोजच्या मानानें सहस्रपटीनें कमजोर असलेल्या निसारच्या बोलिंगवर आमच्या हिंदु खेळाडूंनीं जें प्रदर्शन केलें तें पाहिलें आणि ब्रॅडमनच्या खेळाचीं हीं वर्णनें वाचलीं म्हणजे आपल्याकडील नायडूला 'इंडियन ब्रॅडमन' म्हणून संबोधणाऱ्या रसिक प्रेक्षकांच्या 'उपमाचातु-

क्र. ५५९३



यांची कींव करावी लागते. बाकी नवरसांचीं नांवेंही ठाऊक नसलेल्या नटीनें ग्रेटा गार्बो म्हणून बेधडक मिरवावें अगर डार्विनच्या सिद्धांताची खातरजमा जगाला पुरती पटली नाहीं, अशी स्वतःची समजूत करून घेऊन जणूं काय जगाला ती पटवण्यासाठींच पडद्यावर नाचणाऱ्या एखाद्या हिंदी नटानें स्वतःला 'डग्लस फेअर बँक्स' असें म्हणवून घ्यावें अगर एखाद्या रद्दी फिल्म्स काढणाऱ्या चारपांच कंपन्या असलेल्या शहरानें स्वत:ला हिंदुस्थानांतले 'होलिवुड' म्हणवून घ्यावें! मग त्यांच्यापेक्षां सहस्रपटीनें जास्त लायकी असलेल्या खेळाडूंनीं तरी कां असलें उत्कृष्ट नामाभिधान नाकारावें?

सर्वांत चमत्कार वाटणारी गोष्ट म्हणजे हा एवढा चिमुरडा पोर अनुभविक हस्तलाघवाचा व जुन्या बुद्धिकौशल्याचा खेळ खेळूं लागला! पुराणान्तरीं वाचलेलीं बाल मारुतीरायानें गगनचुंबन करून पहाटेच्या प्रहरीं लालबुंद असलेल्या दिनकरबिंबाचें ग्रहण करण्यासाठीं घातलेली झेंप अशीच कुतूहल उत्पन्न करणारी नाहीं कां? खेळतांना त्याच्या पायांची हालचाल विद्युन्मालेसारखी दिसते. तो जमीनीसरपट हिटस् मारतो. त्याचे फटके वॉल्टर्स अगर आपलेकडील सी. के. नायडू यांचेप्रमाणें कधींच अंतराळांतून जात नाहींत. तो ऑफ बौंड्या मारीत असतांनासुद्धां स्लिपमधील अगर पॉईंटवरील फिल्डर्सना त्याचा एखादाही झेल सांपडण्याची आशा नसते. मारलेला फटका एवढा जोरदार असतो कीं, मध्यें हात घातला कीं शिराच तुटतील अगर पायाचा तुकडाच पडेल. अत्यंत वेगानें येणारे चेंडूही तो सरळ रेषेंत कव्हर पॉईंटवर मारूं शकतो. त्याचे हे फटके पाहून त्याची बॅट पिचत कशी नाहीं हीच नवलाची गोष्ट वाटते. हस्तनक्षत्रांतल्या पर्जन्यधारेप्रमाणें

त्याच्या मिडऑन कट्सच्या फटक्यांची बरसात एकदां सुरू झाली कीं, एम्. सी. सी. सारखी मातब्बर टीमही आपली शंभर वर्षे भरलीं असें समजते. टॉम हेयॉर्डप्रमाणें निर्दोष खेळ हा एवढासा युवक कसा खेळूं शकतो ? त्याच्या खेळाकडे पाहणाऱ्या प्रेक्षकांचा दृष्टिकोन कौतुकानें एवढा नटलेला आहे कीं, त्याच्या फळ्यावर शंभर धांवा लागावयाच्या आधीं जर त्यानें एखादा चुकीचा फटका मारला तर त्याचें त्यांना आश्चर्य वाटतें; आणि त्यांची त्याच्याकडून अपेक्षा तरी केवढी असते ? सीतेनें रामाकडून कांचनमृगाची अपेक्षा केली आणि रामानें पूर्णही केली. नाहींतर कोणी कांचनाचा हालताचालता मृग पाहिला अगर ऐकला तरी आहे कां ? ब्रॅडमननें तरी कधीं रसिकांची निराशा केली आहे ? आणि ही विलक्षण लोकप्रियता त्यानें केवढ्या वेळांत मिळविली ? एका दिवसांत ! खेडयांत राहून गांवढळ जिणें कंठणारा लिंडबर्ग गांवाच्या वेशीबाहेर कोणालाही ठाऊक नव्हता. परंतु अवघी एक रात्र पालटतांच अलम् दुनियेंत त्याचें नांव महशूर झालें. मनगटांत मगरूरी असली तर मातींतून माणकें काढतां येतात हेंच खरें. एक दोन वर्षांपूर्वीं या पोरानें उत्तमोत्तम खेळाडूंचा खेळ पाहिलाहि नव्हता. आणि तरीही आज तो क्रिकेटची राजधानी लीड्स् येथील सिंहासनावर इंग्लंडच्या अकराहि रणसिंहांना हतबुद्ध करून विजेता म्हणून उभा आहे. १९३४ च्या चवथ्या सामन्यांत ब्रॅडमननें एकट्यानें एका दिवसांत इंग्लंडचा सबंध स्कोअर मेकअप केला आणि संध्याकाळीं नॉटऔट राहून दुसऱ्या दिवशीं तरी हा कसा औट जाणार या फिकीरींत इंग्लंडला टाकून तो क्रीडांगणांतून परतला, सऱ्याहादु दिवशीं त्यानें नॉटऔट

राहून दोनशें एकाहात्तर धांवा काढल्या. वॉल्टर्सला फिल्डिंग करतांना त्यानें पळतां भुई थोडी केली ! कीटन तर घामाघुम होऊन गेला ! हॅमंडच्या तोंडचें पाणी पळालें ! वॅटनें त्याचा ग्लान्सचा फटका अडवावयाचा प्रयत्न केला, तेव्हां जन्मभर याद राखील असा मार त्याच्या तळहाताला खावा लागला ! लेलंड हा त्या दिवशीं लेगकडे फिल्डिंग करीत होता. त्याची तेथील फिल्डिंग विशेष प्रसिद्ध आहे. परंतु त्याच्या जवळून मारलेले फटकेही त्याला त्या दिवशीं आडवितां आले नाहींत. हॉपवुड, हेरेडी मिचेल हे बोजच्या बोलिंगवर त्याचा एखादा कॅच स्लिपमध्यें उडेल म्हणून सकाळपासून सायंकाळपर्यंत आ वासून उभे होते; पण त्यांची निराशा झाली. मुंबईचे आकर्षक इंग्रजी लेखक सदानंद यांनी त्या दिवशीं Bradman (not out) Passes all England Score असा मथळा ‘फ्री प्रेस’ मध्यें दिला होता. चतुर खेळाडूंचें कौतुक चतुर लेखकानेंच करावयास हवें.

मराठी ग्रंथ संग्रहालय

## ४

जगप्रसिद्ध क्रिकेट खेळाडू ट्रंपर वयाच्या एकविसाव्या वर्षीं नव्यानेंच हा खेळ खेळत होता. त्या वेळेस त्याचा खेळ फारसा लक्षांत येण्यासारखा नव्हता. हा केवळ त्याच्या पुढें तळपणाऱ्या सूर्यप्रभेचा अरुणोदय होता. शिवाय त्यावेळीं त्याच्या खेळांत नवयुवकाच्या स्वभावांतील अनावर उल्हास व त्याला जोडून असणारी अनिश्चितता प्रगट होत होती. पण आपण ब्रॅडमनच्या खेळाचा विचार करूं लागलों म्हणजे त्याचा सगळाच प्रकार लोकविलक्षण भासूं लागतो. तो सध्यां जो खेळ खेळतो तो त्याच्या वयाच्या मानानें फारच अवजड आहे असें वाटूं लागते. जी स्फूर्ति अगर जी कला पहाणाऱ्याचें लक्ष वेधून घेतें ती क्वचितच अमानुष असते. रसिक-बुद्धि-स्वरूप यशोदेपासून भगवंतानें अजून आपले जगड्व्याळ स्वरूप झांकून ठेविले आहे. क्रिकेटच्या जगांतील बहुतेक सारी महनीय 'रेकॉर्डस्' त्यानें प्रारंभीच्या तीन वर्षांतच आपल्या पराक्रमी बाहूच्या मदतीनें मोडली आहेत. आपली खेळाची संवय जर तो पुढें अशीच चालू ठेवील तर जगांतील एक सर्वोत्कृष्ट खेळाडू म्हणूनच नव्हे तर 'न भूतो न भविष्यति' असा एक दैवी माणूस म्हणून जग त्याला डोक्यावर घेऊन नाचेल.

हें सर्व लिहितांना सर्वांत लक्षांत रहाणारी गोष्ट म्हणजे त्याच्या खेळांत एकत्रित झालेला सर्व गुणांचा संगम होय! तो एक गुणसागरच आहे. पुष्कळांना वाटतें कीं, लीड्सच्या मैदानावर त्यानें

कांहीं फटके नवीन तऱ्हेनें 'हुक' करून मारले. परंतु लीड्सच्या मैदानावर जुन्या किंवा नव्या कुठल्याही तऱ्हेनें चेंडू 'हुक' करणें कोणालाही शक्य नव्हतें. खेळाच्या पहिल्या दिवशीं चेंडू स्टंप्सइतका उंच उडणें शक्य नव्हतें आणि तो उडतही नव्हता. आणि भू-भागावरून तीव्रतर वेगानें बॉल उडाला नाहीं तर बॅट्समनला 'हुक' तरी कसें करतां येणार? ब्रॅडमनच्या 'हुक' स्ट्रोकबद्दल मी फारसें ऐकलें नाहीं, पण तो 'पुल' मात्र अभिजात रीतीनें करतो आणि हाच फटका त्याचा वैशिष्ट्यपूर्ण आहे. त्याची ग्लान्सवर' फटके मारण्याची पद्धत देवधरांपेक्षां दसपटीनें भेदक आणि वेधक आहे. ग्लान्सला फटका मारतांना देवधरांना आपल्या दोन्ही पायांची पूर्णपणें जरूरी भासते तर ब्रॅडमन मनगटाच्या फिरकीवर लेगस्टँपवरचा चेंडू ग्लान्स-कडे ओढतो. १९३४ सालीं ओव्हल मैदानावर दोनशें बेचाळीस स्कोअर केला तेव्हां त्यानें मारलेले फटके इतके बहुविध होते, कीं त्यानें बोलर वगळून इतर दहाही खेळाडूंना दाही दिशांना नाचविलें. परंतु ३० सालीं त्यानें मारलेल्या बेचाळीस बौंडरीज्मध्यें जवळ जवळ निम्म्या विकेट समोरच मारल्या होत्या. त्याचे 'ड्राइव्ह' आणि 'कट्' हे फटके अर्थातच त्याच्या 'पुल' आणि लेग 'हिट'पेक्षां संख्येनें कमी प्रमाणांत होते. त्याच्या खेळांत या मधल्या तीन वर्षांच्या अवधींत प्रेक्षकांच्या डोळ्यांत भरण्याइतकी सुधारणा झाली आहे. तीस सालींच त्याचा खेळ सर्वांगपरिपूर्ण होता. मग ही सुधारणा तो कशी करूं शकला? प्रफुल्ल सूर्यकमळाला अधिक फुलून आपलें सौंदर्य नटवतां येणें अशक्य होतें; नवरंगांनीं नटलेल्या इंद्रकार्मुकांत अधिक रंग भर-ण्याची काय जरूर आहे? तीस सालीं खेळणाऱ्या ब्रॅडमनपेक्षां १९३४

सार्ली खेळणारा ब्रॅडमन कांहीं सुंदर स्ट्रोक्स नवीन तऱ्हेनें मारीत होता असें थोडेंच होतें ? मग त्याच्या खेळांत झालेल्या या फरकाचें वर्णन मुंबईला प्रसिद्ध होणाऱ्या 'इंडियन क्रिकेट'च्या आक्टोबरच्या अंकांत एस्. जे. सोथरटन या अधिकारी लेखकानें फारच सुरेख रीतीनें केलें आहे. क्रिकेट या विषयावर निर्दोष विचारपरिप्लुत लेख लिहिण्यांत त्यांचा हातखंडा आहे. ब्रॅडमनच्या खेळाचें सिंहावलोकन करून झाल्यावर त्याच्यावर ते समारोपांत म्हणतात, "चार वर्षांपूर्वींचा त्याचा खेळ आजच्याहून फार वेगळा होता. पूर्वींच्या बेछूट तडफदार खेळाला त्यानें आतां आपल्या विचाराची गवसणी घातली आहे. त्याच्या फटक्यांमध्यें आतां जास्त चापल्य दृग्गोचर होऊं लागलें आहे. आणि त्याची नजरही पूर्वीपेक्षां जास्त तीक्ष्ण झाली आहे."

त्याचे दोन पाय विकेटचें रक्षण करणारें एक अभेद्य चिलखतच आहे असें वाटतें. खेळावयास जातांच तो विकेटपाशीं स्वस्थ चित्तानें उभा राहातो. आपल्या डाव्या खांद्यावरून वांकडी मान करून वैनतेयाच्या तीक्ष्ण नजरेनें तो बॉलकडे पहात असतो. त्याचे पाय घुमेपणानें कधींच उभे राहात नाहींत. ते फार अचपळ आहेत, तो पुढें जाऊन फटके मारितो तेव्हां त्याचा डावा पाय अंगावर येणाऱ्या बॉलच्या रेषेंत शक्य तेवढा सामोरा आणतो. बॉल ड्राइव्ह करतांनाही त्याची हीच तऱ्हा असते. त्यामुळें त्याचा खेळ 'सेफ' असतो. मागें खेळतांना आपल्या शरिराचा तोल तो उजव्या पायावर एकेरी रीतीनें सांभाळतो. लेगच्या पुढें जाऊन तो खेळतो. लेगच्या पाठीमागें येऊन खेळणें त्याला सम्मत नसावें असें वाटतें. त्याचा निश्चयही चटकन् ठरला जातो. बोलरच्या हातांतून बॉल सुटला कीं,

कोणता फटका कशा रीतीनें मारावयाचा हें तो मनाशीं ठरवून टाकतो. त्यामुळें त्याची धांदल, गडबड कधींच उडत नाहीं. दुसरा बरोबरीचा गडी खेळत असतांना ज्यावेळीं त्याला बोलरची हालचाल जवळून निरीक्षतां येणें शक्य असते, तेव्हां तो त्याच्या सर्व युक्त्याप्रयुक्त्यांचें सावधान चित्तानें अवलोकन करतो. आणि हें त्याचें कृत्य इतक्या गुपचुपपणें होतें कीं, दूरवरच्या प्रेक्षकांनाच नव्हे तर जवळच्या फिल्डर्सच्या ध्यानांतसुद्धां येत नाहीं. कोठल्याही बोलरला तो ‘ भयंकर ’ समजून खेळत नाहीं. यांत स्वतःबद्दल त्याचा प्रबळ आत्मविश्वास दिसून येतो. ‘ भयंकर ’ म्हणून मानल्या गेलेल्या ‘ बोजला ’ पहिल्या दृष्टिभेटींतच त्यानें तीन वेळां सीमापार केलें. पण त्याबरोबर हेंही लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, कुठल्याही बोलरला तो ‘ सवंग ’ समजून खेळत नाहीं. खरें पाहतां फास्ट बोलिंगवर ‘ पुल ’ करून फटके मारणें अतिशय धोक्याचें आहे. पण स्वतः ब्रॅडमन तेच फटके त्याच बोलिंगवर अत्यंत निर्दोष रीतीनें मारून दाखवतो. कलेचा मोहकपणा आणि विक्रमी पौरुषता यांचा न आढळणारा संगम त्याच्या खेळांत दिसून येतो आणि तो पाहतांच अर्धनारी नटेश्वराच्या जागतिक कलामूर्तीची आठवण येते.

कीर्ति अशी कीं, हा इकडचें पारडें तिकडे फिरवील ! भूमिका अशी कीं, तीनचारशें रन्स म्हणजे त्याला पोरखेळ ! परिस्थिति अशी कीं, इंग्लंड चारशें धावांनीं पुढें गेलेलें ! आणि या एकाशिवाय ‘ खेळणारे ’ असे दुसरें कोणी उरलें नव्हते ! अपेक्षा अशी कीं, आज इंग्लंड जिंकणार ! बुड्ढा पोन्सफर्ड आणि हा एकटा नवजवान, करून करून किती धांवा करतील ? बातमी अशी होती कीं, व्हेरिटी आणि

बोज यांचें बोलिंग फार सुंदर पडत आहे. आणि चमत्कार असा कीं खेळ बंद व्हावयाचे पूर्वी पांच मिनिटें स्कोअरबोर्डवर या वुड्या आणि नवजवान खेळाडूंच्या धांवा अनुक्रमें नॉटऑट २०५ आणि २४४ अशा होत्या. डोळ्यांवर भुरळ पाडणारा हा खेळाचा वकूब प्रशंसनीय नव्हे काय ?

त्याचा खेळ दमदार होण्याचें कारण त्याच्या पायाची द्रुतगतीनें होणारी हालचाल होय. त्याला पीचच्या पुढें किंवा अलिकडे व्हावयाला पराकाष्ठेचा कमी वेळ लागतो. चेंडूचा टप्पा कोठल्या बाजूला येत आहे हें त्याच्या ध्यानांत ताबडतोब येतें. द्विधा मनःस्थिती झाल्यामुळें इतर खेळाडू जे कावरेबावरे होऊन धांदलींत औट होतात तसें ब्रॅडमनचें कधींच होत नाहीं.

फसव्या स्लो बोलिंगवर पुढें जाऊन किंवा फास्ट बोलिंगवर मागें राहून खेळणें एखाद्या दैवीशक्तीच्या अमानुष प्राण्यालाच शक्य होईल. आणि बोलरचा हेतू तरी दुसरा कोणता असतो ! बॅटस्मननें असा कांहींतरी अमानुष खेळावयाचा प्रयत्न करावा, आणि तो साहसीपणा करतां करतांच त्याची विकेट उडावी अशींच मनोराज्यें तो करीत असतो. आणि आपल्या कुशल चेंडूफेकीनें तो आपल्या या घातकी मनोवांच्छितांना सत्यसृष्टींत खरोखर पहात असतो. आपल्या बॉलचा वास्तविक विकेटजवळ पडणारा टप अत्यंत दूर पडणार आहे असा मृगजळवत् आभास तो उत्पन्न करतो. असा आभास निर्माण करतांना बॅटस्मननें पुढें यावें अशी अपेक्षा असते. ब्रॅडमन एक तर मागें राहून खेळतो, नाहीं तर आपल्या हलत्या, चंचळ आणि फसव्या पायानें चटदिशी अंतर कापून तो पुढें होतो, आणि मग एक सारखें तिथूनच

टोले लगावत राहतो. एखादा बॉल अगदींच फसवा आणि परिणामकारक पडला आणि निरूपायानें त्याला पुढें येऊन खेळणें भाग पडलें तर त्या वेळीं खरें पाहतां तो मागें विकेटकडे सरकन सरकतो आणि त्याच्या पायांचें पोलादी चिलखत आपल्या बॅटीमागें बॉलनें बॅटचा फटका हुकवला तर 'संरक्षण' म्हणून तयारींत ठेवतो. आणि या सर्व हालचाली सुयंत्रितपणें होत असताही त्याचे तीक्ष्ण डोळे चेंडूच्या गतीकडे वेधलेले असतात. त्याचा 'बॅक-प्ले' इतका सुरेख आहे आणि नजर इतकी तीव्रतर आहे कीं, त्याला एखादा शॉर्ट लेंथचा बॉल टाकून औट करूं पहाणें म्हणजे मृगराजानें मस्त हत्तीवर तोंडाकडून मोहरा करण्यासारखेंच आहे. ही गोष्ट आतांपर्यंत इंग्लिश बोलर्सच्या लक्षांत आलेली दिसत नाहीं. ते इतरांप्रमाणें याला तसल्याच गोलंदाजीवर बाद करूं पहातात आणि इतरांपेक्षां सर्व रीतीनें वेगळा असलेला असा तो त्यांचें ते इतरत्र प्रभावी ठरलेले बोलिंग हवें तसें चोपून निष्फळ करून टाकतो. ब्रॅडमनचा वुइक पॉईंट तरी कोणता, हा प्रश्न एका विख्यात इंग्लिश बोलरनें सी. बी. फ्राय नांवाच्या एका विख्यात क्रिकेट-तज्ज्ञाला केला त्यावेळीं तो उत्तरला, "त्याच्या बॅटीची रुंदी तीन इंच कमी केली आणि तुमच्यावर देवानें व त्याच्यावर सैतानानें खैर केली तरच तो बाद होईल, एरवी नाहीं!" कवचकुंडलें छिनून घेतल्यानंतर अर्जुनानें कर्णाला युद्धांमध्यें गतासु केलें, यांत अर्जुनाच्या शौर्यापेक्षां कुंतीच्या प्रथम-पुत्राच्या मनाचा भव्य दिलदारपणा दिसून येतो. फ्राय म्हणतो त्याचप्रमाणें ब्रॅडमन बॅटीची रुंदी कमी करून खेळून औट झाला, असें क्षणभर विनोदानें आपण गृहीत धरलें, तरी त्यांत औट करणाऱ्यापेक्षां औट होणाऱ्याचें जास्त कौतुक केलें जाईल!!

## ५

प्रत्येक विवाहित जोडप्यांत कोणी तरी एक मूर्ख असतोच असें म्हणतात, पण नॉटिंगहॅमच्या क्रीडांगणावर ब्रॅडमनला फसव्या बोलिंगवर औट घेऊं पहाणारे दोन्हीही बोलर्स महामूर्ख होते. त्यांचे सारे श्रम अदूरदृष्टीनें केलेल्या विचापरंपरेच्या नादाला लागून वायां गेले. क्रौंच आणि हंस शरत्कालांत अवतरतात तसेंच ब्रॅडमनचे फास्ट बोलिंगवरचे पल्लेदार फटके सुरू होतांच सर्व प्रतिपक्षीय क्षेत्ररक्षक क्रीडांगणांत नाचूं लागतात. दंहीवरानें गुलाब फुलतो ! ब्रॅडमन खेळूं लागतांच रसिकांची वृत्ति उन्मत्त आनंदानें धुंद होऊन जाते! भुजबळानें भाग्यपरीक्षा पहावयास निघणारा हा वीर पॅव्हेलियनच्या बाहेर पडतांच अगणित प्रेक्षक टाळ्यांचा कडकडाट करून मेघडंबरीच्या निनादांत त्याचें स्वागत करितात आणि सर्व गुणांचा राजा जो विनय त्याच्या सान्निध्यानें अवनत झालेली मान उन्नत करून व डाव्या हातानें आपली टोपी काढून ब्रॅडमन त्याचा स्वीकार करतो. व्यक्तिनिष्ठ प्रीतीनें वेड्या क्रिकेट–शोकिनला जर विचारलें, ‘ उत्तम फटका कोणता? ’ तर तो उत्तरतो, ‘ ब्रॅडमन मारतो तो !’ अतिशयोक्तीचा भाग सोडून दिला तरी या उत्तरांत स्वारस्याचा भाग उरतोच.

आशा ही अमर आहे. ब्रॅडमनच्या खेळांकडे लक्ष लावून बसलेल्या प्रेक्षकाला वाटतें कीं, त्यानें मारलेला प्रत्येक फटका क्रिकेटच्या ऐतिहासिक भागांवर एक नवा प्रकाश पाडील. शत्रू खरा पण शूर असें संबो–

धून इंग्लिश खेळाडूही त्याच्या खेळांकडे शिकाऊ वृत्तीनें पहात असतात; आणि तो औट होतांच खिन्न होऊन जातात. 'नवयुग निर्माण करावयास मी येत आहे' असा संदेश कोकिळकंठी भाटजनांबरोबर पुढें पाठवून नंतर पराक्रमाच्या अभिनिवेशांत सूर्य पूर्वक्षितिजावर आपलें आगमन करतो. कुशल खेळ खेळून आज मी रसिकांच्या डोळ्यांचें पारणें फेडणार आहे अशा महत्वाकांक्षेनें प्रेरित होऊनच आपला चरित्रनायक क्रीडांगणावर अवतरत असावा. एखाद्या कुशल कारागिराप्रमाणें त्याचा हात चालत असतो. त्याचा मिडऑनचा विस्मयकारक खेळ पाहून तनु थरारून जाते आणि डोळयांत कौतुकाश्रूंचें वैपुल्य होतें. फुलांफुलांमध्यें रंगलेल्या, सुरम्य छटांप्रमाणें विविध रंगांच्या आवरणानें नटलेला तो अफाट जनसमूह शत्रुत्वाचें नातें विसरून वृथा अभिमान सोडून त्याच्या मोठेपणाचें एकमेवाद्वितीयत्व सिद्ध करतो. गतकालच्या स्मृतिफलकाच्या दूरस्थ जागेखेरीज ज्यांच्या अभिमानाला रहावयाला जागा उरली नाहीं, ते पुराणपरंपरेचे अभिमानी सुद्धां 'ब्रॅडमनच्या नव्या अवतारामुळें जगल्याचें चीज झालें' असें म्हणूं लागलें. त्यांची रणजितसिंगजींची बुजलेली आठवण पुनः ताजीतवानी झाली. रणजितसिंगांनीं दुनीयापार होतांना आपल्या क्रिकेटनैपुण्याचें तर्पण, ऑस्ट्रेलियामधील एका दूरस्थ बालकाच्या स्नेहांजलींत केलें. आर्यसंस्कृति ही प्रबोधशील आणि गुणग्राही आहे. सजातीयत्वाचा दुराभिमान तिच्या ठायीं निवास करूं शकत नाहीं. एरवी रणजींनीं इतक्या लांबचा देश धुंडाळून संकल्प सोडला नसता. नशिबाचा शिकंदर असलेला शिकंदर जगाला जिंकावयासाठीं निघाला आणि प्रतिकूल दैवावर मात करून विजयाची कौस्तुभमाला आपल्या स्वतंत्र राष्ट्राला मिळवून द्यावयाला

ब्रॅडमन बाहेर पडला. एक समरांगणांत महशूर आणि दुसरा क्रीडांगणांत आजिंक्य परंतु दोघांचें स्वभाव मात्र भिन्न. एक दैववादी तर दुसरा कार्यवादी !

विविध प्रसंगांच्या परिणतीचें आपण कार्यवादी आहोंत हें त्यानें सिद्ध करून दिलें आहे. तो क्रीडांगणावर खेळत असला म्हणजे मूर्तिमंत प्रसन्नता वागडत आहे असें वाटतें. माणसाची अब्रू कांचेप्रमाणें आहे असें म्हणतात. एकदां अब्रू गेली कीं गेली. त्याचप्रमाणें क्रिकेटमध्यें विकेट एकदां उच्छिन्न झाली कीं झाली. एकीकडे तुफान वेगानें धांवाचा आंकडा वाढवितांना तिचें शांतपणें संरक्षण करणें ही अत्यंत कठीण व असाध्य गोष्ट ब्रॅडमननें शक्य करून दाखविली आहे. धन्वंतरीनें अंतकाळाच्या दाढेंतून रुग्ण माणसाला वाचवावें; गाढ अंधःकारांतून प्रवास करतांना इरेला पेटलेल्या विद्युन्मालेनें आपला प्रखर प्रकाश प्रकट करून प्रवाशाला मार्ग मोकळा करून द्यावा. तसा प्रकार ब्रॅडमन क्रीडांगणावर खेळूं लागतांच सुरू होतो. प्रतिपक्ष्याच्या तापत्रयानें बेजार झालेल्या आपल्या गलित धैर्यसंघाला तो आपल्या कौशल्यपूर्ण क्रीडासंजीवनीनें नवचेतना देतो. एरवी कंटाळवाण्या वाटणाऱ्या इतरेजनांच्या धुंद आणि सुस्त वातावरणांत ग्लान्सकडे फटके मारणारी त्याची विजयी बॅट विद्युन्वेगानें तळपूं लागली म्हणजे 'मजा' नाहीं म्हणून तंबूमध्यें मस्करी करीत सिगारेट फुंकीत किंवा झोपा काढीत बसलेल्या लब्धप्रतिष्ठितांना तो आपल्या लौकिकाच्या सारंगीवर अवर्णनीय, बांकदार आणि जोरदार खेळाच्या धनुकलीनें सुस्वरा निर्मिती करून जागें करतो. निर्दोष वाक्यरचना, वेंचक शब्दांचा योग्य उपयोग, प्रकरणांची परिश्रमपूर्वक विभागणी, रसपरिपोषक संभाषणें, स्वाभाविक स्वभावपरिपोष,

ता.
ता. ता.



अनुकूल आणि वास्तविक वातावरण उत्पन्न करणारी वर्णनें, यांच्या समुच्चयानें उत्कृष्ट कथालेखकाची अभिजात कलाकृति वाचनीय आणि मननीय ठरते. ब्रॅडमनचा विस्मयकारक खेळ पहातांना एखाद्या सुंदर ग्रंथाचीं पानें एका मागें एक डोळ्यांपुढें उलगडलीं जात आहेत असें वाटतें. त्याच्या चेहऱ्याकडे पहातांना प्रेक्षकांना कधींही धांदलीचा गलगलाट, खेळ करतांना सांपडत नाहीं. ' मी अजिंक्य आहें! ' असें अभिमानाचे उद्गार प्रत्येक फटकारलेल्या फटक्याबरोबर विलग होणाऱ्या त्याच्या बांकदार आणि नितळ ओष्ठयुग्मांतून निघत आहेत अशी कल्पना व्हावी इतक्या अभयवृत्तीनें तो खेळत असतो. कव्हरपॉईंटवर बॅट किंचित् तिरकी करून तो भुईसरपट चेंडू मारतो तेव्हां हरित्तृणांकुरावरून आरक्त अशा त्या कंदुकावर दृष्टी ठरतच नाहीं. इवल्याशा मासळीनें जलवीचींना उभा छेद करीत पैलतीर गांठावा तसें वाटतें.

क्रीडांगणावरच्या या प्रगल्भबुद्धीच्या जादुगाराच्या पोतडींत आणखी अशा नजरबंदीच्या कितीतरी गोष्टी असतील कीं, अनंत अवकाशांत अनंत अंतरें उंच असलेल्या अमर आणि अढळस्थानाप्रमाणें अद्याप तुम्हां आम्हाला अज्ञातच आहेत. 'एकीं'तून 'अनेक' पहाणें हें विज्ञान आणि ' अनेकां 'तून 'एक' पहाणें हें ज्ञान ! ' ज्ञान ' आणि 'विज्ञान' ही तुफान उंचीवरील जोडी ब्रॅडमनसारखा कुशल सारथीच आवरून धरूं शकतो. एकाच प्रकारच्या चेंडूवर अनेक तऱ्हेचें फटके मारून तो आपलें खेळांतील विज्ञान प्रकट करतो आणि खेळ पहाणाऱ्या प्रेक्षकांची विज्ञानबुद्धि विविध फटके पाहून रोमहर्षितवृत्तीनें स्वगृहीं जातांना एका ब्रॅडमनच्याच अचपळ आकृतीची कल्पनाचक्षूंसमोर घोळवाघोळव करीत असतें. लक्ष्यवेध करणाऱ्या मध्यम पांडवाप्रमाणें

त्याचा खेळ अचूक होतो. कुशल आणि नामांकित खेळाडूंच्या अंगचें फूटवर्क. शक्तीची काटकसर, खेळांत लागणारी सावधानता हें सर्व गुण त्याच्या अंगीं परिपूर्ण आहेत. एवढेंच नव्हें तर या गोष्टी तो करतलमलवत् मानतो. खेळाच्या आधीन तो असण्यापेक्षां हा खेळ त्याच्या आधीन आहे असें म्हणणें बरोबर होईल. खेळांतील त्याची दानत मारवाडी कंजूषपणाची नसून एखाद्या लक्षाधीश भाटियासारखी आहे, तो हात राखून किंवा 'नाटक' करून कधींच खेळत नाहीं. तो लीलेनें खेळतो आणि औट होतो तेंही लीलेनेंच. त्याच्या खेळांत न्यून असेल तर तें एवढेंच कीं, तो परिपूर्ण आहे!

# ६

जग ' अपूर्णाची ' पूजा करितें. कवि कळीवरच काव्य रचतो संपूर्ण फुललेला सुमनावर नाहीं ! चित्रकार सूर्योदय रंगवितो अगर कधीं सूर्यास्तही चितारतो. पण माध्यान्ह कधींच रंगवीत नाहीं, प्राणिमात्र लहान बालकांच्याच क्रीडेनें प्रफुल्लित होतो. कविसम्राट कालिदासानें अमरकाव्य शाकुन्तलाची समाप्तीही अपूर्णावस्थेंतच केली आहे. कारण त्यानें त्यांत दुष्यंत शकुन्तला यांची फक्त पुनर्भेटच होऊं दिली आहे. कालानें केलेलें त्यांचें करग्रहण नाटकांत दाखविलें नाहीं. ब्रॅडमनचा खेळ एखाद्या यंत्राप्रमाणें बिनचूक होतो हाच त्याच्या खेळांतला मोठा दोष होय. ब्रॅडमनसारखे आणखी पांच दहा खेळाडू निपजतील तर क्रिकेटसारख्या अनिश्चित वातावरणांतच रंगणाऱ्या खेळांतील सारे रंग लुप्त होतील. एका व्यक्तीची ही केवढी ताकत! देवमाशानें जन्मदात्या रत्नाकराच्या प्रवाहाची दिशा बदलून टाकावी किंवा वल्लरीनें वृक्षशाखा निर्जीव करून टाकावी तसेंच हें! या प्रतिभासंपन्न कलकोविदानें या खेळाचें भवितव्य आपल्या पराक्रमानें धोक्यांत आणून ठेविलें आहे. अनेक हॉब्ज, असंख्य लारवूड, आणि अगणित नायडू देवधर, निर्माण झाले तरी या खेळांत क्रांती होणार नाहीं. पण आपल्या क्रीडानैपुण्यानें प्रत्यक्ष हॉब्जला ' वाहवा! ' म्हणावयास लावणारा ब्रॅडमन—आणि लारवुड नायडू यांसारख्या अकरा खेळाडूंशीं एकटा लढणारा ब्रॅडमन—जर अनेकांनीं आत्मसातसा करून ठेवला तर काय होईल ? ठरलेल्या

मुदतींत मॅच संपावयाची नाहीं. स्कोअरबोर्डवर बेरजेचा आंकडा मांडणाऱ्या पोऱ्याला चार चार आंकड्याच्या संख्या लावाव्या लागतील आणि कल्पनेला सैल सोडलें तर 'वॉटर्लूची लढाई नेपोलियननें जिंकली असती तर?' यावर हचिन्सननें जेवढा ग्रंथ निर्माण केला तेवढा ग्रंथ निर्माण करतां येईल.

तर्क असाधारणपणें ताणला तर त्याचें तर्कट होतें. सागराच्या फेनशुभ्र लाटांचें वैभव विहारनौकेंतून प्रेक्षतांना प्रलयाच्या विक्राळ कल्पनेचें जंजाळ डोळ्यांत खेळवणारा मनुष्य 'स्क्रु' ढिल्यांतच असला पाहिजे. मोठ्याचा मोठेपणा कबूल केल्यानंतर मान तुकवावयास विलंब करण्यांत अर्थ काय ?

असा शूर आणि विक्रमवन्त खेळाडू निर्माण व्हावा म्हणून आपण आजवर परमेश्वराची अनन्यगातिक वृत्तीनें प्रार्थना करीत होतों.' शत-सूर्यमालिकांच्या शत आर्ति व्यर्थ झाल्यानंतर' करुणा येऊन परमेश्वरानें आपल्या या प्रेषिताला जन्माला घातले. विद्वान आणि प्रतिभासंपन्न कवीप्रमाणें शास्त्र आणि कल्पना यांचा वेधक संगम ब्रॅडमनच्या खेळांत झालेला आहे. पहिल्या दिवशींच टेस्टमॅचमध्यें तुफान बोलिंगवर सफाईदारपणें घोंसदार तीनशें धांवा काढणारा ब्रॅडमन, आपणांपुढें वावरत आहे. कांहीं लेखक त्याला क्रिकेटमधला 'लिंडरस' म्हणून संबोधतात. पण हें कांहीं यथायोग्य गुणवर्णन करणारें संबोधन नाहीं. सहा तुटक्या तंगड्यावर उभारलेल्या बिलियर्ड टेबलांत आणि हजारों प्रेक्षकांना नीटपणें पाहूं देणाऱ्या ओव्हल मैदानांत जेवढा फरक तेवढाच फरक दोघांच्या लौकिकांत!

अभयवृत्ति, स्मितवदन, शिस्त, दीर्घोद्योगाची आवड, आणि विस्मय-

कारी वाटणारा आत्मविश्वास या गुणांवरच ब्रॅडमनच्या या अतुलमहतीचें सुवर्णमंदीर उभारलें गेलें आहे. रोमांचकारी प्रसंगांतून तो शीरसलामत सुटून गेला आहे. सबंध संघाची बाजू कोलमडून पडली आहे. एकामागून एक ऑस्ट्रेलियन वीर इंग्लिश गोलंदाजीचें भक्ष्य होत आहेत आणि यामुळें प्रत्येक खेळाडू हवालदील झाला आहे; अशा वेळीं तो पुढें होतो आणि जयश्रीला खेंचून आणतो. ही अमर्याद ताकद या एकट्याच रणसिंहाच्या अंगांत आहे. नायडू १९३४ सालीं खेळले तसें प्रसंग जाणून जीव कुरबान करणारे खेळाडू अनेक आहेत. नायडू सेंचरीज् काढील पण स्वतःच्या टीमची 'वाटर्लू' त्यांना थांबवितां येणार नाहीं. जार्डीन काय हॉब्ज् काय अगर हॅमंड काय यांचीही तऱ्हा आपल्याकडील खेळाडूसारखीच आहे. धावांचें एक शतक फलकावर लागलें कीं झाले कृतकृत्य! त्यांत पुनः शंभर वेळां जीवदान मिळालेलें असावयाचें! फिल्डर्सच्या चुकीवर अगर बोलर्सच्या कमकुवतपणावर आधारलेला स्कोअर कुचकामी! मैलभर चालतांना दहाबारा ठिकाणीं विश्रांती घेण्यासारखेंच हें! फिल्डर्सना एकदांही झेल झेलावयास संधि न देतां उत्तम बोलर्सचे प्रत्येक चेंडू उत्तम पडत असतां एम्.सी.सी.च्या खेळाडूंनाही लाज वाटावयास लागणारें क्षेत्ररक्षक असतांना फळ्यावर अप्रतिहतपणें शून्यापासून तीनशेपर्यंत धांवा झळकविणारा दुसरा एखादा खेळाडू जगांत आहे काय? तारका अनंत आहेत पण शुक्राचें तेज शुक्राचेंच जवळ! पर्वत ठायीं ठायीं आहेत पण हिमालय एकच आहे! टेम्स नदी आहे, ब्रह्मपुत्राही आहे पण जगन्नाथरायानें थयथय नाचावयास लावलेली शुभ्र गंगा एकच आहे! अतिशय प्रतिभासंपन्न असे संस्कृत कवि कांहीं थोडे नव्हते. परंतु शाकुंतलासारखें

अमरकाव्य ज्याच्या रसाळ वाणीमधून स्रवलें गेलें असा कालिदासही एकच होता. यावनी राज्याला थरथर कापावयास लावणारे वीर मराठेशाहींत अनेक होऊन गेले. पण त्यामध्येंही शिवाजी महाराज एकच निघाले ! खेळाडु अनेक झाले आहेत, आणि होतीलही परंतु ब्रॅडमनसारखा खेळाडू ब्रॅडमनच होय !

* * *

अंत:करणांत खळबळ करून टाकणारा तो प्रसंग होता. गोष्ट कांहीं फार पूर्वींची नाहीं. पुरतें वर्षही झालें असेल नसेल. १९३४ सालीं झालेल्या टेस्ट्समधील. चवथी मॅच ऑस्ट्रेलियाला कोणी जिंकून दिली असें विचारलें तर मी म्हणेन ज्यानें पांचवी टेस्ट मॅच जिंकून दिली त्या डॉन ब्रॅडमननेंच ही चवथी मॅच जिंकली. आणि मी म्हणतों तें कांहीं खोटें नाहीं. कारण असें ! इंग्लंडचे सर्व गडी बाद होऊन २०० धांवा फळ्यावर फडकल्या. नंतर अवकाश अगदीं थोडा उरला होता, म्हणून ऑस्ट्रेलियन टीमचे दोन गडी खेळावयास गेलें; वस्तुत: त्यांनीं शक्य तोंवर उरलेला वेळ प्रतिपक्षांचे चेंडू अडवूनच घालवावयास पाहिजे होता—अगदींच सहज निघाली तरच एखादी धांव काढावयाची. टेस्ट मॅच खेळणाऱ्या खेळाडूला कांहीं या गोष्टी दुसऱ्यानें शिकवावयास नकोत. परंतु ऐन वेळेस भान हरपून जातें आणि त्या वेळींही तसेंच झाले. खेळाला सुरवात झाली. पोन्सफर्ड आणि ब्रौन ही जोडी खेळावयास गेली. अगणित प्रेक्षकांच्या द्विगुणित वारांनीं त्यांचे स्वागतार्थ टाळ्या पिटल्या. ३७ धांवा या दोघांनीं हंसतखेळतच काढल्या. पोन्सफर्डनें फॉरवर्ड मिडऑनच्या बाजूला एक सफाईदार टोला मारला.

ता. ……… आ. क्र.



ज्या चेंडूवर तो टोला मारला होता तो एक लेगब्रेक होता. बोजचे बोलिंग तुफानच पडत होतें. कारण दोन्ही खेळाडू पूर्णपणें विचार करूनच खेळत होते; नंतर बोलर्सनीं आपल्या दिशा बदलल्या आणि मग तर त्यांचें बोलिंग फारच प्रभावी ठरलें. ब्रौनचा त्रिफळा उडाला. त्याची जागा ओल्डफील्डनें घेतली. ऑस्ट्रेलियन टीमच्या बुरजाला पडलेलें खिंडार बुजवावयाला हा वज्रदेही वीर पुढें आला. पूर्वलौकीक पाहिला तर ओल्डफील्ड उरलेला वेळ खेळणार असें दिसत होतें. एका ऑफब्रेक चेंडूला तो कट् करावयाच्या बेतांत होता. चेंडूला बॅट लागली पण अर्रर्र! जरा ओझरतीच लागली. चेंडू उडाला आणि ॲमेजसारख्या निष्णांत स्लिपफील्डरच्या हातांत अचूक जाऊन बसला. ही विकेटही 'बोज'लाच मिळाली. अशा आणीबाणीच्या वेळीं ओल्डफील्डसारख्या जबाबदार खेळाडूनें असलें 'अरिष्ट' करावयास नको होतें. त्याच्या नंतर जगांतला पहिल्या नंबरचा यष्टिरक्षक वुडफूल आला. खेळ संपावयास फक्त पांचच मिनिटें होतीं. बोजचा पहिला बॉल त्यानें लगावला. बोजची तुफान गोलंदाजी ऐन रंगांत आली होती. त्याचा दुसरा चेंडू सूं सूं करीत आला आणि तीनही स्टम्पस् तीन दिशांना उडाल्या. हे तीनही सेंचरी बॅटस्मेन आजचे वीर नव्हते. आजचा वीर बोजच होता. अवघ्या ३९ धांवांत त्यानें तीन राक्षसी खेळाडूंचा खुर्दा करून टाकला. खेळ संपला तेव्हां, आस्ट्रेलियन खेळाडूंचे चेहरे पाहाण्यासारखे झाले होते. बोजला तर इंग्लिश प्रेक्षकांनीं कटिखांद्यावरून पॅव्हेलियनमध्यें नेलें. हंसणाऱ्या इंग्लिश टीमकडे आणि कष्टी ऑस्ट्रेलियन टीमकडे पाहून एक छोटी व्यक्ति मनांतल्या मनांत हंसत होती. वुडफूलचें लक्ष तिकडे वेधलें; तेव्हां तो चिडून म्हणाला, "डॉन, हंसतो आहेस काय?

प्रसंग कोणता आहे तिकडे लक्ष दे जरा !" मनांत हंसणारा ब्रॅडमन मोठ्यानेंच हंसू लागला आणि उत्तरला, "वुडफुल महाराज ! मी एकटाच हंसतों आहे पण उद्यां तुलाच काय पण सगळ्यांना हंसवीन."

*   *   *

इंग्लंडमधल्या वृत्तपत्रकारांनीं ब्रॅडमनचा खेळ पूर्वीसारखा राहिला नाहीं असा डांगोरा पिटण्यास आधींच सुरुवात केली होती. विशेषतः पहिल्या तीन टेस्टस्मध्यें ब्रॅडमन जरा लवकर बाद झाल्यामुळें ते जास्तच वाहवले होते. त्या दिवशीं संध्याकाळच्या दैनिकांनीं त्या दिवशींच्या खेळाचें अगदीं भडक रंगांत वर्णन करून बोजची पाठ थोपटली होती. शिवाय तीवर असेंही लिहिलें होते, "ब्रॅडमनला म्हणावें असशील खरा खेळाडू तर दाखव तुझा पराक्रम उद्यां ! बोजचें बोलिंग चोपशील तरच तूं खरा वीर ! ज्या ओव्हरमध्यें बोजनें ओल्डफील्ड आणि वूडफुल यांना परत घालविलें ती ओव्हर अजून संपली नाहीं. त्या ओव्हरींतील उरलेल्या दोन चेंडूंत इजा, बिजा, तिजा करून बोज तिसरा बळी घेतल्याशिवाय रहात नाहीं !"

*   *   *

लग्नघटकेकडे आतुरतेनें लक्ष लाऊन बसलेल्या प्रणयी नायकनायिकांच्या आणि दुसरा दिवस केव्हां उजाडतो आणि खेळ केव्हां सुरूं होतो आणि आम्हीं तो केव्हां पहातों असें वाटणाऱ्या प्रेक्षकांच्या डोळ्यांतील आत्यंतिक उत्सुकतेचें पाणी सारख्याच रंगाचें असेल. पाऊस पडावयाच्या आधीं आकाशांत मेघावली घोटाळतात आणि मेघनिनादाप्रमाणें आपल्या

टाळ्यांच्या कडकडाटांत खेळ सुरू व्हावयाच्या आधीं बराच वेळ लीड्स्चें मैदान भरून टाकलेल्या सहस्रावधी प्रेक्षकांनीं पॅव्हेलियनमधून पोन्सफर्डबरोबर बाहेर पडलेल्या ब्रॅडमनचें स्वागत केलें. केवढा उत्साह भरलेला होता त्या स्वागतांत! राजाला हेवा वाटावा, सम्राटानें अभिलाषा धरावी, महत्वाकांक्षी बालबुद्धीनें मनोरे बांधावे असें तें स्वागत! आज पोन्सफर्डबरोबर 'डॉन' खेळावयास येईल अशी प्रेक्षकांची कल्पनाही नव्हती. इंग्लंडचे क्षेत्ररक्षकसुद्धां थोडें मनांत चपापले. गजगतीनें वाट चालतांना रोडे दाबीत दाबीत पुढे जावे तसें विकेटकडे मंद गतीनें डौलदार पावलें टाकीत जाणाऱ्या डॉननें किती तरी इंग्लिश अंतःकरणें पददलित केलीं! आदल्या दिवशीं वर्तमानपत्रकारांनीं केलेली त्याची कुचाळी त्याच्या हृदयाला भिनली होती. पराक्रमी माणसाचा पराक्रम वज्रासारखा असला तरी त्याचें अंतःकरण आणि हृदय हें कमलासारखें कोमल आणि रेशमासारखें हळुवार असतें.

आज पोन्सफर्डबरोबर मॅकेब खेळावयाला येईल अशी अपेक्षा होती. नामांकित खेळाडू हॉब्ज हा प्रेसटेंटमध्यें The Star या इंग्लिश वृत्त पत्राकरितां बातमीदार म्हणून आला होता. तोसुद्धां मॅकेबचीच अपेक्षा करीत होता. ब्रॅडमनची मूर्ती हॉब्जच्या डोळ्यांत शिरतांच तो आपल्या जवळच्या रिपोर्टरच्या पाठीवर थाप मारून म्हणाला "आज तुला डॉनचा खेळ पहावयाला मिळेल!" हें कथन एका काळीं इंग्लिश टीमच्या कर्णधार म्हणून विराजित असलेल्या कुशल खेळाडुच्या अनुभवावर आधारलेलें होतें.

खेळावयास जातांना 'आजचा दिवस माझा' असेंच तो मनांत म्हणत असावा. कारण त्याच्या डोळ्यांत प्रचंड आत्मविश्वास प्रति-

बिंबित झालेला दिसत होता. आणि झालेही तसेंच! तो दिवस डॉनने स्वतःसाठींच राखून वेगळा काढून ठेवल्यासारखा खेळून घेतला. पॅव्हेलियनमध्यें पायांत पॅडस् आणि हातांत ग्लोव्हज् बांधून बसलेल्या मॅकेबला मावळला रवि तरीही कच न आढळला, म्हणाऱ्या मोरोपंती देवयानीप्रमाणें संध्याकाळ झाली तर कोणी औट झालेला दिसला नाहीं.

लेग आखून घेऊन त्यानें खेळास प्रारंभ केला. इंग्लंडचा तुफानी गोलंदाज बोज आपल्या प्रभावी ठरून दोन बळी घेणाऱ्या गाजलेल्या ओव्हरमधील राहिलेले दोन चेंडू टाकण्यासाठीं मोहरा करून राहिला.

एक जगप्रसिद्ध बोलर होता!

एक त्रिखंडविख्यात बॅटस्मन होता!

एक गज होता तर दुसरा गजेंद्र होता!

तरवारीवर तरवार पडणार होती!

वज्रावर वज्रघात होणार होता!

डोळ्यांत जीव आणून सर्व एकाग्रतेनें खेळाची सुरुवात पहात होते! टांचणी पडली असती तर आंधळ्यानेंही आवाजावरून शोधून काढली असती!

स्टार्ट घेण्यासाठीं बोज मागें गेला. नंतर तो द्रुतगतीनें धांवत आला. व बंदुकींतून गोळी सुटावी तसा त्याच्या हातातून चेंडू सुटला.

तो बॉल भयंकर होता!

जॉर्डीन वॉल्टर्स यांनीं नुसता अडवलाही नसता!

त्यांची दांडी उडाली, असें मीं म्हणत नाहीं, असें हॉब्ज म्हणतो.

आणि त्या ओव्हरचा गाजावाजा झाला नसता तर —

ब्रॅडमननें............

पण ब्रॅडमन आज खेळावयास गेला तो बोजचे ते रिक्त दोन चेंडू चोपण्यासाठींच ! तेवढ्याकरितां त्यानें मॅकेबला मागें ठेवलें. आणि तेवढ्याचकरितां बोजनें आपलें शक्तिसर्वस्व ह्या दोन बॉल्स-मध्यें घालावयाचें ठरविलें ! स्लिपमध्यें वॉल्टर्स होता, लेलंड होता, खुद्द वॅट होता ! चेंडू अचूक झेलण्यांत पटाईत होते ते !

पोपटाचा मर्मच्छेद करावयास सुटणाऱ्या तीरासारखा विकेटचा छेद करावयाला तो चेंडू निघाला.

तीन फूट अलिकडे टप पडला......आणि लेगस्टंपकडे तुफान वेगानें तो घुसूं लागला.

डोळ्यांचें पातें लवतें न लवतें तोंच उल्का पडावी अगर वीज चमकावी तशी डॉनच्या मुठींत बसलेली बॅट गरकन् फिरली. चेंडू आणि विकेट यांमध्यें चार पांच इंचांचें अंतर असेल नसेल......

सर्व सामर्थ्य एकवटून डॉनच्या वज्र बॅटीनें तो चेंडू 'हुक' केला. जितक्या वेगानें आला त्याच्यापेक्षां कमी नव्हे—जास्त वेगानें तो मारला गेला. वॉल्टर्स आणि लेलंड यांच्यामधून तो गेला त्या दोघांनाही तो चेंडू केव्हां मारला गेला हें समजलें नाहीं. अर्थात् तो अगदीं जवळून जाऊनही त्यांना अडवितां आला नाहीं.

'बौन्डरी'......'सीमापार' !

अंपायरच्या झग्यांतून बाहेर आलेला हात वाटोळा त्याच्या अंगा-भोंवतीं फिरला. टाळ्यांचा प्रचंड कडकडाट झाला ! नेव्हिल कार्डस् आपल्या 'गुड क्रिकेटमध्यें' या बौन्डरीबद्दल म्हणतो,...'तें एक साहस होतें ! It was adventurous attempt. हॉब्ज म्हणतो, 'डॉन ब्रॅडमन क्रिकेटसम्राट खरा पण त्याला-

सुद्धां तसला अवघड फटका पुन: मारवणार नाहीं, त्या दिवशीं तरी त्यानें तो मारला म्हणजे तें एक आव्हान होतें म्हणून!—' आणि हें हॉब्जचें म्हणणें खोटें नाहीं.

आदल्या दिवशीं वर्तमानपत्रांत कुचाळीचें पीक पिकलें नसतें तर हा महेश्वर या विषप्राशनाच्या भानगडींत पडला नसता.

अभिमान मरून द्यावयाचा नसेल तर मान मृत्युच्या जबड्यांतच द्यावयास पाहिजे.

पहिल्या चेंडूची झालेली ही दुरावस्था पाहून खवळून गेलेल्या बोजनें आपली शेवटची चेंडूफेक कशी केली असेल हें कल्पनेनें तर्कितां येण्यासारखे आहे.

गारेवर गार, चकमकीवर चकमक, हिरकणीवर हिरकणी पडली.

पहिला चेंडू त्यानें आपल्या सामर्थ्याची एकमेळणी करून टाकला होता. आतां उरलेला दुसरा चेंडू टाकतांना त्यानें आपलें चतुरस्र चातुर्य उपयोगांत आणलें.

आसुरांचें निर्दलन करण्याला देव मोहिनी स्वरूप झालें. कंचनीनें भोळ्या भाबड्या सावजावर कामुक नेत्रांच्या कट्यारी चालवून त्यांना घायाळ करावें तसा 'मी साधा आहे, सोपा आहे' असें दाखवित तो चेंडू येत होता. एक क्षणभरच डॉनच्या मनाची चलबिचल झाली; पण अतर्कित भविष्यकाळांतून अनंत भूतकाळाच्या उदरांत घाईनें घुसूं पहाणाऱ्या दुसऱ्या क्षणांत तो सावधान पावला. त्यानें ओळखलें, 'या शुभ्र फुलाच्या आंत काळा सोमल आहे.' या मोहक इंद्रधनुष्याच्या आंत डोळ्यांच्या उघडझापींत जगाला खाक करून टाकणारी विद्युतमोहिनी आहे. या राखेआड चालताबोलत्या जगाला बेचिराख करणारा अंगार आहे....

डॉन ब्रॅडमन सावधान झाला. आणि खूप पुढें जाऊन चेंडूनें आपलें भयंकर स्वरूप प्रगट करावयाच्या आधींच त्यानें चेंडूला ग्लान्स घेऊन सीमापार केलें.

नाराज झालेल्या बोजनें अंपायरकडून टोपी मागून घेतली आणि तो मनांत पुटपुटला, 'आजचा रंग जरा वेगळा आहे.' आणि बोजनें नाराज न व्हावें तर काय व्हावें ? त्याच्या त्या दोन बॉल्सनीं जगांतल्या कोठच्याहि दुसऱ्या खेळाडूची विकेट उडविली असती ! पण डॉन जगावेगळा आहे. तेच भयंकर दोन चेंडू त्यानें सीमापार करून दाखविले.

सहस्रावधि प्रेक्षकांनीं 'बक अप डॉन' म्हणून चीत्कार केला. डॉनच्या सुंदर खेळानें त्यांना भानरहित केलें.

आणि हा नुसता प्रारंभ होता. कमल नुसतें उमलावयाला लागलें होतें......सूर्योदयापूर्वीची ही केवळ अरुणप्रभा होती...पराक्रमापूर्वीचा हा भुभुःकार होता. पुढें पडणाऱ्या मुसळधार पर्जन्याचें हे पहिलेच दोन टपूरे थेंब होते.

मराठी ग्रंथ संग्रहालय
ग्रंथ क्र.
ता.
ठाणे

७

कीर्तन, गायन, नाटक याप्रमाणें खेळालाही रंग चढावयाला वेळ जावा लागतो. सूर्य सप्तम स्वर्गाच्या दारांतून आपल्या आरक्त कर-जालांनीं भूगोलार्धाला कुरवाळीत होता. लीड्‌स्‌च्या क्रीडांगणावर त्याचें लंबरूप किसलय किरण गगनांतून येत होते. त्याचें प्रफुल्ल मुखबिंब पाहून जणूं काय ब्रॅडमनचा तुफान खेळ फ्री पासांत पहावयास मिळत आहे, म्हणून त्याला अभिमान वाटत होता असें वाटें. मिकिमाऊसच्या भूमिकेनें रंगलेल्या कार्टूनमध्यें, चित्रपटांतील सूर्यचंद्राची हालती बोलती चेष्टेखोर आकृति पाहून 'वाह्यांत' बनलेल्या आजकालच्या तरुण बुद्धीनें अशा तऱ्हेच्या कल्पना कराव्यात यात नवल नाहीं. सूर्यचंद्रांचें दैवी सामर्थ्य अमान्य करणाऱ्या क्रांतिकारक अभिनव नव्या युगाचा 'वर्तमान' काळही 'सुप्रभाति सूर्यरिघे'ची वेळा आहे. असल्या असनातनी कल्पना एखाद्याला सुचणें हें त्या क्रांतीचें एक प्रतीक आहे.

'स्टार्ट' वरून प्लेटमधील कोणता अबलख घोडा जिंकणार आणि कोणता प्लेस होणार हें गॅलरींतल्या 'हरीच्या लाला'ला सांगतां येतें. पुढच्या कथेच्या अनुरोधानें कथेकऱ्यानें आपल्या कथेचा पूर्वरंग रंगवावा, तसें ब्रॅडमननें आपण पुढें कसें खेळणार आहोंत याची कल्पना बोजचे पहिले दोन चेंडू फटकारून करून दिली.

बोजच्या फास्ट बोलिंगच्या दुसऱ्या ओव्हरमध्यें ब्रॅडमननें स्क्वेअर-कटकडे आणखी एक बौन्डरी ठोकली. पुढें लेगला एक फटका मारून

त्यानें दोन धांवा मिळविल्या. त्याचा हा हातघाईचा खेळ पाहून आज डॉन तीस सालची पुनरावृत्ति करणार असें स्पष्ट दिसू लागलें. दुसऱ्या बाजूनें मिचेल बोलिंग करीत होता. वॅट सिलिमिड् ऑफला होता वॅटला तेथें पाहतांच ब्रॅडमनची फटक्याची दिशा बदलली. खडक पाहून तांडेलानें सुकाणु बदलावें यांत नवल तें काय ? वॅट तेथें उभा होता तोपर्यंत तेथें एकही चेंडू गेला नाहीं. थोडक्याच वेळांत मिचेलचें बोलिंग कुचकामीं ठरलें आणि व्हेरिटी आपला प्रभाव दाखवूं लागला.

यश प्रयत्नसाध्य असलें तरी अतिरेकाला पोंचलेली महत्त्वाकांक्षा प्रयत्नांनीं व्यवहारांत नेहमींच पूर्ण होईल असें नाहीं. पाण्यानें आगच विझत नाहीं असें कळल्यावर ती तेलानें विझवावयाचें साहस कोणी करील असें वाटत नाहीं.

मिचेल आणि व्हेरिटी यांच्या बोलिंगमध्यें फारसा फरक नाहीं. दोघांनाही लेगस्टंपवर संधान करावयाची संवय आहे. आणि दोघांचीही लेंग्थ सारखीच आहे. फरक असलाच तर तो एवढाच कीं, व्हेरिटीच्या अंगी जास्त चिकाटी आहे. अमरसिंगाला १९३४ सालीं संबंध दिवसभर हंसतमुखानें बोलिंग करतांना पाहून मला व्हेरिटीची आठवण झाली.

बोज बोलिंग करीत असतांना स्लिपफिल्डिंगची रचना विलक्षण रीतीनें बदलण्यांत आली. शॉर्टलेगला एकच फिल्डर होता. फर्स्ट स्लिपचा फिल्डर दुसऱ्या स्लिपफिल्डरपासून बऱ्याच अंतरावर उभा राहिलेला दिसत होता. एरवीं खेळाडूच्या जवळ किंचित तिरका उभा राहणारा नेहमींचा क्षेत्ररक्षक आज विकेटमागें विकेटकीपरच्या उजव्या हाताला उभा होता. व्हेरिटी बोलिंग करीत असतांना शॉर्ट-

लेगवर (एकच), मिडऑफ, लॉंगऑफ, डीप एक्स्ट्रॉकव्हर (सीमारेषे-जवळ), कव्हर आणि स्क्वेअरकव्हर अशी फिल्डिंग ठेविली होती. स्लिपमध्यें एकच मनुष्य ठेवला होता. बोज ऑनसाईडला मिडविकेटे-वर उभा होता.

बोजनें आपली चवथी ओव्हर टाकली. तेव्हां ब्रॅडमननें त्याला कव्हर पॉईंटवर आणि लेगकडे चारचारचे फटके मारले. उरलेले चार त्यानें नुसते अडविले. यावरून ते चारी चेंडू चांगले पडले असावेत असें वाटतें. या पुढच्या ओव्हरमध्यें बोजनें फिल्डिंगमध्यें फरक न करतां कांहीं शॉर्ट बंपर्स टाकले. पोन्सफर्डला ते खेळतां आले नाहींत. त्यानें नुसते ते अडविले परंतु ब्रॅडमननें स्वतःच्या वाट्यास आलेले तीनही चेंडू सीमा-पार घालविले. शेवटच्या फटक्यांत तर इतकी आकर्षकता भरली होती कीं, तेवढ्या एकाच फटक्यानें ब्रॅडमनची साहसी खिळाडूवृत्ती सर्वांना कळून चुकली. बोजनें आपला तिसरा बंपर किंचित दाबून टाकला होता. डॉनच्या बॅटला चेंडू शिवला तेव्हां तो जमिनीपासून फारतर वीत दोन वीत उंच असेल. सामान्याला तर नव्हेच, पण निष्णात खेळा-डूलाही तो हुक करणें शक्य झालें नसतें. पण डॉननें सफाईनें बॅट फिरविली व बॉलच्या ‘ फिरकी’चा फायदा घेऊन तो चेंडू वर घेऊन हुक केला. तो पाठीमागें विकेटवरून जाऊन सीमापार झाला. विकेट वरून जातांना बेल्स आणि बॉल यांच्यामध्यें एखाद्या इंचाची फारक त असेल नसेल. पुढील ओव्हरींत बोजला ब्रॅडमननें चारदां ‘ सीमोल्लंघन ’ करावयाला लावलें आणि लेगकडे दोन फटके मारून दोन दोन धांवा घेतल्या. त्या एका ओव्हरींत ब्रॅडमनच्या वीस धांवा झाल्या. बोज जीवापाड गोलंदाजी करीत होता आणि इंग्लिश टीमच्या या ‘आशा

स्थाना'चें सर्व 'कसब' ब्रॅडमन लीड्सच्या क्रीडांगणावर चौफेर उध्वस्त करीत होता. शेवटीं बोज निकामी ठरून इंग्लिश टीमच्या कप्तानानें त्याची जागा हॅमंडला दिली.

बराच वेळ फळयावर सत्तर धांवा लागून राहिल्या होत्या. व्हेरिटीच्या चार पांच ओव्हर्स मेडन पडल्या. शेवटी पोन्सफर्डनें हात सरसावले आणि लेगकडे फटके मारून आपल्या बाजूचें शतक फळयावर झळकावलें. पुढच्या ओव्हरमध्यें ऑफकडें दोन चारचे फटके लगावून पोन्सफर्डनें आपल्या स्वतःच्या पन्नास धांवा केल्या. व्हेरिटीचें बोलिंग बदलून तें हॉपवुडला देण्यांत आलें आणि दोन्ही बॅटस्मेनना नव्या गोलंदाजांच्या बोलिंगवर खेळणें भाग पडलें. हॉपवूड हा लॅंकेशायरचा डावखोरा स्लो बोलर म्हणून प्रसिद्ध आहे. खेळाडूला फसवून आऊट घेण्यांत त्याचा हातखंडा आहे. मध्येंच फास्ट बोलिंग टाकून तो बॅटस्मनला स्तिमित करून टाकतो.

ब्रॅडमननें त्याचा पहिलाच चेंडू ऑनबौंडरीला ठोकला आणि त्याच्या बोलिंगचा यापुढें आपण कसा सत्कार करूं याची वॅटला थोडीशी कल्पना करून दिली. येवढ्यावरच भागलें नाहीं. हॉपवुडच्या दुसऱ्या ओव्हरींत त्यानें अठरा धांवा काढल्या आणि स्वतःच्या पन्नास धांवा पुऱ्या केल्या. त्यावेळीं पोन्सफर्डच्या तितक्याच धांवा झाल्या असतांना ज्यांनीं टाळ्या वाजविल्या नव्हत्या, अशा सहस्रावधी प्रेक्षकांनीं टाळ्यांचा कडकडाट करून टाकला. एक वाजण्यापूर्वींच फळ्यांवर १५९ धांवा झळकल्या. त्यांतल्या त्यांत तरी हॉपवुडचे बोलिंग बरें पडत होतें असें म्हणावें लागतें. मिचेलकडे पुन: बोलिंग दिलें गेलें. परंतु त्याच्या प्रत्येक ओव्हरींत दहा—वीस असें धांवांचें निष्पन्न होऊं लागलें.

इंग्लिश धांवांच्या आंकड्या जवळ जवळ ऑस्ट्रेलियाचा आंकडा येऊं लागला. अभेद्य चिलखतावर तरवारींचे अनेक निष्फळ घांव मारले जावे तसे इंग्लिश बोलर्सचें होत होतें. त्याचे वेगवेगळ्या तऱ्हेचे निरनिराळ्या वेगाचे चेंडू या ऑस्ट्रेलियन जयविजयांना सारखेच भासत असत. व्हेरिटी, मिचेल, बोज, हॉपवुड हे आपल्याकडून शिकस्त करीत होते. 'प्रयत्नें वाळूचें, कण रगडितां तेलहि गळें' असें मनांत म्हणत दांत रगडीत ते ओव्हरमागून ओव्हर्स टाकीत होते, आणि त्यांची ती धांदल आणि गडबड पाहून हे दोघे मनातल्या मनांत हंसत होतें. इंग्लिश बोलर्सचें नशीब म्हणुन निदान पीच तरी त्यांना अनुकूल असें होतें. नाहींतर प्रलयकाळच आला होता.

हलकें हलकें पोन्सफर्डच्या धांवा वाढत होत्या पण डॉनची पद्धत थोडी वेगळी होती. एखाद्यानें प्राजक्ताच्या झाडाचा बुंधा धरून झाड गदगदा हालवावें म्हणजे जमिनीवर जसा फुलांचा सडा पडतो, तसा त्याच्या धांवांचा आंकडा वाढत होता. हस्तनक्षत्रांतल्या पावसाप्रमाणें जोरदार बौन्ड्ऱ्या तो मारीत होता. स्वतःचें शतक पुरें व्हावयाला आधीं कांहीं वेळ खेळावयासाठीं न खेळतां तो लोकांसाठीं खेळला असें म्हणावें लागतें. एक ग्लान्स, तर दुसरा लेग, तिसरा कव्हर तर चवथा मिड-ऑनवर असे विविध फटके तो मारीत होता. त्याचा तो 'गॅलरी गेम' मनोवेधक तर होताच होता, पण त्यांत त्याचें स्वतःचें व्यक्तित्व प्रतिबिंबित होत होतें.

बोजला पुनः बोलिंग देण्यांत आलें, तेव्हां उपहासपूर्वक टाळ्यांचा कडकडाट झाला. बोजनें फिल्डिंगमध्यें अनेक फरक करून बोलिंगला सुरुवात केली. बोजचें दोन बंपर्स ब्रॅडमननें एवढ्या जोरानें मारलें कीं,

५५६३ परिग्र. नं. ६१५ ता.



समोर असूनही मिचेल आणि हॉपवुडसारख्यांना ते अडवितां आले नाहींत. हॉपवुडनें तो अडविण्याचा प्रयत्न केला पण त्याचा हात जमिनीला पोंचावयाचे अगोदरच विजेच्या वेगानें तो चेंडू निघूनही गेला. मिचेलचा एक चेंडू ऑफस्टंपवर पडला आणि तो डॉननें सीमापार केला. ठेचाळलेल्या माणसानें जशीं जपून पावलें टाकावींत, तसें मिचेलनें यापुढें ऑफस्टंपवरील संधान करणें सोडून दिलें आणि त्याच्या या सावधानतेमुळें त्याच्या चारपांच ओव्हर्स मेडन पडल्या. स्कोअर वाढत होता. त्यावरून बोलिंग सोपें होतें असें कोणी म्हणेल तर तें चुकीचें ठरेल. कारण गोलंदाजीस अनुकूल असेंच पीच त्यावेळीं होतें. शिवाय दक्षिणोत्तर वहाणाऱ्या वायुलहरीही बोलर्सना सर्वस्वी अनुकूल अशाच होत्या. लंचपर्यंत मिचेल बोलिंग टाकीत होता.

या रथीमहारथींनीं मिळून १२९ धांवा केल्या आणि इतक्या वेळांत कोणीही बोलर्सकडून अगर क्षेत्ररक्षकांकडून जीवदान मिळविलें नाहीं. चान्सेस देऊन केलेला स्कोअर आणि भिक्षा मागून जमविलेलें वित्त ही दोन्हीही सारख्याच किंमतीची. त्यांच्या दमदार खेळावरून ते दोघेही लवकर बाद होण्याचें चिन्ह दिसेना. फळ्यावर दोनशेंचा आंकडा फडकविण्यास त्यांना १९५ मिनिटें लागलीं.

नंतर नवीन चेंडू आला. बोज आणि हॅमंड हे नव्या दमानें गोलंदाजी करूं लागले. नवा चेंडू आपणांस जुन्यापेक्षां आवडतो हें ब्रॅडमननें आडवे तिडवे फटके मारून लोकांच्या निदर्शनास आणलें. नव्या चेंडूला क्रीडांगणावर येऊन थोडा वेळ झाला असेल नसेल तोंच कमीजास्त अंतरानें या दोघांच्या नांवावर फळ्यावर व्यक्तिशः शतकें लागलीं. पहिल्या तीन टेस्टस्मध्यें या दोघांच्या शंभर धांवा एकदांही झाल्या

नव्हत्या. त्यामुळें या त्यांच्या यंदाच्या पहिल्याच शतकांचें प्रेक्षकांनीं टाळ्यांच्या कडकडाटांत स्वागत केलें. त्या दोघांचा खेळ अवर्णनीय होत होता यांत शंका नाहीं ऑस्ट्रेलियाची पडती बाजू यांनीं ऐनवेळीं सांवरून धरली. फळ्यांवर त्यांच्या २८३ धांवा लागल्या तेव्हां चवथ्या विकेटचें जगाचें रेकॉर्ड मोडलें गेलें. यापूर्वीं आर्चिक जॅकसन आणि डॉन ब्रॅडमन यांनी तीस सालीं ओव्हल मैदानावर २८३ धांवा काढून रेकॉर्ड मोडलें होतें; डॉननें आपलें तीस सालचें रेकॉर्ड स्वतःच मोडलें. त्या वेळीं पुन: एकदां टाळ्यांचा कडकडाट झाला. डॉननें आपली मान नमवून या सत्काराचा प्रेमपूर्वक स्वीकार केला आणि आपल्या अंगच्या गुणांच्या रत्नखाणींत विनयाचीं माणकेंही लकाकतात असें दर्शविलें.

थोड्याच वेळांत ह्या रेकॉर्डब्रेकर खेळाडूंनीं इंग्लंडच्या क्षेत्ररक्षकांना नुसतें सळो कीं पळो करून सोडलें. डॉननें अगदीं दातीं तृण धरावयास लावलें. लोक अस्वस्थ होऊं लागले. त्यांचें इंग्लिश रक्त आपल्या बंधूंची दुर्दशा होऊं लागलेली पाहून अगदीं उसळी घेऊं लागलें. त्यांनीं आपल्या बोलर्सना बराचा धीर दिला, परंतु मूळच्या प्रभावी पण ब्रॅडमननें निरुत्साही केलेल्या गोलंदाजांना प्रेक्षकांनीं दिलेला धीर थोडाच पुरणार होता ? डाननें चहाच्या वेळेपर्यंत ऑस्ट्रेलियाच्या २९० धांवा करून इंग्लंडची ' मेफ् अप ' तेव्हांच करून टाकली पोन्सफर्ड आणि ब्रॅडमन यांनीं मारलेला प्रत्येक फटका ऑस्ट्रेलियन स्कोअरमध्यें भर टाकीत होता. आणि इंग्लिश प्रेक्षकांचें अंत:करण थरारून टाकीत होता. सर्वांच्यापुढें प्रश्न असा पडला होता कीं, हें 'धांवाचें यंत्र' आता

थांबणार तरी केव्हां आणि कसें ? त्या यंत्रांत सारी इंग्लिश टीम भरडून निघत होती.

चहापान झाल्यानंतर पोन्सफर्ड 'धांवा काढण्याच्या यंत्राबरोबर' खेळावयास आला. तेव्हां त्यांच्या १३७ आणि 'धावांच्या यंत्रा'च्या १६६ धांवा झाल्या होत्या. भरडून निघालेली इंग्लिश टीमही चहा-पानानंतर नवचैतन्यानें पुलकित होत्साती पुनःश्च क्षेत्ररक्षणार्थ टाळ्यांचा कडकडाटांत बाहेर पडली.

थोड्याच वेळानें मिचेलच्या बोलिंगवर ऑनला पोन्सफर्डनें बौंडरी ठोकून जगांतील कोणत्याही जोडीनें न केलेले धांवांचे मागील रेकार्ड मोडून टाकलें. यापूर्वीचें रेकॉर्ड हॉब्ज आणि पार्टनर यांनीं १९११–१२ सालीं मेलबोर्नच्या क्रीडांगणावर ३२३ धांवा काढून केलें होतें. हें रेकॉर्ड मोडणाऱ्या फटक्यानेंच पोन्सफर्डच्या १५० धांवा पुऱ्या झाल्या.

डॉनला औट घेणें हें असमानाला गवसणी घालण्यासारखेंच आहे हें सर्वांना कळून चुकलें. इच्छामरणी भीष्माचार्यांप्रमाणेंच तो सर्वांना भासूं लागला. मेघमालेनें शशिप्रभेला आहे नाहींशी करून टाकावी, गिरिबालेला सागरानें प्रथम चुंबनांतच आत्मसात करून तिच्या स्वतःच्या व्यक्तित्वाचा अवशेषही माघारी उरून देऊं नये. तसें डॉनच्या क्रीडाकौशल्यानें दिङ्मुढ करून टाकलेल्या रसिकांना, नामोहरम झालेल्या उदासीन इंग्लिश खेळाडूंचें स्वतंत्र अस्तित्व, त्यांची पूर्व कीर्ति विदित असूनही डॉनच्या खेळापुढें नाहींसें झालेलें दिसत होतें. "गरीब बिचारे!" ब्रॅडमन मनांत म्हणत असेल. "काल हंसत होते आज रडत आहेत !"

पाळी येईल तसें रहाटगाडग्यांतील पोहऱ्यानें आपल्या 'अंतरां'तील

पाणी पन्हाळींत ओतून पुनः दुसऱ्या 'वापिप्रदक्षिणेस' निघावे तसें इंग्लिश बोलर्सचें चाललें होतें. बोज दमला कीं हॉपवुड, तो दमला कीं मिचेल त्या नंतर मध्येंच हॅमंडनें दोन ओव्हर्स टाकाव्या असें चालले होतें. एखाद्या 'वस्तादा' नें आखाड्यांत 'बालबच्चांपैकीं चार-चौघांशीं एकदम कुस्ती खेळावी तसा प्रकार डॉन करीत होता. तो कोणालाही जास्त किंमत देत नव्हता. कोणच्याही बोलरच्या चेंडूस तो सणसणीत तडाखा दिल्याशिवाय सोडत नव्हता. कुशल चित्रकार वाटेल तेथून सुरवात करून ज्याप्रमाणें उत्तम चित्र तयार करतो त्याप्रमाणें वाटेल तेथें टप पडलेला चेंडू ब्रॅडमन आपल्या इच्छित दिशेला सहज लीलेनें फटकारून लावीत होता. वारा येईल तशी पाठ देण्याचें काम वीराचें हातून कधींच होणार नाहीं. मिचेल आणि हॅमंड यांचें बोलिंग इतरांपेक्षां जरासें 'जीव धरून' पडत होतें, पण तेसुद्धां तो एखाद्या शाळेंतल्या मुलाचें बोलिंग चोपावें तसें चोपीत होता. हॅमंडच्या पहिल्याच ओव्हरमध्यें तीन सीमान्त टोले मारून ब्रॅडमननें आपलें दुसरें शतक पुरें करून तिसऱ्या शत-कांत प्रवेश केला. त्याच्या दोनशें धावांत ११२ धांवा नुसत्या बौंड-रीजच्या होत्या. श्रीमंत सावकारानें रकमेच्या व्याजावरच ऐश्वर्यांत 'बसून' दिवस वेंचावे तसें डॉनचें होतें. शंभरावर धांवा काढावयाला त्याला जागेवरून हलण्याचीही जरूरी भासली नाहीं.

व्हेरिटीचें बोलिंग पुढें जाऊन मारीत असतांना पोन्सफर्डचा चेंडू हवेंत उडाला पण वॅटच्या हातांतून तो सुटला व त्याला जीवदान मिळालें. मृत्युमुखांतून सुटलेल्या तक्षकानें दंश धरावा तसें पोन्सफर्डनें यापुढें व्हेरिटीचें बोलिंग दांतओंठ खाऊन चोपलें. प्रत्येक चेंडू तो

इतक्या ईर्षेनें आणि जोरानें मारीत होता कीं, ' तूंच मला औट घेणार होतास नाहीं कां ? ' असें संबोधून त्याला तो मारीत असावा असें वाटत होतें.

डॉन ' सूर्य ' तर पोन्सफर्ड 'चंद्र'सा भासत होता. आजपर्यंतचा अनुभव असा आहे कीं, डॉनबरोबर जोडीनें खेळणाऱ्या बॅटस्मनला आपला खेळ लोकांच्या डोळ्यांत ' भरवितां ' येत नाहीं. आणि हें कांहीं खोटें नाहीं. ब्रौन, मॅकेब, डार्लिंग यांनाही या अनुभवाचें कडू कारलें या वर्षीं चाखावयाला मिळालें. पण आज पोन्सफर्डनें मात्र मीही 'खेळाडू' आहें, मीही 'स्वयंप्रभ' आहें, हें दाखवून दिलें. खांसाहेबांना साथ करतांना पटाईत शिष्यानें वीणाझंकाराबरोबर एखादी ' हुकुमे-हुकूम ' तान घेऊन 'वाहवा' मिळवावी तसें एखादा फटका तो असा मारी कीं, डॉननेंही चित्रासारखें मुग्ध होऊन त्याचें तें हस्तलाघव विस्मित नेत्रांनीं टकमक पहात रहावें.

जादुगारानें मोकळ्या मुठींतून फुलें काढून दाखवावीं तसें हातांतल्या वीतभर ' फळकुटीं 'तून ब्रॅडमन ' आश्चर्यें ' निर्माण करीत होता. तो भोंवतालच्या क्षेत्ररक्षकांना ' टिळकां 'च्या जखमी पक्षिणीप्रमाणें ' क्षणोक्षणीं पडे—उठे ' करावयास लावीत होता. व्हेरिटीच्या एका ओव्हरमध्यें त्यानें चार, चाराचे व दोन, दोनाचें फटके लगावून फळ्यां-वर चारशें धांवा लावल्या. सिली मिडऑनवर वॅटच्या हातून पुनः एक झेल सुटला. पोन्सफर्ड बॉलला कट करीत असतां चुकून बॉल उडाला व तो सिलीमिडऑनकडे घुसला; पोन्सफर्डला पुनः एकदां जीवदान मिळालें. स्वतःला लाभलेल्या जीनदानानें आनंद वाटण्यापेक्षां त्याला हताश प्रतिस्पर्ध्यांची कींवच जास्त वाटली असेल. डॉननें त्यांना दिवस-

भर साऱ्या मैदानांतील इंचाइंचांत पळविल्यामुळें ते दमले होते. त्या 'भागल्या' स्थितींत त्यांच्या हातून झेल सुटणें अगदीं क्रमप्राप्त होतें. डॉननें त्यांना इतकें पळविलें होतें कीं, त्यांना वाटावें आपण आज क्रिकेट मॅचमध्यें भाग घेतला नसून लांब पल्ल्याच्या धांवण्याच्या शर्यतींत भाग घेतला आहे. फळ्यावर चारशें धांवा लागल्या तेव्हां घड्याळाचा कांटेकोरपणानें चालणारा कांटा खेळाच्या सुरुवातीपासून आतांपर्यंत ३७० मिनिटें पुढें सरकला होता. ब्रॅडमनच्या २१८ व त्याच्या संवगड्याच्या १७९ धांवा झाल्या होत्या. आणखी सात धांवा काढून झाल्यानंतर आपण 'इच्छामरणी' आहोंत हें पोन्सफर्डनें 'सेल्फऔट' होऊन सर्वांच्या प्रत्ययाला आणून दिलें. त्याच्या पायाच्या धक्क्यानें बेल्स पडल्या. .याशिवाय दुसऱ्या मार्गानें तो औट झाला नसता.

दिवसभर ताटकळत बसलेला मॅक्केब खेळावयाला आला. आपला सहकारी औट झालेला पाहून अभिमन्युच्या मृत्युनंतर खवळलेल्या पार्थानें जसा प्रलय मांडला तसा प्रकार डॉननें केला. उरलेल्या थोड्या अवधींत त्यानें ६३ धांवा केल्या. तेवढ्या वेळांत मॅक्केबनें फक्त १८ धांवा केल्या. यावरून या धांवा काढणाऱ्या यंत्राचा वेग सहज कळून येतो. खेळ संपला तेव्हा डॉनच्या नॉटऔट २७१धांवा झाल्या होत्या. अमर असा पॅव्हेलियनमध्यें परतला. तेव्हां आनंदाश्रूंनीं भरलेल्या ३९००० प्रेक्षकांच्या डोळ्यांनीं त्याचें कौतुक केलें. ऑटोग्राफसाठीं पुढें आलेल्या सर्व वह्यावर त्यानें त्या दिवशीं शाईनें सह्या केल्या असत्या; तर लीड्सला दुसऱ्या दिवशींचें सर्व व्यवहारलेखन पेन्सिलनें करावें लागलें असतें. इंग्लंडच्या अकरा गड्यांनीं केला त्याच्या दीडपट स्कोअर करूनही हा वीर नॉटऔट राहिला. आदल्या दिवशीं



Played !　　　　[ T H Tulpule ]

त्याची कुचाळीं करणारीं वृत्तपत्रें त्याच्या स्तुतीचीं आभरणें अंगावर लेऊन भर बाजारांत येऊन 'तडाखेबंद' विक्री करूं लागलीं.

* * *

दुसरें दिवशीं ही स्वारी 'आतां पुरें झालें' असें म्हणून निष्काळजी-पणें खेळून जेव्हां परत आली. तेव्हां फळ्यावर ५५० धांवा लागल्या होत्या. खेळावयास गेला तेव्हां ३९ धांवा होत्या. परत आला तेव्हां ५५० चा भरदार आंकडा झळकत होता.

# ८

राजानें मारलें आणि पावसानें झोडपलें तर दाद कुणाजवळ मागायची ? ही दाद मागतां येत नसल्यामुळें मागील प्रकरणांतील अभूतपूर्व सामना अनिर्णित स्थितींतच थांबला गेला. आतां जिंकणारे कोण आणि हरणारे कोण ? याचा निकाल ओव्हल मैदानावरच दोन्ही पक्षांची पांचवी गांठ पडून ठरणार होता. हा शेवटचा सामना चीतपट होईपर्यंत खेळला जाणार होता. हा सामना ब्रॅडमनचाच होता. हॉब्ज आपल्या 'Fight for Test' या नांवाच्या पुस्तकांत म्हणतो. "या सामन्यामध्यें पहिल्या दिवशीं जो डॉनचा खेळ मी पाहिला तसा खेळ माझ्या साऱ्या आयुष्यांत मला कधीं पहावयास मिळाला नाहीं; आणि कौस्तुभ, कोहिनूरापुढें सर्व रत्नांनीं हतप्रभ व्हावें तसें सर्व मृत आणि विद्यमान् खेळाडू ब्रॅडमनपुढें केवळ लुप्तप्राय होऊन राहिले आहेत. लीड्स्च्या क्रीडांगणावर 'पराक्रम' गाजवून पुरे पंधरा दिवस लोटले नाहींत तोंच त्यानें आपल्या दमदार खेळाची चुणुक पुन: एकदां दाखविली. आपलें क्रीडापटुत्व धूमकेतूप्रमाणें अधेंमधें प्रकट होणारे त्रुटित तेजशलाका नसून स्वतंत्र आस्तित्व असलेला अखंड प्रकाशणारा ध्रुवतारा आहे हें त्यानें सिद्ध करून दिलें हॉब्ज म्हणतो, " बॅट गरगर फिरवीत मैदानांत पाऊल टाकण्यापूर्वींच ब्रॅडमन आज किती धांवा काढावयाच्या हें ठरवून येत असावा. आणि याला सबळ पुरावा म्हणून मी असें सांगतों कीं लीड्स्ला ३०४ धांवा काढून झाल्यावर तो बोजच्या

ज्या चेंडूवर बाद झाला तो चेंडू त्यानें सहज मारण्याजोगा होता पण तो त्यानें मारला नाहीं. तत्पूर्वींच्या तीन सामन्यांतसुद्धां तो फक्त मजेनें प्रेक्षणीय आणि मोकळा निष्काळजी खेळ खेळण्यासाठीं आला असावा. एरवीं त्याला इतक्या लौकर परतवणें इंग्लिश खेळाडूंना महाग पडलें असतें. आतां चौथ्या आणि पांचव्या सामन्यांत तो उत्कृष्ट खेळला याचें कारण ते सामने महत्वाचे असून निर्णायक स्वरूपाचे होते."

कॉन्ग्रेसच्या राजकारणांत राजगोपाळचारींच्या मताला जें प्राधान्य दिलें जातें तेंच प्राधान्य क्रिकेटच्या संबंधांत आज हॉब्जला देण्यांत येतें. खेळाकडे पहावयाची त्याची दृष्टी हंसक्षीर न्यायाची नसून ती कावळ्याची आहे. असल्या चोखंदळ आणि याच खेळांत स्वत: कुशल असलेल्या टीकाकाराकडून स्वतःबद्दल गौरवपर उद्‌गार काढावयास लावण्यास पूर्वपुण्याईच असावी लागते.

पांचव्या सामन्यांत त्यानें अनुक्रमें २४४ व ७७ असा स्कोअर केला. चवथ्या मॅचमधील ३०४ धांवा ( एकच इनिंग ) आणि या धांवा मिळून शेवटच्या दोन सामन्यांत त्याच्या एकट्याच्या वाट्यांस सहाशेंच्या वर धांवा येतात.

नेव्हिल कॉर्डस् आपल्या 'गुड क्रिकेट' मध्यें या एकामागून एक केलेल्या पराक्रमासंबंधीं म्हणतो, "मी कादंबरीकार असतों आणि माझ्या कथेंतील नायकाकरवीं असे लागोपाठ पराक्रम करविले असते तर टीकाकारांनीं 'अवास्तव' तेचा शिक्का त्यावर मारून मला मूर्ख ठरविलें असतें."

त्याचें हें म्हणणें कांहीं खोटें नाहीं, परंतु सत्यकथा ही कधीं कधीं कल्पनेपेक्षांही जास्त 'अरेबियन' भासते. भिकाऱ्यानें अंगावर फेकलेलें

नाणें उतावीळपणानें झेलावें, तसें एका 'नंग्या फकिराच्या' तोंडांतील शब्द झेलावयाला आतुरतेनें उभे असलेले लक्षावधी लोक आज आपण पाहात आहोंत. लोहाराचा एक मुलगा एका प्रचंड राष्ट्राचा 'लोकमान्य' झालेला आपण ऐकत आहोंत. कांहीं वर्षांपूर्वी कोणासही माहीत नसलेला लिंडबर्ग आज सर्वांना माहीत झाला आहे. सुप्रसिद्ध लेखक 'मॅकफिडन' आपल्या संपादकत्वाखालीं निघणाऱ्या 'ट्रू स्टोरी' वर Truth is stranger than fiction असें लिहितो तें किती यथार्थ आहे ?

टॉस हरल्यामुळें इंग्लिश टीम क्षेत्ररक्षणार्थ बाहेर पडली. दुर्दैवाच्या पहिल्याच टणत्कारानें इंग्लिश क्षेत्ररक्षकांचीं गात्रांचीं 'गांडीवं स्रंसते हस्तात्' अशी स्थिति झाली. नंतर डॉनसारख्या अर्जुनाच्या तीव्र फटकेदार खेळाडूंनीं त्यांना 'सीदंति मम गात्राणि मुखं च परिशुष्यति। वेपथुश्च शरीरे मे रोमहर्षश्च जायते ॥' असें म्हणावयास लावल्यास यांत नवल तें काय ?

सर्वोत्कृष्ट हवा, प्रचंड जनसमुदाय या सुंदर पार्श्वभूमिवर 'डॉन'नें आपलें क्रीडाचित्र रंगवावयास सुरवात केली. प्रातःकाळच्या अरुणप्रभेंतील लाल रंगाचा उपयोग त्यानें केला. दुपारच्या त्याच्या शुभ्रप्रभेपासून त्यानें रसायनें बनविलीं आणि तो अस्ताचलीं पीतांबरावर शेवटचे क्षण घालवीत असतांना त्यांतील हेमकांती घेऊन त्यानें आपलें चित्र पुरें केलें. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे तो सकाळपासून सायंकाळपर्यंत खेळला.

आश्रमहरिणीनें तृणांकुरावरून वायुवेगानें भरारी मारावी तशी त्याच्या बॅटनें स्पर्श केलेल्या चेंडूची गति होती. त्या दिवशींच्या त्याच्या खेळांत वैचित्र्य आणि लालित्य यांचा चिरसंगम झाला होता. अल्ला-

उद्दीन आणि त्याचा जादूचा दिवा' त्याप्रमाणेंच 'सम्राट डॉन ब्रॅडमन आणि त्याची विजयी बॅट' हा एक चमत्कारांचा वाक्प्रचारच होऊन बसला.

ब्रौन आणि पोन्सफर्ड ही जोडी खेळावयाला गेली. पण क्लार्कनें ब्रौनची थोड्याच वेळांत लेगविकेट उडविली. त्यावेळीं त्याच्या अवघ्या दहा धांवा झाल्या होत्या. क्लार्कच्या सन्मानार्थ प्रेक्षकांनीं वाजविलेल्या टाळ्यांचा निनाद वातावरणांत विरला असेल नसेल तोंच ब्रॅडमनची छोटी आकृती पॅव्हेलियनमधून बाहेर पडली. क्लार्कच्या स्वागतार्थ पिटलेल्या टाळ्यांचा दसपट जोरानें ब्रॅडमनच्या सन्मानार्थ ४०००० प्रेक्षकांकडून टाळ्या पिटल्या गेल्या. डॉननें खेळाची सुरुवात क्लार्कला सेकंडस्लिपकडे चारचा जोरदार फटका मारून केली. प्रथमारंभींच सीमोल्लंघन करून या वीरानें वैभवाची विजयादशमी साजरी केली. नंतर दीपावलींतील शोभेच्या दारूकामाप्रमाणें त्यानें आपल्या विजयी बॅटीनें अनेक चेंडू अटकेपार केले. वातचक्रानें पिकलेल्या पानाला खेळवत वर न्यावें तसें क्लार्कनें टाकलेले 'मातब्बर' चेंडू तो हातावरील म्हातारी फुंकरानें उडवावी तसें अस्मानांत उडवून लावीत होता. खानदानीं गवयाच्या प्रत्येक तानेंतून नवीन सुरावट बाहेर पडावी तशी त्यानें मारलेल्या प्रत्येक फटक्यांतून नाविन्यनिर्मिती होत होती. स्वसंरक्षणार्थ सावधानपूर्ण खेळण्याची जरूरी त्याच्या तडफदार करङ्यांना कधींच भासली नाहीं.

त्याचा हा सुरुवातीचा मनोवेधक खेळ पाहून तज्ज्ञांनीं ओळखलें कीं, आज डॉन पुनः 'मैदान' गाजवणार. सरोवराच्या विस्तारावरून त्याच्या खोलीची कल्पना येत नसली तरी त्याच्या सौंदर्याची कल्पना

सहज येते. वक्त्याची किंमतही त्याच्या पहिल्याच ठसकेदार अगर बावळट वाक्यरचनेवरून होते. ' नुकताच त्यानें अफाट स्कोअर केला आहे. आतां तो पुनः कसचा एवढा स्कोअर करणार ? या खेळांत अशा लागोपाठ सेंचरीज् कोणीच काढूं शकत नाहीं.' अशी वायफळ बडबड करणारे अनेक वावदूक त्या जनसमुदायांत होते. परंतु 'तिरंगी' फडफडला म्हणून समाजक्रांती होत नाहीं ! अगर रविवारीं वर्तमानपत्रांना सुट्टी असली म्हणून कांहीं त्या दिवशीं बातम्याच होत नाहींत असें थोडेंच आहे ? अनेक 'एक' बडबडत असतात आणि अनेकांतला अग्रेसर कांहीं तरी दुसरेंच करीत असतो.

ब्रॅडमन आणि पोन्सफर्ड ही जयविजयांची जोडी अहमहमिकेने खेळूं लागली. आणि या दोघां हत्तीहत्तींच्या साठमारींत इंग्लिश गोलंदाजांच्या भुरट्या जंगलाचा मात्र चुराडा झाला. डॉनचें पल्लेदार चेंडू आडवितां न आल्यामुळें धांवांचा आंकडा भराभर वाढला, हें 'शल्य'सें बोचणारें दृश्य इंग्लिश खेळाडूंना उघड्या नेत्रांनीं पहावें लागलें.

हॅमंडच्या पहिल्याच षट्कांत डॉननें त्याला तीनदां सीमापार केला. तिसरा फटका तर इतका लोकविलक्षण होता कीं, इतरांनीं केल्यास नवल नाहीं पण स्वतः हॅमंडनें त्याचें प्रेमपूर्वक कौतुक केलें. थोरांचें थोरपण जाणावयालाही अंगीं योग्यता लागते. त्यांच्या खेळाचीं नुसतीं वर्णनें वाचून कित्येक लोक वेडावून जातात. एकलव्यानें द्रोणाचार्यांची केली तशी ब्रॅडमनची भक्ति आणि मानसपूजा इतर अनेक खेळाडू करतात. डॉन ब्रॅडमनच्या गुणसंकीर्तनांत मोठमोठ्या प्रतिभासंपन्न नामांकित लेखकांची लेखणी रंगून जाते.

बोजच्या पहिल्या दोन ओव्हर्स मेडन पडल्या. तिसऱ्या ओव्हरमध्यें त्याची आणि डॉनची गांठ पडली. 'तूंच नाहीं कां तो?' अशी दुःशासनाला आठवण देऊन त्याची मांडी गदाप्रहारानें दुभंग करून टाकणाऱ्या भीमसेनाप्रमाणें डॉननें त्याचा पहिलाच चेंडू सुंदर रीतीनें कव्हर ड्राइव्ह करून सीमापार केला. लवकरच फळ्यावर ५० धांवा लागल्या. बोजला बदलून त्याची जागा ॲलनला दिली गेली. ॲलनच्या 'स्लो' बोलिंगवर पॉन्सफर्ड प्रथम थोडासा चपापला, पण डॉनच्या फटक्यांनीं त्यालाही जोर चढला. स्थिर मन आणि अस्थिर अतिचंचल हस्तद्वय या दोन परस्परविरोधी भावांच्या एकीकरणामुळें डॉन ॲलनचें फसवें बोलिंग चोपूं शकला. चंडोलानें आपल्या मधूर कंठांतून हृदयंगम गीतांचे आलाप काढीत असतां मध्येंच लहरींत एखादी गगनभरारी मारावी; तद्वतच बराच वेळ कुशलतेनें प्रतिपक्षांचें चेंडू नुसतें अडविणारा डॉन एखादा गळाला लागलेला मासा वर खेंचावा तसा जमिनीवरचा चेंडू बॅटीच्या पट्टयानें अलगत उचलून अस्मानांत भिरकावून देई आणि मग जमीन अस्मानाची सांगड घालून देणारा एक उन्मत्त चीत्कार रसिकांकडून केला जाई. सर्वसम्मत आणि सर्व सन्मानीत फटके तर त्याच्या बॅटीनें अनेक मारले आहेत. पण त्याचे करद्वय त्याच्या मनाप्रमाणें समवेगानें फिरूं शकत असल्यामुळें कित्येक वेळां तो कांहीं चमत्कृतिजनक फटके मारूं शकतो. ॲलनच्या बोलिंगवर त्यानें एकदां 'दोनदां' बॅट फिरवून दाखविली. एकदां चुकलेला चेंडु पुनः मारण्यासाठीं केलेली ही धडपड केवढ्या द्रुत गतीनें झाली असली पाहिजे! अशा तऱ्हेच्या चमत्कृतीही डॉनच्या 'तुफान' खेळाकडे लक्ष लावून बसलेल्या प्रेक्षकांना चटका लावल्याखेरीज रहात नाहीं.

अरुणानें उच्चैःश्रवाला काबूंत ठेवल्याप्रमाणें दोन्हीं बोलर्संना काबूंत ठेवून हे दोन खेळाडू आतां खेळूं लागले. वारा बदलतांच तांडेलानें सुकाणूचा कोन फिरवावा तशीं 'डॉन'साठीं क्लार्कनें आपली क्षेत्रव्यवस्था बदलली. शॉर्टलेगवरचा एक क्षेत्ररक्षक काढून त्यानें त्याला गलींत ठेवलें. पण प्रचंड जलप्रलयानें वाटेंत आडव्या आलेल्या वळचणीला बिचकून कधीं आपली वाट बदलली आहे काय ? गलींत दोन क्षेत्ररक्षक होते तरी डॉनचें त्या बाजूचें फटके मारण्याचें काम अगदीं अखंडित व्यवस्थितपणें चाललें होतें. इंदुबिंबाबरोबर रोहिणीनें विलास आचरावा, वल्लरीनें वृक्षशाखेला अलिंगन द्यावें तशी मुलायम हालचाल डॉनच्या खेळाला स्पर्श करून त्याला भव्य स्वरूप प्राप्त करून देत होती. खेळतांना सौंदर्यकात्क हालचाल फारच थोड्यांना साधते. पट्टीच्या गवयाप्रमाणें पट्टीचे खेळाडूही आपल्या कलानिर्मितीचें जन्मोत्सव साजरे करतांना वांकड्यातिकड्या बेढब हालचाली करतात. पृथ्वीतलावरील मोठमोठ्या खेळाडूंत एकट्या अमरनाथाशिवाय दुसऱ्या कोणाच्याही अंगीं हा डॉनचा गुण फारसा आढळत नाहीं.

डॉन 'स्कोअर' काढून आपल्या बाजूला विजयश्री आणून देतो आणि ती मिळवितांना आपल्या सुंदर आणि आकर्षक क्रीडाशैलीनें सर्व भजकांचीं मनें सुप्रसन्न करून टाकतो. त्याचा प्रत्येक फटका पहा-तांना रसिकांच्या मनाला हेलकावे बसतात, तो खेळूं लागतांच ते आनंदानें फुलें उधळतात, आणि तो बाद होतांच ते खिन्न होऊन अश्रू ढाळतात. तो ज्या सामन्यांत खेळतो तो आंतरराष्ट्रीय महत्वाचा

सामना ठरतो आणि तो दिवस या खेळाच्या इतिहासांत सुवर्ण—दिन ठरला जातो.

ऑस्ट्रेलियाच्या ९९ धांवा झाल्यावर पोन्सफर्डनें शॉर्टलेगकडे अस्मानांत उंच चढविलेला एक सुंदर झेल वॅटनें सोडला. यावेळीं पोन्सफर्डच्या ५७ धांवा झाल्या होत्या. बराच वेळ गेला पण ९९ च्या शंभर धांवा होईनात. क्रिकेटच्या उपासकांना माहीत असेल कीं, फलकावर 'शतक' लागावयाच्या आधींच्या पांच सहा धांवा म्हणजे खेळाडूंचे पुरें रक्त आटवून निघालेल्या असतात. ९१, ९२, ९३... ९६......इत्यादि संख्यावधू शंभर आंकड्यांच्या अगडबंब 'वरा'ला न वरावयाचा निश्चय करतात असें विनोदानें म्हणावयाचा मोह अनावर होतो. हीच कल्पना पुढें चालवून पुढचा इतिहास लिहावयाचा म्हटला म्हणजे निष्ठुर पित्यानें आपल्या सुकुमार कन्यकेला ' अष्टावक्र ' बिजवराशीं विवाह लावण्यास भाग पाडावें; तसें हें ९९ चें बराच वेळ अडलेले लगीनघोडे क्लार्कच्या एका 'नो' बॉलला चपळाईनें 'स्विंग' करून डॉननें 'शतकापार' करून सोडलें. उपहारासाठीं खेळ थांबला तेव्हां एकंदर धांवा १२३ होऊन डॉन आणि पोन्सफर्ड यांच्या नांवापुढें अनुक्रमें ४३ आणि ६२ धांवा लागल्या होत्या.

उपहारानंतर डॉन आणि पोन्सफर्ड हे खेळावयासाठीं बाहेर पडले. त्याचें आरक्त मुखमंडल, ओव्हलच्या मैदानावर नाचणाऱ्या वायुवीचींनीं विस्कळित केल्यामुळें ' बेबंद ' उडणारे त्यांचे तपकिरी केस, मानेवरून किंचित् पतित झालेली त्याची शुभ्र ' स्पोर्ट ' कॉलर, तिरकमठ्याप्रमाणें बांकदार भुंवया, त्यामधून मार्ग काढणारी, लांबीच्या मानानें किंचित् रुंद असलेली त्यांची नासिका, त्याचे चमकणारे हंसरे

डोळे आणि डोळ्यांत भरणारी त्याची विकेटकडे गजगतीनें ऐटदार पदनिक्षेप करीत जाणारी मूर्ति, पहाणाऱ्या प्रेक्षकाला पुनः पुनः नेत्र भरून पहावीशी वाटत होती. त्रिखंडांत गाजलेल्या कीर्तीवरून चालत जातांना शुभ्र पायघडया तुडवीत जाणाऱ्या शहान्शहाचा दिमाख आणि बाणेदारपणा त्यांच्या अंगीं रोमरोमीं भरलेला होता. त्यांच्या दर्शनीय दर्शनानें अलौकिक आश्चर्याच्या संमेलनांत रमून गेलेल्या रसिकांना त्यानें खेळावयाला केव्हां सुरुवात केली हेंसुद्धां समजलें नाहीं. रत्नाकराला ' अगस्ती 'च्या आणि दशाननासह इतर असुरांना श्रीरामचंद्राच्या आगमनानें धडकी भरली ! इंग्लंडच्या तुफान गोलंदाजांना ' डॉन 'चें आगमन त्यांहूनही 'बांगडी'भर अधिकच जास्त जाणवलें. डॉननें टोलवलेल्या चेंडूच्या अंगीं नागिणीचें चापल्य भरलेलें असतें. कलिका फुलण्याच्या आधींच तिचा कुस्करा करावा तसा इंग्रज गोलंदाजांच्या कुशल हातांतून सुटलेला चेंडू जमिनीवर एकदांही टेंकण्याचे आधींच डॉनकडून छिन्नविच्छिन्न केला जातो. त्याच्या कट्सची अर्धस्फुट चारुता दिव्यत्वाभास करून देते. आकाशांतील कुऱ्हाडीप्रमाणें चेंडूवर त्याच्या बॅटचा फटका अकस्मात बसतो आणि बिचकलेल्या मृगशावकाप्रमाणें तो चेंडू सैरावैरा धांवत सुटतो. त्याचा कव्हरपॉइंटवरचा खेळ पहातांना मार्मिकांची बुद्धी बावरून जाते. आणि सामान्य प्रेक्षकांचें हृदय विदारून जातें. कमलिनीनें भ्रमराला अगर कण्वांच्या शकुंतलेनें राजा दुष्यंताला प्रेमक्रीडेंत बद्ध करून टाकावें यांत नवल तें काय ? प्रभातसमयीं आकाशविहार करणाऱ्या शकुंतांनीं भगवान् सहस्ररश्मीचें स्वागतगीत गावयास सुरुवात करावी तसे उत्कृष्ट खेळ पहावयास उत्सुक असलेल्या प्रेक्षकांनीं डॉनचा स्वागतपर हलकल्लोळ

करून सोडला. कालिदासाची प्रखर प्रतिभा, बायरनचा बेबंद मस्तपणा, शेलेच्या असमान भराऱ्या, वर्डस्वर्थच्या निसर्गावरील कल्पना या सर्व गुणांची झगझगीत झूल पेहरून विहरतांना रसिकजनांचें मनोरंजन करील अशी कवितासुता अजून रचली जाणार आहे. परंतु हॉब्जची धीरगंभीरता, कॉन्स्टंटाईनची साहसी वृत्ति, जॉर्डिनचें प्रसंगावधान, रणजितसिंगाची तुफानी तडफ आणि प्रो. देवधर यांची बारीक पण तीक्ष्ण दृष्टि या सर्व गुणांनीं नटलेला क्रिकेटपटु आज ऑस्ट्रेलियन भूमींत जन्माला आला आहे.

पुनश्च खेळ सुरू झाल्यानंतर पहिला सीमांत टोला सकाळप्रमाणें ब्रॅडमनकडूनच मारला गेला. आंखूड पडलेल्या चेंडूला वाईड लॉंग ऑनवर त्यानें गगनमंडलांत भिरकावून दिलें. हॉब्ज या फटक्याबद्दल म्हणतो, "हा फटका म्हणजे डॉनचें वैशिष्टय आहे, असें माझें मत आहे. असा फटका मारावयाला जो एक अंदाज बांधावा लागतो आणि जें चापल्य दाखवावें लागतें तें केवळ डॉनच्याच अंगीं पूर्णपणें मुरलें आहे, आणि म्हणूनच तो असा अर्धवट 'हुक' आणि अर्धवट 'ड्राइव्ह' असा संमिश्र फटका यशस्वी रीतीनें मारू शकतो. आंखूड चेंडू मी स्वतः नेहमीं स्वसंरक्षणार्थ अडवतों. माझी खात्री आहे कीं, इतरही सर्व निष्णात खेळाडू या बाक्या प्रसंगीं माझ्याप्रमाणेंच वागत असतील. एकटा डॉनच मला अपवादात्मक वाटतो. आणि या एका गोष्टीवरूनच डॉन किती श्रेष्ठ प्रतीचा खेळाडू आहे हें दिसून येईल."

[ The first boundary was a shot to wide longon typical of Bradman, made of a first ball short of

length. For these shots Bradman estimates the probable flight of the ball from the pitch, and so is able to use a forcing stroke which is a cross between a 'drive' and a 'hook'. To this kind of ball as myself most batsmen used to play a purely defensive shot. Don is an exception to this rule. This shows what a wonderful player Don Bradman is.]

—page 260. F. B. A.

धांवांची संख्या १३९ असतांना पोन्सफर्डच्या ६८ धांवा झाल्यावर बोजच्या एका चेंडूवर 'वूले'च्या बाजूला त्याचा एक झेल उडाला. सेकंड स्लीपच्या बाजूनें तीव्रतर वेगानें निघून गेल्यामुळें वूलेला तो स्पर्श करूनही झेलतां आला नाहीं. फायदाच पाहिला तर एवढाच कीं, पोन्सफर्डला बौंडरीच्या ऐवजीं तीनच धांवा मिळून ब्रॅडमन खेळावयास आला. पण या धांवेच्या बचतींत वूलेचा हात चांगलाच हात सडकला आणि एकदां पराजित झालेला हा नेपोलियन पुनः वाटर्लूच्या वाटेस गेला नाहीं.

यानंतर क्लार्कच्या एका स्वशरीराच्या अनुरोधानें येणाऱ्या चेंडूला एक तडाखा देऊन त्यानें हद्दपार केलें आणि फळयावर १४० धांवा लावल्या. डॉनचा हा फटका साहसकारक असतो. असा चेंडू मारतांना बॅट अणुभरही तिरकस लागली तर औषधांत चुकून पडलेल्या विष-बिंदूप्रमाणें खेळाडूचा निकाल लागल्याशिवाय रहात नाहीं. तसें झालें तर चेंडूसमोर जावयाच्या ऐवजी लेगकडे 'येळकोट' करून बसलेल्या पांचसहा क्षेत्ररक्षकांतील एखाद्याच्या हातांत लोण्याच्या गोळ्यासारखा जाऊन बसतो आणि हा 'दैवा!' म्हणत बॅटस्मनला हिरमुसलें तोंड

करून पॅव्हेलियनमध्यें परतावें लागतें. शरीरानुरोधी ( Bodyline ) चेंडू ही काय चीज आहे हें पुढें एका प्रकरणांत सांगूच; पण एवढें सांगावयास हरकत नाहीं कीं, भगीरथाच्या साठ हजार पितरांच्या उद्धारार्थ जसें गंगावतरण झालें, त्याप्रमाणें 'डॉन'च्या 'केलिगुल्मा'च्या अभेद्य तटबंदीला खिंडार पाडावयाला 'भूत' आणि 'वर्तमान' अस्त्रे निरुपयोगीं ठरल्यामुळें ' लारवुड ' नांवाच्या क्रिकेटशास्त्रज्ञानें ही विषारी धूर ओकणारी नवीन 'शरीरानुरोधी' तोफ निर्माण केली आहे. पण ' वडवानल ' पचविणाऱ्या रत्नाकराला पृष्ठभागावरील प्रचंड नौका पेटली म्हणून आग थोडीच लागणार आहे ? हालाहालासारखें विष पिऊन त्याचा कंठाला शोभा देणारा अलंकार बनविणाऱ्या महादेवाला एखाद्या शिष्यानें केलेला विषप्रयोग थोडीच बाधा करणार आहे ? डॉन असले विषारी चेंडूही उत्कृष्टपणें फटकावतो हें सिद्ध झालें आहे..

अर्थात् त्याबरोबर हेंही खरें कीं, आणि तें नाकबूल करून चालणार नाहीं कीं अशा तऱ्हेची चेंडूफेक होत असतांना त्याला जरा विचारपूर्वक खेळावें लागतें. पण आतां कुठें अशा चेंडूफेकीस आणि डॉनच्याही खेळाला सुरवात झाली आहे. तो अजून तरूण आहे. ग्रंथ अजून निर्माण व्हावयाचा आहे. त्याचा सध्यांच्या खेळ म्हणजे मलपृष्ठापुढचा प्रस्ताव आहे. फुल आहे. उमलावयाचें आहे. कळींतलें सुगंधी पुष्पपराग आतां नुसतें प्रकट झालें आहेत. बीजेची कोर आतां कुठें दिसू लागली आहे. पूर्ण चंद्रोदयाला अजून अवकाश आहे.



मराठी ग्रंथ संग्रह

# ९

१९३४ चीं पांचवी टेस्ट मॅच म्हणजे क्रिकेटच्या इतिहासांतलि एक 'न भूतो न भविष्यति' असा सामना! पोन्सफर्ड आणि ब्रॅडमन हे दोघे तर जयविजयासारखेंच भासत होते. दोघेजण दोन ध्येयें उराशीं बाळगून त्या ध्येयांप्रत येत होतें. पोन्सफर्डचें ध्येय म्हणजे 'थेंबे थेंबे तळें सांचे' आणि ब्रॅडमनचें ध्येय म्हणजे 'अनंत हस्तें कमलाकरानें, देतां किती घेशील दो करानें?' पोन्सफर्ड हळूहळू धांवांचा आंकडा वाढवीत होता तर ब्रॅडमन अखंडपणें फटके मारून एकेका षड्ष्ठकांत दोन दोन दशकांची भरती करीत होता. ब्रॅडमननें टोलावलेला चेंडू अकरा गड्यांशीं शिवाशिवीचा खेळ खेळून निशाणाला शिवण्यासाठीं म्हणूनच कीं काय सीमापार जाई. अशा रीतीनें चपळाईनें पळणाऱ्या चेंडूची गति कुंठित करावयास अकरा गडी पुरेनात. जलधारांच्या जरतारी कलाबुतींमधून विद्युन्मालेनें 'सूर' मारावा किंवा वळचणींतल्या पिंगट पाचोळ्यांतून भडक रंगाच्या सरड्यानें सळकन् निघून जावें, अगर 'तांबूस' टार्झननें गर्द वृक्षशाखेच्या पार्श्वभूमीवर वल्लरींचा विळखा हाताला बांधून 'पंख नसलेला अजब पक्षी' असा किताब मिळविण्याइतका झोल घ्यावा तसा तो तांबडा कंदुक अकरा लाल रंगांच्या खेळाडूमधून हिरवें गार गवत कापीत कापीत सीमेप्रत तुफान वेगानें जात असे.

ॲलनसारख्या तिरंदाजाचें तीर चालेनात आणि बोजसारख्याच्या

बंदुकीच्या गोळ्याही 'वेज' पाडीनात. बॉंब आणि उत्तम चेंडूफेक्याचा चेंडू हे दोन्हीही सारखेच भयंकर! पण केव्हां? टप पडल्यावर! परंतु डॉन या उत्कृष्ठ इंग्लिश चेंडूफेक्याचें चेंडू टप पडावयाचें आधींच हवेंतल्या हवेंतच फुलांप्रमाणें टोलवत होता. आणि आपलें 'ईश्वरी सामर्थ्य' प्रकट करीत होता. कार्लाईल म्हणतो, 'जो एका कलेंत अद्वितीय तो सर्वत्र गोष्टींत अद्वितीय.' अद्वितीयत्व प्रस्थापित करावयास लागणारी बुद्धि आणि चिकाटी हें 'देणें ईश्वराचें' असतें. रुचिवैचित्र्यामुळें कुणी 'सेनानायक' होतो, कुणी कवि होतो, कुणी हुतात्मा होतो, कुणी साधु होतो, कुणी संगीतज्ञ होतो तर कुणी खेळाडू होतो. जग सर्वांनाच मान देतें. इतिहासांत त्यांचीं नांवें सुवर्णाक्षरांनीं लिहिलीं जातात. गॅलिलिओ, न्यूटन, फॅरॅडे, शेक्सपियर, नेपोलियन, मुसोलिनी यांच्याच इतका मान रणजितसिंग, ब्रॅडमन, हॉब्ज यांना दिला जातो. जग मान देण्याला नेहमींच तयार असतें. परंतु त्याला अपूर्वत्वाची तहान असते. सर्व जगतांतील पुरुषांना आपल्या प्रखर कर्तबगारीनें दिपवून, टाकणारा पुरुषोत्तम कोणत्याही शाखेमध्यें उत्पन्न होऊं शकतो. त्याचा थोरपणा त्याच्या शाखेवर अवलंबून नसतो. क्षीरसागरांत विहार करणारा राजहंस श्वेत आणि काळ्या समुद्रांतला काळा असें थोडेंच आहे? अनिल कोठेंही पडला तरी आपल्या गांठी भेटीच्या खुणा तो करणारच.

ब्रॅडमननें आपल्या खेळांत कित्येक नवीन प्रकारांची भर टाकून क्रिकेटच्या इतिहासांत क्रांती करून सोडली. थोडा वेळ जातो न जातो तोंच व्हेरीटीचा एक 'लोंबता' चेंडू सीमापार करून पोन्सफर्डनें आपलें शतक पुरें केलें. यंदाच्या वर्षाचें हें त्यांचें पांचवें शतक होतें. शनि-मंगळांची युति व्हावी त्याप्रमाणें पोन्सफर्डचे मागोमाग ब्रॅडमनचेंही शतक

पुरें झालें, ह्या सीझनचें हे ब्रॅडमनचें नववें शतक होय, या शंभर धावांत सुमारें १५ सीमान्त टोले होते. जगांतील कोठल्याही खेळाडूनें रसिकांचे केलें नसेल असें समाधान ब्रॅडमननें या पंधरा बौंड-या अतिशय कौशल्यानें मारून केलें. धांवांच्या वाढीचा प्रवाह अगदीं अखंडितपणानें चालला होता. त्यांत 'मज्जन' करणारी रसीक वृत्ती कंटाळली तरी तिचा निर्माता कंटाळला नव्हता. घड्याळाच्या लंबकाप्रमाणें त्याची बॅट चालू होती. कादंबरीकारांत 'एडगर वॉलेस' द्रुतगती लिहिण्याबद्दल प्रसिद्ध होता तसा ब्रॅडमन खेळण्याबद्दल विख्यात आहे.

पोन्सफर्ड आणि ब्रॅडमन ही क्रिकेटपटूंची अजब जोडी ऑस्ट्रेलियाच्या धांवांचा आंकडा भराभर वाढवीत होती. आणि तो वाढवीत असतांना हॉब्ज म्हणतो त्याप्रमाणें इंग्लिश चेंडूफेक्यांचा धुव्वा उडवीत होती.:(on and on went this mighty pair literally slaughtering the bowling.) याचा पुरावा म्हणजे बोज पुनः नव्या जोमानें जेव्हां चेंडू फेंकावयास आला तेव्हां त्याच्या पहिल्या षष्ठकांतच डॉननें बारा धांवा केल्या. यावेळीं पन्नास धांवा काढावयाला या दोघांना ३९ मिनिटें लागलीं. आणि लागलीच फलकावर २५० चा आंकडा झळकला. यापुढें पुनः पोन्सफर्डला व्हेरिटीच्या गोलंदाजीवर वॅटकडून आणि ॲलनच्या बोलिंगवर बूलेकडून जीवदान मिळालें. पोन्सफर्डला बरींच जीवदानें मिळालीं. ही गोष्ट इंग्लिश खेळाडू किती हताश—गलितधैर्य झाले होते, याची चांगली निदर्शक आहे. नाहीं तर हिंदुस्थानांत आलेल्या इंग्लंडच्या दुसऱ्या दर्जाच्या संघाचेंच क्षेत्ररक्षण किती निर्दोष होत होतें; हें पाहिलें म्हणजे टेस्ट मॅच खेळणाऱ्या पहिल्या दर्जाच्या संघाचें क्षेत्ररक्षण किती चांगलें असलें पाहिजे हें

लक्षांत येतें. अशा क्षेत्र-रक्षकांची ही स्थिति केवळ ब्रॅडमन, पोन्सफर्ड यांच्या सणसणीत खेळानेंच झाली असली पाहिजे ही गोष्ट तर्कानें सिद्ध होतें.

धांवांचा एकंदर आंकडा २९० झाला तेव्हां एकट्या डॉनच्या १५० धांवा झाल्या होत्या. त्यांत २१ बौंड्या होत्या. पोन्सफर्डच्या १३७ धांवा होत्या. धांवांची संख्या तुफान वेगानें वाढत होती. फळ्यावर आंकडे चढविणाऱ्या पोऱ्याला क्षणाचीही उसंत. नव्हती. चहाच्या वेळेस फळ्यावर एक बाद तीनशें अकरा असा आंकडा होता.

उपहारानंतर ॲलननें पुनः चेंडूफेंक सुरू केली. त्याचा पहिल्याच षष्ठकांत डॉननें त्याला दोनदां 'हूक' व एकदां 'कट्स्टेक' मारून अकरा धांवा मिळविल्या आणि नंतर या जोडीच्या अशा तीनशें धांवा फलकावर लागल्या. ॲलनच्या षष्ठकांत त्याच्या एका अगदीं सावकाश टाकलेल्या चेंडूला ब्रॅडमननें पीचच्या मध्यावर जाऊन कव्हर पॉईंटवर ' पताकापार ' केलें. तो फटका अनन्यसाधारण होता. गोलंदाजाचें धाबें दणाणून टाकणारा फटका होता आणि ॲलनसारख्या निष्णात चेंडुफेंक्याचेंही धाबें खरोखरच दणाणलें. त्यानें टाकलेले यापुढील चेंडू म्हणजे हतबल झालेल्या एखाद्या 'जिता'ची, एखाद्या स्वाभीमानी आणि बलशाली व्यक्तीपुढें केलेली वायफळ बडबड होती.

केमालपाशाची तडफ, डी व्हॅलेराची महत्वाकांक्षा, पार्नेल, मॅझिनीची प्रसंगावधानता आणि महात्मा गांधीजींची शुचिर्भूतता या सर्व गुणांचा मधुर संगम ज्याचें ठायीं झाला आहे अशी थोर विभूती जगाच्या राजकारणाच्या रंगभूमीवर अजून आली नाहीं, पण क्रीडांगणावर तळपणाऱ्या या दीपकिरणांत राजकीय प्रांतांत तळपणाऱ्या

## डॉन ब्रॅडमन

प्राचीन आणि अर्वाचीन सर्व विख्यात विभूतींच्या गुणांचा मधुर संगम झाला आहे आणि म्हणूनच त्याला ' कर्तुमकर्तुमन्यथा कर्तुम् ' डॉन असें म्हणतात. टिट्बिट्स्मध्यें त्यावर लेख लिहिणारा प्रख्यात लेखक रॉफी थॉमसन ( Roffee Thompson ) त्याला असुरी ब्रॅडमन ( Demon Don Bradman ) असें संबोधितो, दैत्यांनीं देवांना अमानुष म्हणावें यांत नवल तें काय ?

सूर्याचें खग्रास ग्रहण करावयाला राहू नालायक ठरल्यावर केतूनें पुढें व्हावें त्याप्रमाणें अॅलननंतर व्हेरिटी पुढें झाला, पोन्सफर्डनें त्याला एक वेळ सीमापार करून आपल्या दीडशें धांवा पुऱ्या केल्या. मध्यंतरीच्या काळांत 'डॉन' पिसाळल्या सारखा खेळत होता. हतबल झालेल्या इंग्लिश टीमला क्रीडांगणांत थयथय नाचण्यास लावून तो भराभर धांवा काढीत होता. एक लेगकडे तर दुसरा ऑफकडे, तिसरा कव्हर-पॉईंटवर तर चवथा गलींत, पांचवा ग्लान्सला तर सहावा स्लीपमध्यें असे त्याचे फटके मारले जात होते. चेंडूफेंकणाऱ्यांच्या तोंडचें तर नुसतें पाणी पळालें. सी. हेडले हर्वे ( C. Hedley Hervey ) म्हणतो कीं, त्यानें गोलंदाजांच्या हृदयाचा चक्काचूर करून टाकला. ( He has broken the bowlers' hearts ) त्याचे तुफान चेंडू अडवावयाला शंभर क्षेत्ररक्षकही पुरेसे होणार नाहींत. पोन्सफर्डसुद्धां इतका खेळत असून डॉनपुढें रविमालेच्या प्रखर प्रकाशांत दिसणाऱ्या समईच्या वातीप्रमाणें निस्तेज दिसूं लागला. बोलिंगमध्यें पुनः बदल केला गेला. कॅप्टन वॅट यानें स्वतःकडे सरबत्तीचें काम घेतलें. पोन्स-फर्डनें त्याला बरेच वेळां मिडऑनकडे कट् करून फळ्यावर चारशें धांवा झळकविल्या. या चारशें धांवा काढण्याला ३०५ मिनिटें लागलीं.

चरित्र नं. ७९५
ता. ..........



थोड्याच वेळांत डॉनच्या स्वतःच्या दोनशें धांवा पुऱ्या झाल्या आणि क्रीडांगणाच्या चारी बाजूंनीं टाळ्यांचा एकच गजर झालेला ऐकूं आला.

डांबरी फटाक्यांचा सर पेटवल्यासारखें डॉन आणि पोन्सफर्ड हे दोघेही चेंडू पिटून काढीत होते. बॅटच्या एका फुलपीच चेंडूला डॉननें ग्लान्सकडे फारच सफाईदार फटका मारून मार्मिक प्रेक्षकांच्या डोळ्यांचें पारणें फेडलें. सर्वसाधारण प्रेक्षक तर दिपूनच गेले. खुद्द रणजितसिंगजीच पुनश्च स्वर्गावतरण करून ओव्हलच्या मैदानावर आपलें कौशल्य दाखवीत आहेत कीं काय, असा भास होत होता. इमर्सन म्हणतो, " अद्वितीय व्यक्ति ईश्वर ज्या ' मुशींतून ' निर्माण करीतो आहे ती तो लगेच फोडून टाकतो. कारण त्याचें अद्वितीयत्व एरवीं राहणार नाहीं. परंतु ही सत्योक्ती रणजितसिंगाच्याच तोडीचा खेळ दाखवून डॉन ब्रॅडमन यानें खोटी ठरविली आहे."

सायंकाळ होत आली. एका बाजूनें चेंडू फेंकले जात होते तर दुसऱ्या बाजूनें दुप्पट वेगानें ते मारले जात होते. या दोघांपैकीं कोणीं केव्हां बाद व्हावयाचें हें मानवाधीन राहिलें नाहीं असेंच सर्वांना वाटूं लागलें. क्षेत्ररक्षकांत तर उत्साहाचा लवलेशही राहिला नव्हता. फलहीन ठरलेल्या श्रमामुळें त्यांचा प्रयत्नवादावरील विश्वासही कमी होत चालला होता. प्रयत्न निष्फळ ठरल्यावर दयाघन प्रभूची आठवण होते, त्याप्रमाणें ४०००० इंग्लिश अंतःकरणें परमेश्वराची करुणा भाकूं लागलीं. धांवांचा आंकडा फक्त २१ असतांना खेळावयास आलेली ही जोडी फलकावर ४५० धांवा लागल्या तरी ताज्या दमानें खेळतच होती. देव भावाचा भुकेला आहे......आणि डॉन आतां कंटाळला होता......त्याच्या टीमला आतां फारशा धांवांची जरूरी नव्हती.

एक बाद ४५० धांवा हें रेकार्ड जगांतील आतांपर्यंतच्या कोणत्याही विकेटचें रेकार्ड मोडून टाकणारे होतें......आतां त्याला खेळावयाचें कांहीं कारणही दिसत नव्हतें......खेळ संपावयाला चारपांच मिनिटेंच अवकाश होता. चारपांच मिनिटें टिकून राहणें डॉनला फारसें जड नव्हतें. परंतु......बोजनें टाकलेल्या एका आंखूड चेंडूला डॉननें दोन्ही हातानें टेनिसशॉटसारखें टोलवलें आणि तो चेंडू अगदीं अलगत-पणें ऑनसाईडला ॲमेजच्या हातांत पडला. डॉन बाद झाला. त्याचें स्वागतार्थ सबंध मैदान प्रेक्षकांच्या आरोळ्यांनीं नुसतें दुमदुमून गेलें. डॉननंतर मॅकेब येऊन उरलेला वेळ खेळला. पण त्याचा खेळ पहा-वयाला क्रीडांगणांत अर्धेसुद्धां प्रेक्षक उरले नव्हते. डॉन परत आला तेव्हां ऑस्ट्रेलियाच्या ४७२ धांवा झाल्या होत्या.

* * *

*त्याच्या खेळासंबंधानें दुसऱ्या दिवशीं डेली हेरल्डमध्यें एका अना-मिक व्यक्तीनें लिहिलें होतें—"तो एक अजस्र खेळाडू आहे. आणि गंमत अशी कीं, दिवसभर त्यानें चांगल्या लेंग्थचें बोलिंग चोपून काढलें, परंतु शेवटीं एका अगदीं सध्या बॉलला आपणाला बाद करा-वयाचें श्रेय दिलें. कौशल्यपूर्ण गोलंदाजीपेक्षां त्याच्या स्वतःच्या इच्छे-मुळेंच तो बाद झाला. त्याच्या सन्मानार्थ माझी टोपी काढावयास मी केव्हांही तयार आहे. ईश्वर डॉनला चिरायु करो !" सर्वच रसिकांनीं डॉनवर उधळलेलीं स्तुतिसुमनें वरीलप्रमाणेंच सुगंधी आणि सुरंगी होतीं.*

हॉब्जनें पराभव कबूल करून 'The Star' मध्यें लिहिलें होतें—

"The best thinng I can say is 'well done, Australia! but watch out for us during the next tour.' I am optimistic enough to think that we can get together a side to beat Australia then." आणि एवढें आशावादी किरण कोमेजून गेलेल्या इंग्लिश अंतःकरणस्वरूप मृणालतंतूवर फेंकल्यानंतर, कोंबडा झांकून ठेवला तरी उजाडावयाचें थांबत नाहीं, हें जाणून तो लिहितो, "आपल्या जयाच्या मार्गांतील मुख्य अडचण म्हणजे 'डॉन ब्रॅडमनच' होय."

(Our stumbling block is Don Bradman. He is too great an absolute most in himself). तो असावयाला नको होता तितका चांगला आहे.

गुणवर्णन करावयाचें जेवढे जेवढे प्रकार आहेत त्या त्या सर्वांनीं आपल्या मर्यादा सोडून 'जानकी'प्रमाणें रेघेपलिकडे चार पावलें जाऊन या प्रचंड 'राक्षसाचें' स्वागत केलें.

छायाचित्रें, स्वभावचित्रें प्रसिद्ध झालीं, स्वाक्षरी घेतलीं गेलीं. न्यूज रीलसमधून त्याच्या खेळाचें दिग्दर्शीकरण केलें गेलें. 'शहानशहांनीं' अभिनंदनाची तार पाठविली आणि एका रसिकानें त्याला त्याच्या जन्मग्रामीं २०००० फूट लांब, रुंद सुपीक जमीन बक्षिस दिली.

तीस सालीं ओव्हलवर डॉननें आपलें द्वितीय शतक पुरें केलें. तेव्हां क्रीडांगणावर त्याच्या नांवाची एक तार पोष्टमननें आणून दिली. टाळ्यांचा कडकडाट थांबला नव्हता तेव्हांच त्यानें ती वाचून काढली. "त्याच्या खेळावर बहोत खूष होऊन त्याच्या एका सजातीयानें त्याला एक हजार पौन्डांचा म्हणजे १५००० पंधरा हजार रुपयांचा चेक पाठविला होता.

एक बाद ४५० धांवा हें रेकार्ड जगांतील आतांपर्यंतच्या कोणत्याही विकेटचें रेकार्ड मोडून टाकणारें होतें......आतां त्याला खेळावयाचें कांहीं कारणही दिसत नव्हतें......खेळ संपावयाला चारपांच मिनि-टेंच अवकाश होता. चारपांच मिनिटें टिकून राहणें डॉनला फारसें जड नव्हतें. परंतु......बोजनें टाकलेल्या एका आंखूड चेंडूला डॉननें दोन्ही हातानें टेनिसशॉटसारखें टोलवलें आणि तो चेंडू अगदीं अलगत-पणें ऑनसाईडला ॲमेजच्या हातांत पडला. डॉन बाद झाला. त्याचें स्वागतार्थ सबंध मैदान प्रेक्षकांच्या आरोळ्यांनीं नुसतें दुमदुमून गेलें. डॉननंतर मॅकेब येऊन उरलेला वेळ खेळला. पण त्याचा खेळ पहा-वयाला क्रीडांगणांत अर्धेसुद्धां प्रेक्षक उरलें नव्हते. डॉन परत आला तेव्हां ऑस्ट्रेलियाच्या ४७२ धांवा झाल्या होत्या.

* * *

त्याच्या खेळासंबंधानें दुसऱ्या दिवशीं डेली हेरल्डमध्यें एका अना-मिक व्यक्तीनें लिहिलें होतें—"तो एक अजस्र खेळाडू आहे. आणि गंमत अशी कीं, दिवसभर त्यानें चांगल्या लेंग्थचें बोलिंग चोपून काढलें, परंतु शेवटीं एका अगदीं सध्या बॉलला आपणाला बाद करा-वयाचें श्रेय दिलें. कौशल्यपूर्ण गोलंदाजीपेक्षां त्याच्या स्वतःच्या इच्छे-मुळेंच तो बाद झाला. त्याच्या सन्मानार्थ माझी टोपी काढावयास मी केव्हांही तयार आहे. ईश्वर डॉनला चिरायु करो!" सर्वच रसिकांनीं डॉनवर उधळलेलीं स्तुतिसुमनें वरीलप्रमाणेंच सुगंधी आणि सुरंगी होतीं.

हॉब्जनें पराभव कबूल करून 'The Star' मध्यें लिहिलें होतें—

"The best thinng I can say is 'well done, Australia ! but watch out for us during the next tour.' I am optimistic enough to think that we can get together a side to beat Australia then." आणि एवढें आशावादी किरण कोमेजून गेलेल्या इंग्लिश अंतःकरणस्वरूप मृणालतंतूवर फेंकल्यानंतर, कोंबडा झांकून ठेवला तरी उजाडावयाचें थांबत नाहीं, हें जाणून तो लिहितो, "आपल्या जयाच्या मार्गांतील मुख्य अडचण म्हणजे 'डॉन ब्रॅडमनच' होय."

( Our stumbling block is Don Bradman. He is too great an absolute most in himself ). तो असावयाला नको होता तितका चांगला आहे.

गुणवर्णन करावयाचें जेवढे जेवढे प्रकार आहेत त्या त्या सर्वांनीं आपल्या मर्यादा सोडून 'जानकी'प्रमाणें रेघेपलिकडे चार पावलें जाऊन या प्रचंड ' राक्षसाचें ' स्वागत केलें.

छायाचित्रें, स्वभावचित्रें प्रसिद्ध झालीं, स्वाक्षरी घेतलीं गेलीं. न्यूज रील्समधून त्याच्या खेळाचें दिग्दर्शीकरण केलें गेलें. 'शहानशहांनीं' अभिनंदनाची तार पाठविली आणि एका रसिकानें त्याला त्याच्या जन्मग्रामीं २०००० फूट लांब, रुंद सुपीक जमीन बक्षिस दिली.

तीस सालीं ओव्हलवर डॉननें आपलें द्वितीय शतक पुरें केलें. तेव्हां क्रीडांगणावर त्याच्या नांवाची एक तार पोष्टमननें आणून दिली. टाळ्यांचा कडकडाट थांबला नव्हता तेव्हांच त्यानें ती वाचून काढली. ' त्याच्या खेळावर बहोत खूष होऊन त्याच्या एका सजातीयानें त्याला एक हजार पौन्डांचा म्हणजे १५००० पंधरा हजार रुपयांचा चेक पाठविला होता.

एक बाद ४५० धांवा हें रेकार्ड जगांतील आतांपर्यंतच्या कोणत्याही विकेटचें रेकार्ड मोडून टाकणारें होतें......आतां त्याला खेळावयाचें कांहीं कारणही दिसत नव्हतें......खेळ संपावयाला चारपांच मिनिटेंच अवकाश होता. चारपांच मिनिटें टिकून राहणें डॉनला फारसें जड नव्हतें. परंतु......बोजनें टाकलेल्या एका आंखूड चेंडूला डॉननें दोन्ही हातानें टेनिसशॉटसारखें टोलवलें आणि तो चेंडू अगदीं अलगत-पणें ऑनसाईडला ॲमेजच्या हातांत पडला. डॉन बाद झाला. त्याचें स्वागतार्थ सबंध मैदान प्रेक्षकांच्या आरोळ्यांनीं नुसतें दुमदुमून गेलें. डॉननंतर मॅकेब येऊन उरलेला वेळ खेळला. पण त्याचा खेळ पहावयाला क्रीडांगणांत अर्धेसुद्धां प्रेक्षक उरलें नव्हते. डॉन परत आला तेव्हां ऑस्ट्रेलियाच्या ४७२ धांवा झाल्या होत्या.

* * *

त्याच्या खेळासंबंधानें दुसऱ्या दिवशीं डेली हेरल्डमध्यें एका अनामिक व्यक्तीनें लिहिलें होतें—"तो एक अजस्त्र खेळाडू आहे. आणि गंमत अशी कीं, दिवसभर त्यानें चांगल्या लेंग्थचें बोलिंग चोपून काढलें, परंतु शेवटीं एका अगदीं सध्या बॉलला आपणाला बाद करावयाचें श्रेय दिलें. कौशल्यपूर्ण गोलंदाजीपेक्षां त्याच्या स्वतःच्या इच्छेमुळेंच तो बाद झाला. त्याच्या सन्मानार्थ माझी टोपी काढावयास मी केव्हांही तयार आहे. ईश्वर डॉनला चिरायु करो !" सर्वच रसिकांनीं डॉनवर उधळलेलीं स्तुतिसुमनें वरीलप्रमाणेंच सुगंधी आणि सुरंगी होतीं.

हॉब्जनें पराभव कबूल करून 'The Star' मध्यें लिहिलें होतें—

"The best thinng I can say is 'well done, Australia! but watch out for us during the next tour.' I am optimistic enough to think that we can get together a side to beat Australia then." आणि एवढें आशावादी किरण कोमेजून गेलेल्या इंग्लिश अंतःकरणस्वरूप मृणालतंतूवर फेंकल्यानंतर, कोंबडा झांकून ठेवला तरी उजाडावयाचें थांबत नाहीं, हें जाणून तो लिहितो, "आपल्या जयाच्या मार्गातील मुख्य अडचण म्हणजे 'डॉन ब्रॅडमनच' होय."

( Our stumbling block is Don Bradman. He is too great an absolute most in himself ). तो असावयाला नको होता तितका चांगला आहे.

गुणवर्णन करावयाचें जेवढे जेवढे प्रकार आहेत त्या त्या सर्वांनीं आपल्या मर्यादा सोडून 'जानकी'प्रमाणें रेघेपलिकडे चार पावलें जाऊन या प्रचंड ' राक्षसाचें ' स्वागत केलें.

छायाचित्रें, स्वभावचित्रें प्रसिद्ध झालीं, स्वाक्षरी घेतलीं गेलीं. न्यूज रीलसमधून त्याच्या खेळाचें दिग्दर्शीकरण केलें गेलें. 'शहानशहांनीं' अभिनंदनाची तार पाठविली आणि एका रसिकानें त्याला त्याच्या जन्मग्रामीं २०००० फूट लांब, रुंद सुपीक जमीन बक्षिस दिली.

तीस सालीं ओव्हलवर डॉननें आपलें द्वितीय शतक पुरें केलें. तेव्हां क्रीडांगणावर त्याच्या नांवाची एक तार पोष्टमननें आणून दिली. टाळ्यांचा कडकडाट थांबला नव्हता तेव्हांच त्यानें ती वाचून काढली. ' त्याच्या खेळावर बहोत खूष होऊन त्याच्या एका सजातीयानें त्याला एक हजार पौन्डांचा म्हणजे १५००० पंधरा हजार रुपयांचा चेक पाठविला होता.

१०

लेखणीवर, कुंचल्यावर, तरवारीवर अनेकांनीं बरकत केली. परंतु डॉनची ही 'फळकुटी'वरील ' मिळकत ' अभूतपूर्व !

या धनसंपदेच्या कौतुकाला कांहीं मर्यादा तरी होती. परंतु सर्व जगभर ' अगणित ' आबालवृद्धांकडून मुग्ध भाषेंत जें त्याचें कौतुक केलें गेलें तें अमर्याद होतें.

सिसिरो, डेमॉस्थेनिस यांच्या रसनेनें वातावरण एके काळीं गोड निनादानें भारून टाकलें. नेपोलियनची तरवार एक वेळ दुनियेभर तळपली आणि आज डॉनच्या प्रचंड क्रीडाक्रांतीच्या कक्षेंत सारें जग सांपडलें आहे.

" Bradman's record–breaking feats are to be found tabulated in the Cricket–annuals, so that I need not give them here; Let me say, though, that I would not lay as much emphasis on his huge scores as on the number of centuries he made during the tour... I do not refer to Bradman's Test perfromances when every run was wanted;......and in economy–he is a batsman who has no comparison from past or present. "

—Hobbs (in playing for England, page 169–170)

बालार्कावरून रचले गेलेलें १९३१ सालांतील डॉनबद्दलचें हें सुप्रभात गीत सुप्रसिद्ध क्रिकेटपटु हॉब्ज याचें आहे. आज डॉनची प्रभा

मध्यान्हावर तळपून आहे. क्रिकेटच्या खेळांत सर्वांत लहान, चपळ, वभैव-शाली अशी व्यक्ति कोणती असा प्रश्न जगांतल्या कुठल्याही भागांत (कीं जेथें हा खेळ खेळला जातो.) कोणालाही केला तर तो पळाचाही विलंब न लावतां उच्चार करील. डॉन ब्रॅडमन ! या प्रश्नावर आता एकमत झालें आहे. या इवल्याशा अभिमन्युनें क्रीडांगणावर प्रवेश करतांच क्षेत्ररक्षक जास्त कसोशीनें उभे राहातात. त्याला बाद करावयाचा मान आपाल्याला मिळावा अशी बोलर्सनीं इच्छा करावी एवढें त्याचें महत्व. भाटांच्या ललकाऱ्यांत भूपालानें दरबारांत पदक्षेप करितांच मानकऱ्यांनीं 'आदबी' द्यावी हें साहजिकच आहे. स्वागतपर वाजलेल्या प्रचंड टाळ्यांच्या कडकडाटांत हा क्रिकेटचा राजा मैदानांत येतो तेव्हां अकरा इंग्लिश तानकरी त्याला स्वेच्छेनें पहिली सलामी देतात. तो पविऱ्यांत उभा राहिला कीं, इतका मोहक दिसतो कीं, रसिकजन त्याकडे आकर्षिले जातात. तो चेंडू अशा रुबाबांत मारतो कीं, आलेल्या प्रत्येक चेंडूला टोला देणें हा त्याच्या बॅटचा जन्मसिद्ध हक्क आहे असें त्याला वाटत असावें. त्याचा स्वभाव मितभाषी असला तरी त्याच्या नांवाचा बोभाटाच असा कीं, तो अबोल राहूनही 'मी आधिपत्य गाजविण्याकरितांच येथें अवतीर्ण झालों आहे' असें जगानें मानावें. चेंडूचा क्षणार्धांत अजमास बांधणारे त्याचें पाणीदार डोळे, केसांच्या विशिष्ट रचनेमुळे आडव्या 'द' प्रमाणें ऊर्ध्वभागीं दिसणारें त्याचें कपाळ, आणि ज्यांच्या ताकदीवर आणि चपळतेवर आज त्याचें कीर्तिमंदीर उभारलें आहे, ती त्याची कसदार 'रक्तशुभ्र' मनगटें हीं पाहतांक्षणींच डोळ्यांत भरावींत अशीं आहेत.

त्याच्या कीर्तिध्वजाची पताका इतक्या उंच जयस्तंभावर प्रस्थापित

झाली आहे कीं, वायुलहरीबरोबरची तिची नृत्यकला उत्तर–ध्रुव आणि दक्षिण–ध्रुव यांजमध्यें सांपडलेल्या अवघ्या ब्रह्मांडाला टेहेळता यावी. सध्यांची त्याची वयोमर्यादा २५ वर्षांची आहे. एवढया अल्पकालावधींत एवढी प्रसिद्धी आणि एवढी कर्तबगारी जगांत फारच थोड्यांच्या वांटयाला येऊं शकते.

गुलाबाला कांटे आहेत, इंद्रधनुष्य फार उंच आहे आणि सुवर्ण गंधरहित आहे म्हणून नाक मुरडणारें कुत्सित टीकाकार या जगांत थोडे नाहींत ! डॉन प्रौढ नाहीं म्हणून त्याच्या धीर, गंभीर क्रीडाशैलीला एखादें कुत्सित विशेषण लावणारें एखाददुसरें जॉर्डिन, लारवूड जगांत असावयाचेच. वेड्याची समजूत घालतां येतें, पण मुद्दाम पूर्वग्रहदूषित बुद्धीनें वेडेपणाचें पांघरूण घेतलेल्याची समजूत कशी आणि कोण घालणार ? झोंपी गेलेल्याला जागा करतां येईल पण झोंपेचें सोंग घेतलेल्याला कानाशीं तोफांचे चौघडे वाजविले तरी त्याचें काय होय? परंतु एखाद्या दिमाखानें धांवणाऱ्या पावसाळ्यांतील हंगामी ओढ्यानें सागराशीं असहकार केला म्हणजे त्याच्या वैभवांत कमतरता येईल काय ? जॉर्डिन आणि लारवुड हें आपल्या परीनें श्रेष्ठ असतील, नव्हे आहेतच परंतु उंदीर धष्टपुष्ट झाला म्हणून त्यानें भांजराच्या गळ्यांस घांट बांधण्याचें धाडस करावें काय ?

गुणांचें मोजमाप वयोमर्यादेच्या तराजूत करावयाची प्रथा या जगांत असते तर 'तेजसां हि न वय समीक्ष्यते' असा सुंदर अर्थांतरन्यास कालिदासाच्या समाधि अवस्थेंतून प्रतिभेनें निर्माण केला नसता. वुइल्यम पिट, नेपोलियन, लिंडबर्ग हेलेन, जेकॉब हीं नांवेंही ऐकूं आलीं नसतीं.

शहाण्यालाही दिङ्मूढ करणारी त्याची विस्मयकारक वागणूक आहे खरी; लहान वयांत त्रिखंड कीर्ती फडकाविण्याचा मान मिळविलेल्या व्यक्तीच्या मुखकमलावर नेहमीं हास्यचंद्रिका फुललेली असावयाची पण ब्रॅडमनचें सर्वच जगाविरहित. केरःवसुतांच्या निःसंग म्हातारीप्रमाणें 'हर्षखेद ते मावळले' अशी त्याची गंभीर मुखच्छबी रोमचा कोळसा होत असतांना गानसमाधींत निमग्न असलेला नीरो आणि फलकावर प्रथम शतक, द्वितीय शतक, तृतीय शतक अशी आपल्या पराक्रमाची सुरेख आकृति चितारली जात असतां जणूं काय कांहीं झालेंच नाहीं, अशा रीतीनें खेळूं लागणारा धीरगंभीर डॉन ब्रॅडमन यांच्या कीर्तींत फरक असला तरी मनोरचनेंत नाहीं. हॉब्ज आपल्या एका पुस्तकांत डॉनच्या या वैराग्यशील वृत्तीला उद्देशून म्हणतो.—

" Personally I always found Don Bradman an attractive simple-hearted lad. I must say, however, that it would have pleased me better, had he been more demonstrative. He ought to have shown more of the joy of life when in the Tests he got his hundred, his two hunred, his three hundred ! He took it all too much like an old-strger instead of a boy of twenty-one. When Charlie Mocartney used to reach his hundred he would begin hitting every ball out of sheer delight in his achievement. Don Bradman rever batted an eyelid. "

पण मी म्हणतों बालवयांत 'ज्ञानेश्वर' प्रौढ झाला आणि 'विश्वासा' नें पानिपत लढविलीं यांत बिघडलें कोठें ? प्रौढपणीं पोरकटपणा दाखविण्यापेक्षां बालवयांत प्रौढांना हलवून सोडणारी कामगिरी कर-

णाऱ्याचीच कृति जास्त कौतुकास्पद होय. आणि कुणी सांगावें डॉनला अद्याप झालें तें अगदीं अपूर्णच वाटत असेल? सहस्र काढावयाला मैदानांत पाऊल टाकणाऱ्या डॉनला कदाचित् शतकांवरच परतावें लागत असेल. सुप्रसिद्ध पुरुषांच्या मनोभूमिका सामान्य जनांपासून अगदीं वेगळ्या असतात. खाडिलकरांच्या कैकेयीला 'लक्ष्मणाच्या मनाचा थांग लागावयाला अनेक अंक मोजावे लागले.' In Bradman, Ponsford...had a battery cure to get a great number of runs' असा करून झाल्यावर हॉब्ज पुढें लिहितो, 'In the field with a man like Bradman available they had always a defensive advantage.' हा उतारा हॉब्जच्या पुस्तकाच्या अगदीं ताज्या म्हणजे १९३४ च्या आवृत्तींतून घेतलेला आहे.

डॉनच्या चपळ क्षेत्ररक्षणाचा प्रथम अनुभव हॉब्जला १९२९मध्यें आला, त्या अनुभवाचा त्याला जन्मांत विसर पडावयाचा नाहीं. डॉनची आणि त्याची ती प्रथम भेट होती. पन्नासाला एक धांव कमी असतांना डॉननें हॉब्जची विकेट क्षेत्ररक्षण करीत असतांना मोठ्या चापल्यानें उडविली.

शिकाऱ्याची योग्यता जखमी सावजाला जशी कळेल तशी इतरेजनांना क्वचितच कळत असेल. तलवारीची धार ढालेला आणि लढणाऱ्या खेळाडूची योग्यता दुसऱ्या प्रतिस्पर्ध्याला चटकन् उमजते. कर्णाचा पराक्रम पार्थाला जेवढा ज्ञेय झाला असेल तेवढा खुद्द परमेश्वरालाही नसेल. हॉब्ज खरा खेळाडू वृत्तीचा आहे म्हणूनच डॉनचें गुणवर्णन डोळ्यांवर पूर्वग्रहदूषित्वाची कांतडी न ओढतां तो करूं-

स्वकीय प्रत
सं. चरित्र नं. ८१८
ता. ..........



शकतो. थोर पुरुषांची योग्यता समजावयाला आणि त्यांचें गुणवर्णन करावयालासुद्धां अंगीं लायकी लागते. शकुंतलेचें सौंदर्यवर्णन करावयाला प्रतिभासंपन्न कविश्रेष्ठ कालिदासाची योजना भगवंतानें केली ! गंगालहरीचें रोमहर्षण वर्णन करावयाला संस्कृत पंडित जगन्नाथराय पुढें सरसावला ! कोंदणावांचूनहि हिरा तेज पाडीत असला, तरी कृष्णमेघांच्या काळ्या रुजाम्यापेक्षां फेनशुभ्र ढगांच्या रुईदार कापसावर रविबिंब जास्त उठावदार दिसतें.

आतांपर्यंत झालेल्या इंग्लंड—ऑस्ट्रेलिया यांच्या टेस्टस्‌मध्यें सर्वांत तरुणपणीं शतक काढणाऱ्यांत डॉन ब्रॅडमनचा पहिला नंबर लागतो. दुसरा क्रमांक क्लीम हिल (Clcem hill) याचा आहे. डॉनपेक्षां कांहीं महिन्यांनीच तो मोठा आहे, ही गोष्ट अगदीं साहजिकच आहे. कारण ग्रँड डर्बी अगर ऑलिंपिक सामन्यांतील पहिलें, दुसरें यांच्यांत अंतर अगदीं थोडेंच असतें.

डॉनची आणि क्लीम हिल्ची ही जी ‘ डावी उजवी ’ झाली त्याला आज सहासात वर्षें झालीं आहेत. १९२९ साल डॉनच्या बाबतींत ‘ बाळाचे पाय पाळण्यांतच दिसतात ’ याच महत्वाचें राहिलें आहे. उदयाचलांवरील लाजरें अर्धस्फुट रविबिंब, वायुबरोबर निश्वास सोडणारी वेलीवरील अर्धोन्मीलित कलिका यांत आणि मध्यान्हावरील पूर्ण रविबिंब अगर आपल्या गंधमाधुर्यानें रसिकांचें रंजन करणारें सुकुमार कुसुम यांत जमीनअस्मानाचें अंतर आहे. उत्पत्ति, स्थिति आणि लय यांमधील ‘स्थिती’त तो आहे. सकाळ, दुपार आणि सायंकाळ यांमधील ‘ दुपार ’ तो अनुभवीत आहे.

## ११

पृथ्वीतलावरील विद्यमान राष्ट्रांमध्यें अतिशय श्रीमान्, उद्योगी आणि बुद्धिवान अशी प्रजा असलेल्या आणि जगाच्या पुढें पन्नास वर्षांनीं धांवणाऱ्या अमेरिकेस डॉन ब्रॅडमननें १९३२ मध्यें भेट दिली. त्याच्या खेळाचीं वर्णनें वांचून अमेरिकन लोकांनीं त्याला नुसतें कोठें ठेवूं आणि कोठें नाहीं असें करून टाकिलें.

न्यूयॉर्क टाइम्सनें त्याची मुलाखत घेण्याला आपला खास बातमीदार पाठविला होता. १४८ पौन्ड वजनाची डॉनची बालमूर्ती इतका स्कोअर काढते तरी कशी असेंच त्याला वाटलें. त्यानें पहिलाच प्रश्न टाकिला, " आपण येवढा मोठा स्कोअर काढतां तरी कसा ? " यावर डॉन म्हणतो, " ते तर अगदींच सोपे. " अत्तराच्या मोठया दिसणाऱ्या बाटलींतून जसा अगदींच लहानसा अत्तराचा थेंब निघतो तसेंच हें डॉनचें उत्तर होतें. पण यांत डॉनच्या स्वाभिमानाचा अनंत अर्थ सांठविला होता. मराठींत मला चार शब्द तरी लिहावे लागले, परंतु डॉननें फक्त 'इझी' 'easy' एवढाच उच्चार केला होता.

डॉनच्या अंगांतील आकर्षण शक्ती अतिशय बळकट असल्यामुळें सर्व प्रेक्षक त्यांचा खेळ चालू असतांना नुसतें डोलत असतात. या आकर्षणशक्तीमुळेंच डॉन हा असामान्य खेळाडू ठरला गेला आहे. उत्कृष्ट क्रिकेट खेळणारे खेळाडू अनेक आहेत. परंतु डॉनची आकर्षणशक्ति कोणांतही नाहीं, चिकित्सक टीकाकारांच्या मतें डॉन ब्रॅडमन हा प्रतिभासंपन्न खेळाडू आहे.

## डॉन ब्रॅडमन

ऑस्ट्रेलियाविरुद्ध सर्व इंग्लंड असा सामना ता. ३ सप्टेंबर१९३४ रोजीं खेळण्यांत आला. पांचव्या टेस्ट नंतर खेळला गेलेला हा दुसराच सामना होय. परमेश्वरानें पर्जन्यास्त्र सोडल्यामुळें पहिल्या दिवशीं खेळ बंदच ठेवण्यांत आला. या सामन्याचें महत्व विशेष होतें. कारण या सामन्यांत इंग्लंडकडून एका काळचें क्रिकेटसम्राट म्हणून चमकलेलें, इंग्लंडचें केवळ भीष्माचार्यच असे सुप्रसिद्ध खेळाडू 'हॉब्ज' हें खेळणार होते.

'ओली की सुकी' केली गेली आणि हॉब्ज आणि वॉल्टर्स ही पहिली जोडी खेळण्यास गेली. ऑस्ट्रेलियाच्या तुफान चेंडूफेंकीस दोघांनींही धीमेपणानें तोंड देण्यास सुरवात केली. दुपारीं तीनला खेळण्यास उतरलेल्या या प्रख्यात क्रिकेटपटूंनीं ऑस्ट्रेलियन गोलंदाजीचे नुसते तीन तेरा करून टाकले परंतु चंचलवृत्तीच्या वॉल्टर्सनें सुप्रसिद्ध डावखोरा चेंडूफेक्या डेव्हिड स्मिथ याच्या वेगवान् चेंडूला हूक करण्याचा खटाटोप केला. आणि संधान चुकल्यामुळें त्याचा त्रिफळा उडाला. वॉल्टर्सनंतर वूले आला आणि जगरहाटीप्रमाणें हॉब्ज हा स्वतः लवकरच बाद झाला. वॉल्टर्सला चीत करणाऱ्यानेंच हॉब्ज्चा लोण्याचा गोळ्यासारखा झेल मॅकेबच्या हातीं दिला. त्या दिवशीं खेळ संपावयाचे वेळीं इंग्लंडचा स्कोअर तीन बाद १८६ असा होता.

दुसऱ्या दिवशीं इंग्लंडचा होणारा प्रचंड स्कोअर पहाण्यास आलेल्या उत्सुक प्रेक्षकांना इंग्लंडची तीन शतकेंही पुरीं झालेलीं दिसलीं नाहींत. परंतु ऑस्ट्रेलियावर खेळ संपण्यापूर्वीच २७९ धांवा करणारी जबाबदारी पडली. कारण तो या सामन्यांतील शेवटचा दिवस होता.

ऑस्ट्रेलियाचे भीमार्जुन खेळण्यास गेले आणि अर्जुनानें अवघ्या १०४

मिनिटांत १४९ धांवा काढून हॉब्जला चकित करून सोडलें. खेळ संपला तेव्हां ऑस्ट्रेलियाच्या ३६५ धांवा होऊन ब्रॅडमन खेळत होता. हॉब्ज म्हणतो—

' Austrelia made 365 runs for four wickets, mainly because Bradman played a whir wind in nings.

हॉब्जसुद्धां ब्रॅडमननें उडविलेल्या या झंझावातांत सांपडला. डॉननें ९० मिनिटांत शतक पुरें केलें, आणि खेळ संपण्याचें वेळीं १६६ धांवा केल्या. या तुफान खेळांत त्यानें चार सहाचें आणि चाराचें सतरा सुंदर आणि सफाईदार फटके मारले.

शेंकडो सैनिकांच्या बंदुकींतून गोळ्यांची फैर झाडली जावी अगर वळिवाच्या पावसाची धार लागावी त्याप्रमाणें डॉनचा खेळ द्रुतगती आणि दैदिप्यमान झाला. शतक फळकावर झळकल्यावर डॉननें फ्रीमन या इंग्रज गोलंदाजाला पहिल्याच चेंडूला मिडऑनला टोलवले, दुसरा चेंडू 'हुक' करून सीमापार केला. तिसरा पायामार्गें अंतरिक्षांतून सीमांत मारला. चौथा कव्हर पॉइंटवर अंतराळांतून सीमेबाहेर टोलावला. पांचवा ग्लान्सकडे चार क्षेत्ररक्षकांची अभेद्य समजली जाणारी फळी भेद्य ठरवून, सहावा चेंडु हवा खात खात सीमेबाहेर उडवून दिला. अशा रीतीनें एका षष्टकांत डॉननें तीस धांवा काढल्या. वॉल्टर्सनें एका वर्तमानपत्राच्या प्रतिनिधीजवळ उद्‌गार काढले, "त्याचा हा जोरदार खेळ पाहून मला असा संशय येत आहे कीं, त्याच्या शरीरांत रक्ताऐवजीं तेजोरसाचेच अभिसरण होत असतें. डॉनसारखे जर दोन चार खेळाडू ऑस्ट्रेलियानें पैदा केलें, तर आम्हांला टेस्ट मॅचेस् बंद कराव्या लागतील.

या खेळांत धांवांचें महत्त्व विशेष आहे. बोलरचा उपयोग दारू गोळ्याप्रमाणें होतो; तर बॅटस्मनचा उपयोग धान्याच्या कोठारासारखा होतो. डॉन आपला तुफानी खेळ नेहमींच चालू ठेवीत नाहीं. सर्व गडी बाद होऊन अकरावा खेळाडू ( हा खेळाडू बहुतेक नालायक असतो ) क्रीडांगणावर उतरला कीं, डॉन पांच चेंडू तटवून सहाव्याला धांव काढून पुनः खेळण्यास जातो. मध्येंच एखादा टोला मारलाच तर तो सीमान्त तरी असतो अगर दोन धांवा देणारा तरी असतो.

एका प्रांतिक सामन्यांत ऑस्ट्रेलियाचा सहा बाद पस्तीस असा खेळ होऊन सामना जिंकावयास दोनशें धांवांची जरूरी होती. प्रतिपक्षाची भयंकर चेंडूफेंक नुसती अडवणेंही अवघड होतें. परंतु ऑस्ट्रेलियाला अजून थोडीं आशा होती, कारण ब्रॅडमन अजून खेळावयाचा होता. डार्लिंग बाद होऊन चिपरफील्ड खेळावयास आला तेव्हां ब्रॅडमननें त्याला कांहीं कानमंत्र दिला. त्या दिवशीं चिपरफील्ड सायंकाळपर्यंत क्रीडांगणावर हालचाल करीत होता, परंतु त्याचा स्कोअर अकराच होता. खेळ संपावयाचे वेळीं फळ्यावर ऑस्ट्रेलियाच्या तीनशें धांवांचा गरगरीत आंकडा लागलेला होता. आणि विजयश्रीची पुष्पमाला गळ्यांत घालून डॉन आपल्या संवगड्यासह ऑस्ट्रेलियाच्या तंबूंत परतला.

तात्पर्य हेंच कीं, डॉन हा वेळ पाहून, प्रसंग पाहून खेळणारा खेळाडू आहे. त्याचा खेळ सैतानी आडदांडपणाचा नसून स्वसामर्थ्याच्या चातुर्यानें केलेला उपयोग दाखविणारा मुत्सद्दीपणा आहे. त्याचें लक्ष बिनचूक खेळ खेळण्याकडे जास्त आहे. तो स्वतःच्या यशापेक्षांही आपल्या

सहकाऱ्याच्या यशाकडे जास्त पहातो. अमरनाथाचें शतक पूर्ण व्हावें म्हणून मेजर नायडूंनीं कांहीं काळापूर्वीं थोडासा स्वार्थत्याग केला.नायडूंनीं धांवांचें सहस्र पुरें केलें असतें तर जें कौतुक केलें गेलें असतें त्याच्या सहस्रपट कौतुक त्यांच्या या स्वार्थत्यागानें केलें गेलें. 'नव्या'चें 'नांव' व्हावें म्हणून ' जुन्या'नें मार्ग काढून दिलाच पाहिजे.

डॉनसारखी ईश्वरी देणगी प्राप्त झालेले मान्यवर हिंदुस्थानांत नाहींत कां ? आहेत ! परंतु नव्या तरुण खेळाडूंना पुढें येण्याला आपल्या देशांत वाव दिला जात नाहीं. विशेषतः हिंदू खेळाडूंना मुळींच वाव मिळत नाहीं. सहा वर्षांपूर्वींचे युरोपियन आणि हिंदू यांचे चौरंगी सामन्यातलें संघ आणि गतवर्षीचें संघ बघितल्यास सहज लक्षांत येतें कीं, युरोपियन संघांत बहुतेक खेळाडू नवीन आणि तरुण असून हिंदु संघांत आज दहा दहा, बारा बारा वर्षें खेळणाऱ्या वयोवृद्धांचा भरणा केला जातो. आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या दृष्टीनें तर हिंदुस्थान क्रिकेटच्या बाबतींत अगदीं मागें आहे. गोल्फचा रायडर कप अमेरिका जिंकते. टेनिसचे सामने कधीं अमेरिका, कधीं इंग्लंड तर कधीं फ्रान्स जिंकून घेतात. हिंदुस्थानच्या वांट्यास फक्त हॉकी आणि बुद्धिबळांतील यश मात्र प्राप्त होतें. परंतु सुलतानखान आणि ध्यानचंद यांच्या कीर्तीच्या येवढ्या तुकड्यावर जगणें आतां हिंदुस्थानला शक्य नाही.

हिंदुस्थानला उत्कृष्ट खेळाडू निपजावयास हवे असल्यास नवीन खेळाडूंना पूर्ण वाव दिला गेला पाहिजे. जुन्या खेळाडूंनीं आतां हॉब्ज-प्रमाणें विश्रांति घेत बसलें पाहिजे. आपणांकडे एखाद्या जुन्या खेळा-डूला संघांतून वगळणें म्हणजे एक मोठी अडचण भासते. कारण जुन्या खेळाडूनें आपलें प्राविण्य दाखविलेलें असतें व पुनः तो खेळ-

ण्याची इच्छा धरतो. अशा स्थितींत एखाद्या नवीन खेळाडूला संघांत घेणें म्हणजे केवळ अशक्य होऊन बसतें ! नवीन लोकांना संधि देतांच ते नांव मिळविण्यासारखा खेळ खेळतात हें विजयमर्चंट, अमरनाथ, अमरसिंग यांनीं सिद्ध करून दिलें आहे. नवीन आणि तरुण खेळाडू क्षेत्ररक्षण तर केव्हांही जुन्या खेळाडूंपेक्षां उत्कृष्ट करतात. आतां भरत-खंडांतील सुप्तावस्थेंत असलेले डॉन ब्रॅडमन्स बाहेर काढावयाचे असतील तर नवीन मंडळींपैकी अनेक उत्कृष्ट खेळाडूंना चौरंगी, प्रांतिक आणि परकीय संघांशीं होणाऱ्या सामन्यांत भाग घेण्यास संधि देणें जरूर आहे.

## १२

इसेक्सचा प्रख्यात क्रिकेटपटु सीवेल यांच्या ६ मे १९३३ च्या Tit-bits मध्यें प्रसिद्ध झालेल्या लेखाचा उतारा उध्दृत केला आहे. सीवेलच्या मताला ' तिकडे ' व ' इकडे ' फार किंमत दिली जाते. टाइम्समधील ' टेस्ट ' सामन्यांचे अहवालात्मक लेख तोच लिहितो. शरीरानुरोधी ( Body-line ) हें भयंकर नांव जॉर्डिन आणि त्याचा दोस्त लारवूड यांना मुळींच मान्य नाहीं. त्याच्या मतें Leg theory ( पायाकडे येणारे ) हें नांव जास्त सयुक्तिक आहे. परंतु सोमरस म्हटलें काय किंवा शांभवी म्हटलें काय तिचा मादकपणा कमी थोडाच होतो ?

सावकाश अगर मध्यम चेंडूफेंक करावयाची, पांच अगर जास्त क्षेत्ररक्षक लेगकडे ठेवावयाचे अशी व्याख्या खऱ्या लेगथेयरीची आहे. अशी चेंडूफेंक लेगकडे झेल उडविण्याकरितां टाकतात. कुशल गोलंदाज ' लेगथेयरी 'ने चेंडू टाकतांना झेल कोणाकडे उडेल हें सांगूं शकतो. कुशल गोलंदाज इंग्लंडांत हाताच्या बोटांवर मोजण्याइतकेच आहेत. व्हाईन ( ससेक्स ), ब्रॉन्ड ( सॉमरसेट ), ब्रौन ( यॉर्कशायर ), स्टोअरर ( डर्बीशायर ), मॅघे ( इसेक्स ) व क्यूफ ( वॉरविकशायर ) हे सुप्रसिद्ध गोलंदाज आहेत. यांच्यापैकीं ब्रॉन्ड हा प्रथम जलद गोलंदाजी करीत असे. परंतु ग्रिमेट या सुप्रसिद्ध चेंडूफेंक्याची परिणामकारक फेंक पाहून तो हळुं चेंडू टाकूं लागला.

W. W. Armstrong हा ऑस्ट्रेलियाचा खेळाडू लेगथेयरीला अनुकूल होता. कित्येक प्रसंगीं खेळाडूला जेरीस आणण्यासाठीं अनेक षष्टकें तो वाईडबॉल्स टाकीत असे.

कुशल गोलंदाज त्याला अनुकूल असलेल्या पीचवर 'लेगथेयरीची चेंडूफेंक करीत असेल तर खेळाडूला पायांमागील क्षेत्ररक्षकांना चुकवून चेंडू टाकणें केवळ अशक्यप्राय असतें. स्कोअर झपाट्यानें वाढत असतांना या पद्धतीची गोलंदाजी अतिशय उपयोगी पडतें. आतांपर्यंतच्या अनुभवाकरून रणजितसिंग, ग्रेसी, हॉब्ज, जॉर्डिन, वॉल्टर्स, सटक्लिफ या इंग्लिश व पोन्सफर्ड, वुडफुल, ग्रौन, मॅकेब या ऑस्ट्रेलियन खेळाडूंना एक वेस्ट इंडीजचा कॉन्स्टंटाईन सोडला तर कोणालाच ही चेंडूफेंक चोपतां येत नाहीं व आली नाहीं. आपणाकडील नाझीरअली व जय यांच्याखेरीज कोणालाच ही फेंक खेळतां येत नाहीं.

या लेगथेयरीच्या अभेद्य चक्रव्यूहालाही जर कोणी दाद दिली नसेल तर ती डॉन ब्रॅडमननेंच होय !

'डॉनचें प्लेसिंग' इतकें अचूक आहे कीं, तो पायांमागील सहाही क्षेत्ररक्षकांना चुकवून चेंडू सीमापार करतो. वॉल, एबलिंग, ब्रोमले यांचें लेगथेयरी बोलिंग अतिशय परिणामकारक आहे. गतवर्षीं यॉर्कशायर विरुद्ध ऑस्ट्रेलिया या सामन्यांत ऑस्ट्रेलियाचे ब्रौन (१४), मॅकेब, (२१), ब्रोमले (१६), बार्नेट (७) इत्यादि उत्कृष्ट खेळाडू लेगथेयरीला बळी पडले. अशा आणीबाणीच्या वेळीं 'डॉन' काय करतो; इकडे सर्वांचें लक्ष लागून राहिलें होतें. कौतुकाची गोष्ट हीच कीं, डॉननें त्या प्रसंगीं बरोबर दोन तासांत १४० धांवा काढल्या. 'लेगथेयरी'चें बोलिंग त्याच्या फटकेबाज बॅटीला कांहींही करूं शकत

नाहीं असें सिद्ध झालें. या १४० त बहुतेक फटके त्यानें लेगलाच मारले. मिचेल, सटक्लिफ, लेलंड, व्हेरिटी यांच्यासारखे क्षेत्ररक्षक लेगला उभे असतांना सबंध दोन तासांत त्यांना 'डॉन'चा एकही झेल उडालेला दिसला नाहीं. डॉनचा १४० स्कोअर बहुतेक सीमान्त टोल्यांनीं भरलेला होता. स्कोअरबुक पुढीलप्रमाणें भरले होतें—
डॉन ब्रॅडमन—४, ४, ४, १, ६, ४, ४, ४, ४, ४, ४, ४, १, १, १, ४, ४, २, १, ६, ४, ४, १, २, ४, ४; ४ इत्यादि. सहाचे दोन, चाराचे बावीस, तीनचे दोन, दोहोंचे चार, आणि एकाचे सव्वीस असं त्याचं वर्गीकरण आहे.

हॉब्जनें त्याच्या या खेळाला 'तुफानी' ( Hurricane ) खेळ असें म्हटलें आहे. ब्रॅडमनच्या खेळानें हॉब्जसारखा गुणग्राही चिकित्सक वेडा होऊन गेल्यास नवल तें काय ! हॉब्ज परंपरेचा चाहता असला तरी लेगथेयरीची कठीण चेंडूफेंक नाविन्यपूर्ण कौशल्य दाखवून फटकावून देणारा डॉनचा खेळ पाहून त्याला त्याचें कौतुक केल्याशिवाय राहवेना. ग्रेसीच्या खेळाचें वर्णन करतांना गार्डनरनें नदीप्रवाहाच्या तीन अवस्थांचें रूपक तुलनेला घेतले आहे. हिवाळ्यांत गळून पडणाऱ्या पानांप्रमाणें आपल्या बाजूचें खेळाडू बाद होत आहेत अशा प्रसंगीं ग्रेसी खेळायला जाई. पहिला एक तास तो चेंडू नुसते अडवी. उगमस्थानाजवळच्या खडकाळ गिरिकंदरांतून स्वप्रवास करणाऱ्या सरितप्रवाहाशीं त्याची साम्यता दिसत असे. तो सेट होऊन जरा टोलवाटोलवी करूं लागतांच उमेदीनें धांवणाऱ्या अस्थिर रुंद नदी–प्रवाहाप्रमाणें त्याचा खेळ भासे. शेवटीं त्याला प्रचंड जलप्रवाहाचें स्वरूप येऊन नदी सागराला मिळाल्यावर सागराचें जें अचाट स्वरूप दिसतें तसें स्वरूप सबंध

संघाच्या स्कोअरचें दिसे. शेवटीं शेवटीं तर मनोवेधक असे चौफेर सीमान्त फटके मारून मैदान दणाणून सोडीत असे.

ब्रॅडमनचा खेळ ग्रेसीपेक्षां 'एक पाऊल पुढें' आहे. आतां हें खरें कीं, ग्रेसीच्या वेळीं हरिततृणांकुरांनीं सजविलेलीं मैदानें नव्हतीं. असें सांगतात कीं, कित्येक वेळीं ग्रेसी हा माळरानावरसुद्धां क्रिकेटचे सामने खेळला आहे. निरभ्र आकाशांत चमकणारी चंद्रकोर आणि डहुळत्या महासागरांत तिचीच पडलेली छाया यांची तुलना करतांना आकाशाचा निरभ्रपणा आणि सागराचें अस्थैर्य लक्षांत घेतलें पाहिजे. आकाशांतील चंद्रकोर आणि तिची चलन पावणारी अस्थिर जलाशयांतील छाया यांपैकीं जास्त सौंदर्यपूर्ण काय हें कोण सांगूं शकणार ? एक रक्कम व्याजानें फुगली असली आणि दुसरी कुळानें दिवाळी साजरी केल्यामुळें कुज-लीशी दिसली तरी गणितज्ञ ' मुद्दल ' म्हणतांच दोघींनाही एकाच मापांत मोजणार ! ग्रेसी आणि ब्रॅडमन यांची योग्यता सामान्याहून बरीच उच्च दर्जाची आहे. त्यांची परस्परांत तुलना करण्याचा यत्न कोणी करूं नये हेंच बरें. जुन्याला पटेल आणि नव्याला आवडेल असा डॉनचा खेळ आहे. ग्रेसीची आकर्षक शैली त्याच्या खेळांत परिपूर्ण उतरलेली आहे. आतां एखादा वावदुक ' डॉनची आणि ग्रेसीची योग्यता एक कशी होईल. हा आजकालचा तरुण पोरगा......' असले निरर्थक शब्द भडभडूं लागेल तर त्याला बजवावें लागेल, " एकोणतिसाव्या वर्षीं शेले ' अमर होऊन 'च मेला ना ? कीटस सव्वीसाव्या वर्षीं वारला म्हणून त्याचा मोठेपणा कोणी नामंजूर केला नाहीं ना ? अगर थोरले माधवरावसाहेब पेशवे अठरा वर्षांचे असले तरी पळून जाणारी मराठ्यांची राजलक्ष्मी त्यांनींच खेंचून परत आणली

ना ? तर मग डॉन तरुण आहे म्हणून तुला बोटें मोडण्याचें कांहीं कारण नाहीं, आणि त्यांतून तूं मोडलीस तर तिकडे लक्ष्य देण्याला कोणाला वेळही नाहीं."

कुशल लेगथेयरिस्ट बोलर कोठल्या क्षेत्ररक्षकास झेल मिळेल हें तो स्लो बोलर असल्यासच सांगूं शकतो. परंतु लारवुडसारखा अचुक चेंडूफेंक्याही आपल्या वेगवान् चेंडू टाकण्याच्या पद्धतीमुळें चेंडू कोणत्या फिल्डरला सांपडेल हें आधीं सांगूं शकत नाहीं.

पायांजवळील यष्टीच्या अनुरोधानें टाकलेल्या वेगवान् चेंडूफेंकीस 'शरीरानुरोधी' म्हणतात. कारण असें कीं, चुकणें हा मानवधर्म आहे. प्रत्येक चेंडू योजलेल्या ठिकाणींच फेंकणारा पराक्रमी गोलंदाज अजून जन्मास यावयाचा आहे. पायांजवळच्या यष्टीच्या रोखानें टाकलेल्या सहा चेंडूंतील कांहीं खेळणाराच्याच शरीरावर येत असतात. अशा रीतीनें अंगावर कोसळूं पहाणारा प्रत्येक चेंडू 'शरीरानुरोधी' चेंडू होय.

डॉन शरीरानुरोधी चेंडूस तोंड देतांना पायांची हालचाल अतिशय द्रुतगतीनें करीत असतो. लेगस्टंपपेक्षां चेंडू किंचित् आंत येत आहे. असें दिसतांच तो वेगानें बॅट पुढें करतो आणि चेंडूनें बॅटला स्पर्श केल्यानंतर तो बॅट किंचित् उजव्या बाजूला झुलती करतो. त्याचा परिणाम असा होतो कीं, चेंडू लेगकडे जावयाच्या ऐवजीं 'ऑन' कडे जातो आणि तिकडे क्षेत्ररक्षकाच्या अभावीं तो सीमोल्लंघन करतो. या त्याच्या हालचालींत इतकें चापल्य भरलेलें असतें कीं, पाहणारांच्या लक्षांतही त्या नीटपणें येत नाहींत.

सर्वच खेळाडू डॉनसारखे नसल्यामुळेंच लारवुडविरुद्ध इतकी

ॲवॉर्ड झाली. लारवुड १९३३ मध्यें ऑस्ट्रेलियांत जॉर्डिनच्या नेतृत्वाखालीं खेळला. त्यावेळीं त्यानें बहुतेकांची अंगें शेकलीं. ऑस्ट्रेलियाचे अकराही खेळाडू त्यानें निकामी करून इंग्लंडला ' ॲशेस ' परत आणल्या. हें जरी लारवुडला भूषणास्पद वाटलें तरी त्याच्या दोस्त इंग्लिशांना तसें वाटलें नाहीं. म्हणूनच १९३४ च्या सामन्यांत तो वगळला गेला. लारवूडचा 'सामाजिक अवतार' येथेंच संपला. व्यक्तिगत लारवूडशीं आपणांस काय करावयाचें आहे ?

तीस सालीं ओव्हलच्या मैदानावर ब्रॅडमननें असें क्रीडाकौशल्य दाखविलें कीं, सार्वत्रिक क्रिकेट इतिहासांत त्याला दुसरी तोड नाहीं. तत्पूर्वी त्याचें नांव बहुजनसमाजाला पुरतेंपणी ठाऊकही नव्हतें. पण एखादा लोंढा जसा अकल्पित येतो आणि आपल्या आगमनानें सर्वत्रांना आश्चर्यचकित करून सोडतो तसें डॉनचें झालें. आणि कुठल्याही प्रचंड शक्तीचें परिस्फोट असेंच अतर्कित रीतीनें होतात. आणि अकल्पित न झाला तर मग तो स्फोट कसा ? समुद्रावरचें अवघ्या जलसंचयाला डहुळून टाकणारें तुफान, आकाश पाताळ एक करणारा विद्युल्लतेचा विस्मयकारी विलास, हालत्या चालत्या जगाला पोटांत घेऊं पहाणारा-धरणीकंप--यांना भूपालाप्रमाणें आपल्या आगमनाची वर्दी भाटाकरवी आगाऊ देण्याची मानमरातबी पद्धत मंजूर नाहीं. 'अकल्पित' यावें आणि ' चमकून ' जावें हें त्यांच्या जीवनसंसारांचें तत्वज्ञान. हॉब्ज, पोन्सफोर्ड, आणि ब्रॅडमन हे तिन्ही उत्तम त्रिखंडविख्यात खेळाडू आहेत यांत शंका नाहीं. परंतु ब्रह्मा-विष्णु-महेशांच्या असामान्यत्व मोठेपणाचे सत्यतत्त्व मान्य करूनही भृगुनें 'हरिमेकम्' असे तपशीलवजा म्हणून श्री विष्णुला सरस ठरविलेंच कीं नाहीं ? तद्वतच उपरिनिर्दिष्ट तिघांत ब्रॅडमनबद्दल

५५०३



जास्त आदरभाव प्रस्तुत लेखकाला वाटतो. डॉनमध्यें जें 'नाविन्य' आहे तें या दोघांत नाहीं. कांहीं जुन्या परंपरेच्या आहारीं गेलेल्या रूढीप्रिय लोकांना डॉनपेक्षां जार्डिन-मेकेब यांचा 'ऑर्थडॉक्स' म्हणजे पुराणाभिमानी खेळ जास्त सरस वाटतो. परंतु त्याचा हा समर्थनात्मक लटका आधार डॉन क्विक्झोटच्या आवेशपूर्ण बडबडीप्रमाणें लटका आणि पायविरहीत आहे. पहाटेपूर्वींचा अंधार रविबिंबाला तेजोविहीन करूं शकत नाहीं. स्वतः डॉन आपणाला अद्याप या क्रिडाभ्यासांतील एक प्रतिथयश विद्यार्थि समजतो. इतर 'खेळाडू' माझ्याहून फार सरस आहेत असे तो विनोदानें बोलतो—शालीनता आणि सुहास्य हा त्याचा स्वभाव-धर्म आहे. आणि माणसाच्या प्रकृतीवर औषधाचा उपयोग करतां येत असला तरी त्याच्या स्वभावधर्माला कुठलें पथ्य आणि कुठली मात्रा ! 'विनया'च्या नसत्या मर्यादा पाळण्यासाठीं रुक्मांगद-राजानें मोहिनीच्या सांगण्यावरून आपल्या पुत्राचा वध केला आणि आज डॉन त्याच कारणानें स्वतःच्या तेजोवेध करून घेत आहे. त्याच्याच तोंडांतून उदीरीत झालेल्या वाक्यांचा जेव्हां हे त्याचें टीका-कार त्यावर छिद्रान्वेशी झोंड उठवतांना उपयोग करून घेतात तेव्हां बोल डॉनला लावावा, कीं काय असा विस्मयांत टाकणारा कूट प्रश्न माझ्यासारख्या डॉनच्या पक्षपाती लेखकापुढें उभा रहातो. एकोणीसशे छत्तीस सालीं अगदीं गेल्या महिन्यांत त्यांनीं जो दोनशे बारा स्कोअर काढला त्याचें वर्णन पुढें करूं.

## FOR CRICKET BOOTS

CONSULT--

# L. D. GAIKWAD

**LAXMI ROAD,—POONA 2,**

*Stockists for—*

BOOTS, SHOES, SLEEPERS & CHAPALAS
& SANDLE SHOES

Dealers in--

ALL OTHER FOOT—WEAR.

---

Be clean white on the field

GET YOUR CLOTHES WASHED AT

# Unique Laundry

**691, Budhwar Peth,**
**&**
**Deccan Gymkhana Branch.**

*Orders Executed Promptly.*

# SPORT'S SHIRTS

HOSIERY

MILLINERY

STATIONERY

CUTLERY

*FANCY GOODS*

*&*

*GENERAL*

*MERCHANTS*

———:o:———

**MOHAMEDI GENERAL STORES**

NEW KITAB BUILDING,

LAXMI ROAD,

Next to Poona Electric Supply Co., Ltd. Office.

POONA 2.

GIDLEY' GIDLEY'S

# NEWS AGENTS

AND

## LIBRARY SERVICE

For latest, Foreign and Indian
Magazines and Periodicals
and
Books on Various Subjects.
For the execution of any order in the
book line.
For literature Interesting
and
Instructive.
Join our Circulating library
or
order at our book stal .
City Agents
for
" The Leisure Hour " and
" Competition Weekly. "

**GIDLEY & CO.**

Laxmi Road, POONA.

Enquire for X'mas cards, Diaries and
New Year Calenders

खुद्द प्रकाशकालाच हें शक्य झालें आहे.
नवीन प्रसिद्ध होत असलेले तीन अभिनव ग्रंथ डिसेंबर
१९३६ अखेरपर्यंत २–८ रुपयांत घरपोंच !

१ झपूर्झा :—

लेखिका :–कुमारी मीनाक्षी दादरकर. विचारी स्त्रीनें लिहिलेली अविचारी स्त्रीची कहाणी : सर्वस्वी प्रगति-पथावर आहे. किं १॥ रु.

२ जीवन संगीत :—

जगांतील प्रमुख भाषांतील प्रेमगीतें यांत संकलित केलेलीं आहेत. मराठींतील जुन्या नव्या प्रसिद्ध कवीकवायित्रींचा यांत समावेश केलेला आहे.
संपादिका :–कुमारी मीनाक्षी दादरकर.
किं. १॥ रु.

३ डॉन ब्रॅडमन :—

क्रिकेटसम्राटाचें चरित्र. प्रोफेसर देवधर यांची प्रस्तावना. मराठींतील या विषयावरील पहिलाच ग्रंथ.
किं. १ रु.

**आर. बी. समुद्र.**

९४७ नारायण पेठ, पुणें २.

तुळशीबागेजवळील जिलब्या मारुतीसमोर

# इनामदार फुलवाले !

सर्व समारंभासाठी लागणारे फुलांचे हरएक तऱ्हेचे साज

**हार, गोटे, वेण्या, वासाची फुलें.**

**मोटारची सजावट अत्यंत सवलतीच्या दरांत करून देऊं.**

ALWAYS GO TO—

# CAFE UNIQUE

ATTRACTIVE PREMISES

VARIETY of REFRESHMENTS

BEST ACCOMODATION IN SPECIAL ROOMS

MODERATE CHARGES

EFFICIENT SERVICE

*FRAME YOUR PHOTOGRAPHS*

AT

# Erande Bros.

**FRAME MAKER.**

LAXMI ROAD,—**POONA 2.**

---

**BE SMART ON THE FIELD**

**FOR SMARTNESS**

**and SATISFACTION PATRONIZE**

# K. NAIK & CO.

**TAILORS.**

*APPABALWANT CHOWK,*

**POONA.**

THE MOST RELIABLE SPORT HOUSE

– FOR –

**STANDARD SPORTS GOODS**

*( SPECIAL CONCESSIONS FOR STUDENTS )*

# Sachdeo & Co.,

SPORTS MANUFACTURERS

62 *Main Street, POONA ( CAMP ).*

Factories—SIALKOT

---

# N. DATE & CO.

**BUDHWAR PETH,**

**PHOTO ARTISTS and DEALERS IN**

**PHOTOGRAPHIC GOODS.**

*OUT DOOR WORK*

*A SPECIALITY.*

दोघांनीं मिळून लिहिलेली मराठीतली पहिली कादंबरी

अवघ्या तीन तासांतील कथानक?

# पूना एक्सप्रेस

अभिनवलेखनतंत्रानें लिहिलेला उपन्यास !

लेखक द्वय:— (१) कुमारी शांता मुजुमदार.
(२) ? ?

# CAFE DE LUX

A RESTAURANT OF REPUTATION

BEST SERVICE FLAVOURISH DISHES !

All Kinds of Cakes

We Make

provisions for big contracts

to satisfy all college and social functions !

BUDHWAR, POONA 2.

पुण्यातील सर्व खेळाडू विद्यार्थ्यांचें

उपहाराचें आवडतें केंद्र

# काफे डी लक्स

स्वच्छता, टापटीप, रुचकर पदार्थ, स्पेशल रुम्स, सवलतीची कुपन सिस्टीम, येवढ्या गोष्टी असल्यावर आणखी काय पाहिजे ?

बुधवार, पुणें २.

# K. K. & CO.

**PHOTOGRAPHIC DEALERS**

LAXMI ROAD, **POONA 2.**

*ALSO AT—*

EAST STREET, **POONA 1.**

**MAHABALESHWAR and PANCHGANI.**

FOR HIGH CLASS AND ARTISTIC

**PAINTING**

*CONSULT*

# Painter Phadke


**THE WONDER PAINTER OF THE EAST**

APPABALWANT CHOWK **POONA 2.**

सुंदर

**क्रिकेटचा खरा आनंद**

## नजर साफ असली तरच !!!



आणि आजचे हजारो तरुण नाकावर चष्मा ठेवणारेच आहेत. अशावेळीं शास्त्रीय संशोधनाच्या खास काचांचा काटेकोर काळजी घेऊन तयार केलेला चष्मा हवा. तो मिळण्याचें एकच ठिकाण गिरगांवांत आहे.

**सुंदर आणि कंपनी**

दर माफक, काम अत्यंत समाधानकारक.
निरनिराळ्या अधुनिक तऱ्हेच्या फ्रेम्स व

**सन गॉगलसचा अपूर्व साठा.**

चष्मेच वापरा

आजच भेट द्या.

सुंदर आणि कंपनी,—गिरगांव—मुंबई.

---

## THE INDIAN NATIONAL LEATHER WORKS

MANUFACTURERS OF HIGHGRADE FOOT-WEARS OF LATEST FASHIONS AND MODERN LINES MADE OF LEATHER OF ALL SORTS AND ALSO OF

**DEAD ANIMALS**

# दासबाबू रेस्टॉरन्ट

कोतवालचावडीसमोर बुधवार पेठ पूना २.

चहा, कॉफी, सोडा, लेमन, पावन, कचोरी, वडे, केक वगैरे स्पेशॅलिस्ट

प्रोप्रायटर—बी. बी. निकम

---

*ALWAYS VISIT*

To

# MODERN SHOP

**LAXMI ROAD POONA 2.**

*FOR*

HOSIERY STATIONARY

CUTLERY & FANCY GOODS


AND YOU WILL BE SATISFIED

---

# बॉम्बे रेस्टॉरन्ट

हायक्लास हॉटेल

सदाशिव पेठ पेरूचे गेटासमोर पुणें २.



REFBK-0005593

Leg Glance [ Gupte ]



**RAMCHANDRA**

**SAKHARAM**

**BADADE**

# MOTOR
# BODY
# BUILDER

रामचंद्र सखाराम बडदे

उर्फ मामा, मोटार बॉडी बिल्डर.

# KANADE'S CLASSES

Estd ] IN [ 1930.

**MATHS and PHISICS**

*for*

F..Y, I.E., B.A.. and B.Sc. STUDENTS

**Success Guaranteed** **Money Refundable**

**FEES MODERATE**

*For particulars apply to:—*

**G. V. KANADE,**

Kanade's Hostels F. C. Road **POONA 4.**

**Place:—** I Tara Mansion F. C. Road POONA 4.

II Appa Balwant Chowk, POONA 2.

---

# CITY STORES

LAXMI ROAD **POONA 2.**

Pioneer Stationers and Hosiery Merchants.

---

**दिवाळींत तेलें, उटणीं, अत्तरें, उदबत्त्या कुठें घ्याल ?**

**दत्तात्रय नारायण हेजीब**

किराणा व सुका मेव्याचे व्यापारी,

रे मार्केटजवळ, २० शुक्रवार पुणें २.

# लकी

# रेस्टॉरन्ट

डेक्कन जिमखाना, फर्ग्युसन कॉलेज रोड, पुणे.

केक्स, चॉकलेटस, सिगारेटस,

स्पेशल

नॉन–व्हेजिटेरीअन

ॲरेंजमेन्ट

सोडा फौंटन

पुण्यांतील अत्यंत लोकप्रिय रेस्टॉरंट

# FARGO

स्वस्ताईची कमाल!

खर्चांची बचत

सौंदर्याची कमाल

**MADE BY**

गति टिकाऊपणा

मजबुती

# 1936

म्हणजेच १९३६

# Chrysler

# फारगो

ट्रक

सब डिस्ट्रिब्युटर्सः—

## आर. टी. वांडेकर आणि कं.

५६२ नाना पेठ, पुणें.

ग्रं.सं.
१९२५२